विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष दुसरे | अंक सहावा | जून २०२२



# ‘वारसा संतांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा’

## जनप्रबोधन यात्रा : १४ ते २३ मे २०२२

शेंडगाव, मोझरी, मुक्ताईनगर, निफाड, त्र्यंबकेश्वर, आळंदी, देहू, पिंपळनेर, काळेगाव, श्रीगोंदा, अपेगाव, पैठण, दौलताबाद, जालना, नरसी नामदेव, गंगाखेड, परळी, तेर, आरण, मंगळवेढा, पंढरपुर आदी ठिकाणी जागर करण्यात आला. अभियान प्रमुख म्हणून महा. अंनिसचे राज्य सरचिटणीस हरिदास तम्मेवार, सांस्कृतिक अभिव्यक्ती विभागाचे राज्य कार्यवाह मनोहर जायभाये, हनुमंत मुंडे यांनी काम पाहिले. संयोजक म्हणून राज्य सरचिटणीस नितीन राऊत, विविध उपक्रम विभागाचे राज्य कार्यवाह अनिल शोभना वसंत यांनी काम पाहिले. राज्य प्रधान सचिव माधव बावगे यांचा या यात्रेत पुढाकार राहिला आहे.




संत गाडगेबाबा यांचे जन्मस्थान शेंडगाव येथुन यात्रेला सुरुवात झाली. गाडेबाबांच्या वेशात महादेवराव भुईभार, श्यामसुंदर सोन्नर, बबन कानकिरड, डॉ. संजय तिडके उपस्थित होते.



पंढरपूर येथे समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानी अविनाश पाटील होते. यावेळी राष्ट्र सेवा दलाचे राजा अवसक, श्यामसुंदर महाराज सोंन्नर, ज्ञानेश्वर महाराज बंडगर उपस्थित होते.




परळी वैजनाथ येथे शामसुंदर महाराज सोन्नर यांचे किर्तन झाले. यावेळी सुधाकर तट, सुकेशनी नाईकवाडे उपस्थित होते.



पंढरपूर येथे समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना संत साहित्याचे अभ्यासक सचिन परब, गोविंद पाटील उपस्थित होते.



त्र्यंबकेश्वर येथील श्री निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिरात जनप्रबोधन झाले. यावेळी टी. आर. गोराणे, कृष्णा चांदगुडे, समीर शिंदे, महेंद्र दातरंगे, सचिन महीरे उपस्थित होते.



देहू येथील गाथा मंदिरात शामसुंदर महाराज सोन्नर यांचे प्रवचन झाले. यावेळी संजय बारी, दिगंबर कट्यारे, एकनाथ पाठक, राहुल उजागरे उपस्थित होते.

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

वर्ष दुसरे । अंक सहावा । जून २०२२

## अनुक्रमणिका


- **संपादकीय** २

- **प्रासंगिक**

  **असहमतीचा उच्चार आणि बेगमपुऱ्याचा शोध** — संध्या नरे-पवार ३

  **आजचा काळ आणि आपण** — गणेश विसपुते ६

- **अभिवादन**

  **अनिष्ट रुढी परंपराविरुद्ध एल्गार करणारा राजा** — डॉ. गिरीश मोरे १०

  **राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री उद्धाराचे कार्य** — राजेश पाटील १३

- **संतांचिये द्वारी**

  **सानेगुरुजींचा मंदिर प्रवेश सत्याग्रह** — ज्ञानेश्वर बंडगर १६

- **जातवास्तव**

  **...एका रुपयात घटस्फोट** — डॉ. टी. आर. गोराणे १९

  **अनिष्ट प्रथा : कुर्माघर** — सूरज उर्मिला सुनिल २१

- **मनापासून**

  **आनंदाचा शोध** — डॉ. प्रदीप पाटकर २४

- **विज्ञानविश्व**

  **एकमेव वसुंधरा** — शंकर शेलार २५

- **देहदानामुळे जीवन आणि मृत्यूही अर्थपूर्ण होतो** — डॉ. तीर्थराज कापगते २७

- **महाराष्ट्र अंनिसची खबरबात** — विशाल विमल २९

- **विवेक-विज्ञान शब्दकोडे** — उत्तम जोगदंड ३२


सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर (जिल्हा सांगली) ४१५ ४०९ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

- **संपादक**
  नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  एकनाथ पाटील
- **सदस्य**
  दीपक बाविस्कर
  श्यामसुंदर मिरजकर
  मांतेश हिरेमठ
- **व्यवस्थापकीय संपादक**
  विशाल विमल
  अजय भालकर
- **सदस्य**
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **कायदेशीर सल्लागार**
  ॲड. गोविंद पाटील

**वार्षिक वर्गणी**

**४००** रु. (व्यक्तीसाठी) **५००** रु.(संस्थेसाठी)

● **वर्गणी पाठविण्याची सुविधा :**
महाराष्ट्र अंनिस अंतर्गत प्रकाशन संस्थेच्या खालील बँक खात्यावर वर्गणीची रक्कम पाठवू शकता.
**विवेक जागर संस्था,**
**आय.सी.आय.सी.आय. बँक, मुंदडा मार्केट, धुळे**
**खाते नंबर** : 646301002757
IFSC Code : ICIC0006463

● वर्गणीची रक्कम ऑनलाईन पाठविल्याचा स्क्रीनशॉट अजय भालकर ९३५९०८०८२० या व्हॉट्सॲप नंबरवर पाठवावा. लगतच्या अंकासोबत वर्गणीची पावती पाठविली जाईल.

**मुद्रितशोधन** : प्रल्हाद मिस्त्री
**मुखपृष्ठ** : सचिन भोसले
**स्वागतमूल्य** : ₹ २५/-

# संपादकीय

हिजाब परिधान केलेल्या विद्यार्थिनींना महाविद्यालयात प्रवेश नाकारला, ज्ञानवापी मशिदीमध्ये सर्वेक्षणादरम्यान शिवलिंग सापडल्याचा हिंदू संघटनांचा दावा, आग्र्याचा ताजमहाल नसून तेजोमहाल, ताजमहालच्या बंद असलेल्या २२ रहस्यमय खोल्यांवरून वादविवाद, जहांगीरपुरात अतिक्रमणावर बुलडोझर, शाहीन बाग येथे बुलडोझर पोहोचला, मशिदीवरील  भोंगे हटवण्यासाठी अल्टिमेटम, हनुमान चालिसाचे पठण या मीडियातील ब्रेकिंग न्यूजनी वर्तमान ढवळून काढले आहे. सत्तास्थानं टिकवायची असतील, तर ही अशी विभागणी उपयोगाची आहे, अशा दिशेने वर्तमान राजकारण वेगाने वाटचाल करीत आहे. सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांबद्दल मात्र कमालीची उदासीनता दिसत आहे. आपल्याच कोशात मश्गुल असलेला वर्ग या प्रश्नांसाठी जाब विचारायला आज रस्त्यावर उतरत नाही. धार्मिक विद्वेष वाढविण्यासाठी सोशल मीडियाचा पुरेपूर वापर केला जातो आहे. एवढंच नाही, तर धार्मिक भावना भडकवण्यातच अनेकांना असुरी आनंद मिळतो आहे. संस्कृती, परंपरा, धर्माभिमान आणि भावनाभिमानाच्या नावाखाली आपण आपल्याच पायावर कुऱ्हाड तर मारून घेत नाही ना याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची आवश्यकता आहे.

सध्याच्या या अस्वस्थ पार्श्वभूमीवर देशातील ९५ गांधीवादी विचारवंतानी नुकतेच एक पत्रक काढून अशा प्रकारच्या बातम्या भारतीय समाजातील एकता व सामाजिक सलोखा उध्वस्त करत आहेत. तसेच हा हेतू साध्य करण्यासाठी एखादे योजनाबद्ध कारस्थान अंतर्गत पातळीवरून सुरु असल्याची शंका उपस्थित केली आहे. भावनिक प्रश्नांची पेटती काडी टाकून धार्मिक विद्वेषाचा वणवा देशभर पेटावा, असे कारस्थान असण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे आणि अशा कारस्थानाला लोकांनी बळी पडू नये असे आवाहन देखील केले आहे. वर्तमानाचा भविष्यावर नेहमी परिणाम होत असतो, भविष्याचा वेध घेत वर्तमानात सार्वजनिक वर्तन अपेक्षित असते. वर्तमानातील घडामोडीवर आधारलेले भविष्यातील धोके ओळखले नाहीत, तर भावी पिढी आपणाला माफ करणांर नाही. देशात धार्मिक सलोखा असल्याचे व कोणताही धार्मिक विद्वेष नसल्याचे पत्रक दुसऱ्या बाजूने नजीकच्या काळात कदाचित काढले जाईल. मात्र यातले भविष्यकालीन धोके आणि वास्तव समाजातील प्रत्येक घटकाने समजून घेण्याची आवश्यकता आहे.

व्हाटस ॲपद्वारे तर हल्ली संशोधनाचे नव नवीन दावे त्यांच्या या शाखांकडून केले जात आहेत. 'हनुमान चालिसा' आणि 'गायत्री' मंत्रावर संशोधन करून गायत्री मंत्राने सर्व शक्तिमान निर्माण होतात असा शोध हॅम्बुर्ग विद्यापीठातील अमेरिकन वैज्ञानिक डॉ. हॉवर्ड स्टीजेरील यांनी लावल्याचा मेसेज व्हाटस ॲपवर याच कालावधीत सर्वत्र व्हायरल होत आहे. परंतु असा कोणताही वैज्ञानिकच अस्तित्वात नाही आणि असे संशोधनही झालेलं नाही. हे सिद्ध होईपर्यंत मात्र या मेसेजने मेसेज व्हायरल करणाऱ्यांचा दुष्ट हेतू साध्य केलेला असतो. समाजात अफवा पसरवून दूही निर्माण करणाऱ्यांची आणखी एक शाखा चित्रपटाच्या आणि मालिकांच्या माध्यमातून याच कालावधीत अपप्रचार करीत आहे. समाजाला या मायाजालात गुंतवून ठेवायचं असं कारस्थान सर्व पातळीवरून सुरु आहे. यासाठी गरज आहे ती प्रबोधनाची, विचारवंतांच्या ठाम भूमिकांची आणि सडेतोड लेखनाची.

या सर्व कलुषित वातावरणात समाजाला पुढं घेऊन जाणारा 'विधवा प्रथेला मूठमाती' संदर्भात महाराष्ट्र सरकारने घेतलेला निर्णय अभिनंदनीय आहे. हा निर्णय घेण्यास प्रवृत्त ठरले, कोल्हापूर जिल्हयातील छोटेसे हेरवाड गाव. भविष्यातला 'हेरवाड पॅटर्न' प्रसिद्ध झाला, तर कुणाला आश्चर्य वाटू नये. पतीच्या निधनानंतर पत्नीचे कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातली जोडवी काढणे आदि प्रथा बंद करण्याचा निर्धार हेरवाडचे ग्रामस्थ, सरपंच सुरगोंडा पाटील आणि ग्रामविकास अधिकारी पल्लवी कोळेकर यांनी केला आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतीनी हेरवाड ग्रामपंचायतींचा आदर्श समोर ठेवून कार्य करावे, असे परिपत्रक राज्य सरकारकडून जारी करण्यात आले आहे. समाजाची आणि पर्यायाने देशाची उन्नती होण्यासाठी वेगळया वाटेने वाटचाल करणाऱ्या अशा अनेक गावांची देशाला आज गरज आहे. अशी छोटी गावेच समाजाच्या परिवर्तनाचा नवा इतिहास निर्माण करतील आणि अशा असंख्य पायवाटांमधून उद्याची पिढी, उद्याचा समाज, उद्याचा सशक्त देश उभा राहील.

**– संपादक मंडळ**



# असहमतीचा उच्चार आणि बेगमपुऱ्याचा शोध

संध्या नरे-पवार
७५०६६०३०३८

**दि. ८ व ९ मे २०२२ रोजी सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे पहिले जनवादी साहित्य-संस्कृती संमेलन संपन्न झाले. संमेलनाच्या अध्यक्षा संध्या नरे – पवार यांचे अध्यक्षीय भाषण अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या वाचकांसाठी या अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.**

गणांमध्ये अन्नधान्याचे, जमिनीचे वाटप करणाऱ्या, वेदपूर्व काळात होऊन गेलेल्या गणमाता; सर्व शृंखलांपासून 'मुक्ते, तू मुक्त होऊन जा', असे सांगणाऱ्या बौद्ध भिख्खुणी मुक्ता थेरी; भूभागाच्या सीमा ओलांडून धम्मप्रसार करणारी संघमित्रा, 'स्त्री जन्म म्हणूनी न व्हावे उदास', असे सांगणाऱ्या संत जनाबाई; स्वराज्याचे स्वप्न पाहाणाऱ्या राजमाता जिजाबाई; शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हटते पाहा,असे सांगणाऱ्या सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख; वेद हे ईश्वराकडून आले म्हणावे तर त्याचा उपभोग सर्व प्राणिमात्रांना सारख्या पद्धतीने का घेता येत नाही, असा प्रश्न विषमतामूलक जातव्यवस्थेला विचारणारी मुक्ता मांग; १८८५ मध्ये 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहून श्रुतिस्मृतिपुराणोक्त अशा पुरुषसत्तेला खडसावणाऱ्या ताराबाई शिंदे; वैदिक सनातन्यांच्या विरोधाला प्रत्युत्तर देत, धर्मांतर करत, ख्रिस्ती धर्म स्वीकारत स्त्रियांसाठी संस्थात्मक कामाची सुरुवात करणाऱ्या पंडिता रमाबाई; 'नको नको रे ज्योतिषा नको माझा हात पाहू', असे म्हणत दैववादाला नाकारणाऱ्या बहिणाबाई, दलितांच्या उन्नतीसाठी कष्टाची वाट स्वाभिमानाने चालणाऱ्या रमाई आंबेडकर... स्त्रियांच्या या घट्टमुट्ट वारशाचे मी इथे या जनवादी साहित्य आणि संस्कृती संमेलनात स्मरण करते. अभिवादन करते. विषमतावादी समाजव्यवस्थेला नाकारत समतावादी मूल्यांची रुजवात करणारे भगवान बुद्ध, संत कबीर, चक्रधरस्वामी, संत नामदेव-तुकाराम, छत्रपती शिवराय, समाजक्रांतिकारक जोतिबा फुले, राजर्षी शाहू, घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील या महामानवांनाही मी इथे अभिवादन करते. तसेच विज्ञाननिष्ठ समाजाच्या निर्मितीसाठी विवेकाच्या वाटेवरून निर्भयपणे चालताना कट्टरतावादी, सनातनी विचारांच्या गोळ्या झेलत मृत्यूला सामोरे जाणारे नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या हत्यांचे स्मरण करत आणि आपल्यालाही त्याचे स्मरण देत मी या विचारवंतांच्या स्मृतीलाही वंदन करते.

हे स्मरण, हे अभिवादन थोडे लांबले आहे, याची मला कल्पना आहे. पण हे जनांचे साहित्य आणि संस्कृती संमेलन आहे. त्यामुळे जनांच्या साहित्य आणि संस्कृतीचा म्हणजेच त्यांच्या समग्र अस्तित्वाचा नेमका वारसा काय आहे, हे इथे सुरुवातीलाच स्पष्ट करणे आवश्यक आहे.

या जनवादी साहित्य आणि संस्कृती संमेलनाच्या अध्यक्षपदी माझी निवड करून मला या विचारमंचावर माझे विचार मांडण्याची संधी दिली, याबद्दल मी या संमेलनाच्या संयोजन समितीचे अध्यक्ष संपत देसाई, उपाध्यक्ष मधुकर मातोंडकर, उपाध्यक्ष मिलिंद माटे, कार्याध्यक्ष प्रतिभा चव्हाण, सचिव अंकुश कदम तसेच स्वागताध्यक्ष संजय वेतुरेकर यांचे आणि आयोजनात सहभागी असलेल्या सर्व संघटनांचे आभार मानते. दलित पँथर या लढाऊ संघटनेच्या स्थापनेला पन्नास वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या सुवर्णमहोत्सवी वर्षात या अशा संमेलनाचे आयोजन करणे हे आजच्या काळात अधिक औचित्यपूर्ण आहे.

आज इथे या मंचावर उभी असताना मला माझा जीवनसाथी जयंत पवार आणि वडील दत्ता नरे यांची तीव्रतेने आठवण येत आहे. यात केवळ व्यक्तिगत दुःखं किंवा भावनिक भाग नाही, तर वैचारिक प्रवासातील सोबती दुरावल्याचे दुःखं आहे. जयंत पवार यांनी सातत्याने लेखकांचं, कलावंतांचं, अभ्यासकांचं अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायम राहावे यासाठी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका, त्यांच्या लेखनातून शोषित जनांच्या दुःखाला दिलेले दृश्य स्वरूप, मुंबईतील गिरणी कामगारांच्या वाताहातीविषयी सातत्याने केलेले लिखाण याबाबी इथे उपस्थित असलेल्या बहुतेकांना माहीत आहेत. जयंतचे गावही सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आणि वडिलांचे गावही सिंधुदुर्ग जिल्ह्यातील. आईच्या वडिलांचे गावही पंचक्रोशीतलेच. म्हणजे सगळी मुळं या लाल मातीतच रुजलेली आहेत. मुलगा थोडा वयात आला की, त्याला मुंबईकडे धाडायचा, चाकरमानी करायचा हा या लाल मातीचा पन्नास, साठच्या दशकातला रिवाज होता. वडील शाळकरी वयातच मुंबईला जाऊन काकांच्या खोलीत राहू लागले. दिवसा छोटीमोठी कामं करत रात्रशाळेत जाऊन त्यांनी आपलं मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण पूर्ण केलं. नंतर नोकरी करत असतानाच तरुणवयात बॅ. नाथ पै, मधु दंडवते या समाजवादी नेत्यांची भाषणं ऐकत, त्यांच्याशी संपर्क साधत त्यांच्या सहवासात

आले. जवाहरनगर इथल्या वस्तीत राहात असताना तिथल्या लोकांच्या प्रश्नांवर काम करत कार्यकर्ता बनले. आणीबाणीला विरोध करत तुरुंगात गेले आणि नंतर १९७७ च्या जनता पक्षाच्या राजवटीत नगरसेवक म्हणून निवडून आले. हे इथे सविस्तरपणे सांगण्याचे कारण म्हणजे वडील त्या काळात काँग्रेस पक्षावर नेहमी भ्रष्टाचारी म्हणून टीका करत, पण त्याचवेळी उजव्या विचारांच्या पक्षांबाबत बोलताना कायम एक वाक्य उच्चारत की, 'ते लोकं बरोबर नाहीत.' कुटुंबातील मुलांपैकी कोणी जर उजव्या विचारधारेच्या विद्यार्थी संघटनेच्या एखाद्या कार्यक्रमाला गेल्याचं त्यांना कळलं, तरी ते तेच वाक्य उच्चारत, 'तिथे जाऊ नका. ते लोकं बरोबर नाहीत.' वडील एक कार्यकर्ता होते. त्यांना सैद्धांतिक भाषेत बोलता येत नव्हतं, वैचारिक मांडणी करता येत नव्हती. त्यांनी कोणतंही तत्त्वज्ञान वाचलेलं, अभ्यासलेलं नव्हतं. पण तरी त्यांच्या सामाजिक जीवनातल्या अनुभवाच्या आधारे, एका उपजत जाणिवेच्या आधारे उजव्या विचारसरणीच्या संघप्रणित राजकारणाचा त्यांनी एका वाक्यात निचोड काढला होता, 'ते लोकं बरोबर नाहीत.' दुहीची बीजं पेरली की विद्वेषाचं तण माजतं, हे त्यांना उमगलेले होते. वडील जे काही सांगू पाहात होते त्याचा प्रत्यय १९९२ मध्ये अयोध्येत, २००२ मध्ये गुजरातमध्ये आणि २०१४ नंतर संपूर्ण देशात येत आहे. म्हणूनच वडिलांची, त्यांच्या या विधानाची सातत्याने आठवण येत असते.

इथं उभं असताना मला पँथर कवी नामदेव ढसाळ यांच्या 'चिंध्यांची देवी' या कवितेचंही स्मरण होत आहे. या कवितेत नामदेव ढसाळ म्हणतात,

'आई निवर्तून झालेली चिक्कार वर्षे..
मी असा भटकून चिंध्यांच्या देवीच्या
पंचक्रोशीतून करतो ये, जा
या रस्त्यातून चालताना आईसोबत असायची तेव्हा वाटायचे सुरक्षित,
आता त्या भयाण पर्वतराजीत वाटू लागते भीती.
आणि मी जन्माचा नास्तिक
हाकारू लागतो चिंध्यांच्या देवीला
त्या निर्जन पंचक्रोशीत
हसते कोणी– ढगांच्या गडगडाटासारखे
दचकून जातो जीव
आणि अलगद कुणी पकडल्यासारखे
वाटते माझे बोट –
देहातल्या सर्व अष्टमहाभित्या होऊन जातात
नाहिशा !
मी हिमतीने आक्रमू लागतो वाट,
डोंगराचा माथा फोडून
आरपार गेलेली काठी
चिंध्यादेवीची: जणू पृथ्वीच्या नाभीला स्पर्श करणारी
काठीला गुंडाळलेल्या जगड्व्याळ चिंध्या
सुई, सुई वाऱ्यावर
फडकत राहातात – आसमंताला चिरीत...'

मानवी मन आस्तिक असो वा नास्तिक, मातेच्या गर्भातील सुरक्षितता त्याला कायम हवीशी वाटते. कारण मातेच्या गर्भात भुकेचे हिशोब नसतात. पोट भरण्याची हमी असते. नामदेव ढसाळांनी चितारलेली ही चिंध्यांची देवी जितकी अद्‌भुत आहे तितकीच वास्तव आहे. बायाबापड्या तिला चिंध्या वाहातात आणि अगणित चिंध्यांची देवी बनते. दैवत्वाचं, अलौकिकत्वाचं वलय तिला नाही. तिचं नातं इथल्या दारिद्र्याशी, इथल्या भुकेशी आहे. किंबहुना इथल्या भूकेने, दारिद्र्याने देवत्वाची कल्पना करताना ती मातृरूपात तर केलीच; पण ती चिंध्यांच्या रूपात केली, हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकदा पोटाची भूक सहन करता आली की, मनुष्याला कसलंच भय उरत नाही. त्याअर्थी ही चिंध्यादेवी मनातल्या अष्टभित्या घालवणारी आहे. ढसाळांच्या नास्तिक मनाला बालपणी आईच्या सहवासात जी सुरक्षितता लाभली ती मोठेपणी या चिंध्यादेवीच्या स्मरणाने लाभते. हे स्मरण जितके देवीचे आहे तितकेच दारिद्र्याचे, भुकेचे आहे. म्हणूनच देवीच्या काठीला गुंडाळलेल्या चिंध्या आसमंताला चिरत फडकत राहातात, दारिद्र्याचं ऐलान करत, भुकेचा हिशोब मागत.

कोकणाचा हा परिसरही अशा अनेक ग्रामदेवतांनी, मातृदेवतांनी भरलेला, भारलेला आहे. काळ्या पाषाणाच्या स्वरूपात, कोणत्याही पुरुष सहचराशिवाय उभ्या असलेल्या सातेरी, काळंबाई, विठ्ठलाई, मरिआई, जाखाई या अशा अनेक देवता आपल्याला थेट वेदपूर्व काळाशी, सिंधु संस्कृतीशी जोडतात. वेदसंस्कृतीतल्या देवपत्नींपेक्षा त्या सर्वस्वी निराळ्या आहेत. त्यांना रुढार्थाने पती नाही पण त्या माता आहेत. मातृरूपात त्यांचे पूजन केले जाते. सौत्रान्तिक मार्क्सवादी शरद पाटील यांनी त्यांच्या 'दासशुद्रांची गुलामगिरी' या ग्रंथात ज्या गणमातांची मांडणी केली आहे किंवा हरप्पा–मोहोंजोदरो इथल्या उत्खननात ज्या अनेक मातृदेवतांच्या मूर्ती सापडल्या आहेत. त्यांचे आणि भारतभर आढळणाऱ्या मातृदेवतांचे नेमके नाते काय आहे, यासंदर्भात देवीप्रसाद चट्टोपाध्यायांपासून ते दामोदर कोसंबींपर्यंत वेगवेगळ्या अभ्यासकांनी विश्लेषण केले आहे. पाश्चिमात्य अभ्यासकांनी यासंदर्भात मांडणी केली आहे. हा काळाच्या पडद्याआड पुसला गेलेला, विस्मरणात गेलेला मातृसत्तेचा, स्त्रीसत्तेचा वारसा आहे. अनेक समुदायांनी धर्मांतरानंतरही आपल्या मातृदेवतांचे स्मरण कायम ठेवल्याचे दाखले मिळतात. आजच्या सांस्कृतिक संघर्षाच्या काळात,

धर्मांध कट्टरतेच्या आक्रमक पुरुषदेवासमोर इथल्या मातृदेवतांचा हा समतावादी वारसा पुन्हा एकदा उजागर करायला हवा. या मुद्यासंदर्भात मी पुढे अधिक मांडणी करेन. तूर्तास या मातृदेवतांना सौहार्दाचे आणि समतेचे गाऱ्हाणे घालून मी पुढच्या मुद्याकडे वळते.

हे साहित्य आणि संस्कृती संमेलन आहे, केवळ साहित्य संमेलन नाही, ही बाब मला लक्षणीय वाटते. जिथे जनांनी लेखणी हातात घ्यायची का नाही, हे प्रस्थापितांची संस्कृती ठरवते, जनांनी लिहिलेल्या साहित्यकृतीला मान्यता द्यायची का नाही, हे अभिजनांची समीक्षा ठरवते, तिथे या वैचारिक प्रभुत्वाला सामोरे जाताना जनांना आपल्या संस्कृतीसहच उभे राहावे लागते. शिवाय जनांच्या साहित्याची निर्मिती जनांच्या संस्कृतीमधून, विविध लोकप्रकारांमधून, लोकगीतांमधून, मौखिक कथांमधून झालेली आहे. आज पाश्चिमात्य साहित्यातील सिंड्रेलाची कथा इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या कृपेने घराघरांत पोहोचली आहे. पण भिल्ल आदिवासींमध्ये कुंदीराजा, फुलवंती आणि तिची सावत्र आई यांची लोककथा आहे, ती मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत आलेली आहे. पण सिंड्रेला आपल्याला माहीत असली, तरी फुलवंती अपरिचित असते. कारण परिघावरच्या संस्कृतींमधील साहित्यही परिघावरच राहाते. आदिवासींमध्ये प्रत्येक जमातीत रामसीतेची कथा वेगळी आहे. आदिमांचे रामसीतायण वाल्मिकींच्या रामायणापेक्षा वेगळे आहे. यात कधी सीता रामाची बहीण आहे, कधी रावणाची मुलगी आहे तर कधी सीतेला स्वयंवरात लक्ष्मणाने जिंकले आहे. वारली आदिवासींच्या रामसीतायणात लक्ष्मणाने सीतेला जिंकल्यावर त्याने रामाला सीतेशी लग्न करायला सांगितले. नंतर एकदा लक्ष्मण आणि सीता यांचे भांडण होते, तेव्हा लक्ष्मण रामाला सीतेचा त्याग करायला सांगतो. रामाने तसे केल्यावर ती सात समुद्र फिरून सकोबा आणि इटोबा यांच्या आश्रमात राहाते. आश्रमातच तिचे दोन्ही मुलगे मोठे होतात. तिकडे नगरात राम रावणाचे युद्ध सुरू झालेले सीतेला कळते. ती आपल्या दोन्ही मुलांना घेऊन तिथे जाते. युद्धात रामाचा पराभव होत असतो. राम-लक्ष्मण दोघेही जखमी झालेले असतात. तेव्हा सीता आपल्या दोन्ही मुलांसह युद्धात उतरते, रावणाशी युद्ध करते आणि जिंकते. ही अशी विविध रामायणं कधी पुढं आणली गेली नाहीत. पुरोगामी विचारप्रवाहानेही ही रामायणं पुढं आणत लोकांना ती सांगितली नाहीत. अगदी १९९२ नंतरही नाहीत. वारली आदिवासीही महाराष्ट्रातलेच आणि आजही रावण आणि मेघनादाची पूजा करणारे कोरकू आदिवासीही महाराष्ट्रातलेच. बहुजन जातींमधील ग्रामीण स्त्रियांच्या लोकगीतांमध्येही रामायण स्त्री परिप्रेक्ष्यातून उलगडत जाते. सीतेचे निष्पापपण गाताना ग्रामीण स्त्री म्हणते,

'वधावया नेली सीतासारख्या नारीला
कलंक लागला चंद्रासारख्या देवाला...'

दुसरी एखादी 'राम म्हनू राम, नाही सीतेच्या तोलाचा' असा सीतेच्या श्रेष्ठत्वाचा निर्वाळाही देते. सीतेच्या माध्यमातून ग्रामीण स्त्री आपले स्वतःचे दुःखंही व्यक्त करते आणि त्या दुःखाला शब्दांमध्ये बांधत म्हणते,

'सीताला सासूरवास, सासू केकईनं केला
रामासारखा भरतार, तिला न्हाई भोगू दिला
सीतेला सासूरवास, कवठाच्या कवठीपरी
नाही ग भोगू दिला, रामाच्या नवतीमधी.'




राम आणि सीता या दोन व्यक्तिरेखा इथल्या बहुजनांच्या दैनंदिन जगण्यातला अविभाज्य भाग आहेत, त्यांच्या सहज अभिव्यक्तीचा आविष्कार आहेत. सासूच्या सासूरवासापासून ते पतीपत्नीमधील तणावापर्यंत वेगवेगळ्या गोष्टी राम-सीतेच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असताना सर्वसामान्यांच्या अभिव्यक्तीतील राम-सीता कधी संस्कृतीच्या पृष्ठभागावर आले नाहीत. प्रस्थापित उच्चजातीय अभिजन संस्कृतीच्या केंद्रस्थानी कायम वाल्मिकी रामायण, तुलसीदासांचे रामायण आणि नंतर माडगूळकरांचे गीतरामायण राहिले. मोजक्या अभ्यासकांव्यतिरिक्त लोकमानसातील राम-सीतेशी, आदिवासींमधील रामसीतायणाशी इथल्या पुरोगामी विचारप्रवाहानेही स्वतःला जोडून घेतले नाही. आम्ही आमच्या नास्तिकपणात, आधुनिकतेत आणि नंतर उत्तर आधुनिकतेत मग्न राहिलो. पाश्चिमात्य साहित्य अभ्यासत राहिलो आणि इथल्या मातीतल्या लोकप्रतिभेला विसरलो. त्यातल्या मिथकांना, मिथकांमधल्या अद्भुताला नाकारत मार्केझच्या मॅजिकल रिअलिझमची चर्चा करत राहिलो. लोकसाहित्य हा विषय अभ्यासकांपुरता मर्यादित झाला. तो मुख्य प्रवाहाचा भाग बनला नाही. इथल्या ज्ञानव्यवहारावर कायम उच्चजातीयांचं प्रभुत्व होतंच, त्यातूनच उच्चजातीयांची संस्कृती हीच मुख्य प्रवाही संस्कृती बनलेली होती. त्यामुळे त्यांच्या सांस्कृतिक राजकारणात अभिजनांचं साहित्य आणि संस्कृती या बाबी

**(पृष्ठ क्रं. १८ पहा)**



# आजचा काळ आणि आपण

गणेश विसपुते
९८९००६१४२१

**दि. २३ व २४ एप्रिल २०२२ रोजी उदगीर (जि.उस्मानाबाद) येथे १६वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन झाले. संमेलनाचे अध्यक्ष गणेश विसपुते यांचे अध्यक्षीय भाषन वाचकांसाठी या अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करत आहोत.**

मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

गेल्या दोन दशकांहूनही अधिक काळ कार्यरत असलेल्या विद्रोही सांस्कृतिक चळवळीनं त्यांच्या यंदाच्या १६व्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी मला निवडून इथं बोलण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहे. दरम्यानच्या या दोन दशकात झालेल्या विद्रोही साहित्य संमेलनांचे मातब्बर अध्यक्ष बाबुराव बागुल, वाहरु सोनवणे, तुळसी परब, यशवंत मनोहर, संजय पवार, जयंत पवार, प्रल्हाद लुलेकर यांच्यासह सर्व पूर्वाध्यक्षांचा मी आदरपूर्वक उल्लेख करतो. या सर्व संमेलनांमध्ये त्या त्या काळात समाजाला आणि लेखकाला पडणाऱ्या प्रश्नांची अर्थपूर्ण चर्चा झालेली आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळ ही गेली २३ वर्षं चालू आहे. त्यांच्या बोधचिन्हातच समतेला होकार, विषमतेला नकार हे सूत्र असल्याचं आपल्याला दिसेल.

वर्चस्ववाद, पुरुषसत्ताकवाद, भांडवली मूल्यं यांच्या विरोधात ही सांस्कृतिक चळवळ आहे. म. फुल्यांनी साहित्य संमेलनाबाबत 'त्यात अखिल मानवाचे हित सापडत नाही,' असं म्हटलं होतं, त्यात त्यांना त्याकाळात जी सबळ कारणं दिसली होती, तीच आताही मौजुद आहेत असं मला वाटतं. समाजातल्या विविध स्तरांना, भाषा-बोलींना, जाती-जमातींना व्यापकपणे सामावून घेतलं गेलं पाहिजे. दुही आणि बेकीला विरोध करणं, एकसूरी अभिव्यक्तीला नाकारणं यासाठी दलित, भटके विमुक्त, आदिवासी, कष्टकरी, स्त्रिया आणि निराश झालेला तरुणवर्ग या सगळ्यांचे आवाज उमटवण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध समांतरपणे प्रयत्न व्हायला हवेत. म्हणून अशी वेगवेगळी बहुआवाजांना सामावून घेणारी संमेलनं होत राहाणं गरजेचं आहे.

आजचा काळ पाहाता मूलभूत मानवी मूल्यं, लोकशाहीची पायाभूत तत्त्वं आणि कल्याणकारी राज्याची कल्पना यांनी निगुतीनं विणलेल्या वस्त्राची वीण केवळ उसवलेलीच नाही तर त्याच्या चिंध्या-धांदोट्या होतांना आपण पाहात आहोत. हे सगळं बोलण्याचा अवकाशही उघडपणे आज संकोचत जात असतांना ती संधी मला मिळत आहे. म्हणून इथं येण्याचा आनंद अनेक पातळ्यांवरचा आहे.

ज्या मराठवाड्यात हे संमेलन होत आहे तिथल्या भूमीशी माझी जन्मानं नाळ बांधलेली आहे. ज्या बहुरंगी संस्कृतीतलं इथलं वैविध्य पाहात आम्ही वाढत होतो त्यात मराठी गद्याला नवा चेहरा देणारे चक्रधरांसारखे महानुभाव होते, हिंदू-तुर्क संवाद लिहिणारे एकनाथ होते, ज्ञानेश्वर, जनाबाई, बहिणाबाई, नामदेव असे वारकरी परंपरेतले संत होते, मराठीच्या कवितेची अभिमानास्पद ओळख सांगता येईल असे शेख महंमद होते. सूफी संप्रदायातले थोर शायर आणि ज्यांनी दखनी उर्दूचा पाया घातला त्यावली औरंगाबादी यांच्याबद्दल तर आवर्जून सांगायलाच पाहिजे. ज्ञानेश्वरांनी संस्कृतविरुद्ध जसं बंड केलं तसंच वलीसाहेबांनीही दरबारी फारसी न वापरता आपली स्वतःची भाषा गढली. त्यांच्या काव्यात मराठी, उर्दू, संस्कृत हिंदीचं मिश्रण होतं. दखनी उर्दूचा आणि भारतातल्या गझलचा पाया त्यांनी घातला असं म्हटलं जातं. त्यांना वली सूरती किंवा वली गुजराती या नावांनीही ओळखलं जातं. कारण नंतर ते गुजरातेत स्थायिक झाले होते. सर्व धर्मांनी परस्परांना आदर आणि प्रेम देण्याची तिथली पद्धत त्यांना इतकी भावली की ते गुजरातेच्या प्रेमात पडले. त्यांना एकदा दिल्लीला जावं लागलं होतं, तेव्हा आपल्या लाडक्या भूमीच्या विरहानं ते दुःखी झाले होते. (गुजरात के फ़िराक़ सूं है ख़ार ख़ार दिल । बेताब है सिने मिनी आतिश बहार दिल।) अर्थात ही वेगळ्या काळातल्या गुजरातची कथा आहे. २००२ मध्ये या महान कवीची अहमदाबादेतली मज़ार एके रात्री गुपचूप उद्ध्वस्त करून रातोरात त्यावर सिमेंटचा रस्ता बांधला गेला. हा मला वलींशीगुजरातेशीला, आताच्या हिंसक असहिष्णू काळाशीजोडणारा दुवा आहे. आणि त्याचप्रमाणे सिराज औरंगाबादी हे सुद्धा वलींनंतरचे १८व्या शतकातले श्रेष्ठ सूफी कवी होते. त्यांच्या ग़ज़लमधला हा शेर म्हणजे आजच्या काळातल्या उन्मादात बधिर झालेल्या आणि दृष्टी गमावून बसलेल्या लोकांसाठीच लिहिलेला आहे की काय असं वाटतं. त्या दोन ओळी अशा आहेतः

आलम-ए-दीवानगी क्या ख़ूब है
बे-कसी का वहाँ किसी कूँ ग़म नहीं

तर संस्कृतीच्या या महाप्रवाहात या सगळ्यांतून वाहात आलेल्या खनिजांच्या आणि मूलद्रव्यांच्या पाण्यावर आम्ही

वाढत गेलो. अंबाजोगाईच्याच दासोपंतांनी संस्कृतच्या तुलनेत मराठी कशी विस्तारशील आहे हे सांगतांना, 'संस्कृतें 'घटु' म्हणती । आता तया घटांचे भेद किती।' असं म्हणत एका 'घट' या शब्दासाठी मराठीत हारा, डेरा, रांजणु, मुढा, पगडा, आनु, सुगड, तौली, सुजाणु, घडी, घागरी, घडौली, आळंदे, वाचिकें, बौळी, चिटकी, मोरवा, पातली असे अनेक शब्द आहेत हे सांगत–'एके संस्कृतें सर्व कळे । ऐसे कैसेन ?' असा प्रश्न विचारलेला आहे. १९२५सालानंतर भाषाशुद्धीवाल्यांना हे कळते तर मराठीचेही अधिक भले झाले असते.

मराठवाडा हा विविध संप्रदायांचा समन्वय झालेला प्रदेश आहे. महानुभाव संप्रदाय, वारकऱ्यांचा भक्तिसंप्रदाय, सुफी संप्रदाय, वैष्णव, जैन आणि बौद्ध तसंच वचन साहित्याची धाराहीतिथे नांदलेली आहे. इतिहासानं या भूमीला अनेक भाषा, धर्म, पंथ आणि विविध दर्शनांचं एकजीवीकरण करण्यासाठी निवडलं होतं. हा या सगळ्या गोष्टींचा मेल्टिंग पॉट होता. भक्ती आणि सूफी संप्रदायांतील विचारांचा इथं मनोरम समन्वय झालेला दिसतो. संत एकनाथांचे गुरु जनार्दनस्वामीं हे शेख महंमदाचे गुरुबंधू होते. हे सूफी संत चांद बोधले यांचे शिष्य होते.  सूफी दर्शनाचा प्रभाव त्यांच्यावर झाला असणार. एकनाथांनी धर्मातील  कर्मकांड, विषमता यावर कोरडे ओढलेले आहेत. त्यांनी 'हिंदू-तुर्क संवाद' या स्फुटातते अखेरीला हिंदू-मुस्लीम ऐक्याचं सूत्रच सांगतात. ऐक्यवाक्य विवाद । विवादीं जाहला अनुवाद । एका जनार्दनीं निजबोध । परमानंद दोहींसी ।। असं म्हणून ते कबीरवाणीशी आपलं नातं सांगतात. बीड जिल्ह्यातल्या धारूर येथे  जन्मलेले शेख महंमद मराठी संतकाव्य परंपरेतले महत्त्वाचे कवी आहेत. त्यांचे वडील म्हणजे जालन्याचे राज महंमद. त्यांचे शिष्य मलंग चांद बोधले. त्यांचं मूळ नाव चंद्रभट बोधले असं होतं. त्यांनी सूफी संप्रदायाची दीक्षा घेतली होती. शेख महंमद त्यांचे शिष्य. त्यांचे आणखी एक शिष्य होते जनार्दनस्वामी. संत एकनाथांचे गुरु म्हणजे हेच ते जनार्दन स्वामी. दौलताबादच्या किल्ल्यावर त्यांची समाधी आहे.

माझा एक आवडता ग्रंथ आहे बृहत्कथासरित्सागर. त्याची गोष्ट आपणांस माहीतच आहे की महादेवानं पार्वतीच्या हट्टाखातर अनंत काळपर्यंत चाललेली एक प्रदीर्घ गोष्ट एकांतात ऐकवली होती. कुतूहलापोटी ती गोष्ट महादेवाचा लाडका गण पुष्पदंतानं मायावी रूप घेऊन, चोरून ऐकली. हे पार्वतीला कळल्यावर तिचा कोप झाला आणि त्याचवेळी माल्यवान हा दुसरा गण पुष्पदंताची रदबदली करू लागला म्हणून तिने दोघांनाही पृथ्वीवर मनुष्यरूपात जाण्याची शिक्षा दिली. ही कथा पहिल्या लंबकात येते. पुढे पुष्पदंतानं कौशांबीत वररूचीच्या (कात्यायनाच्या) रूपाने जन्म घेतला तर माल्यवान हा गुणाढ्य बनून प्रत्यस्थानी (प्रतिष्ठानी) म्हणजेच इथल्या, मराठवाड्यातल्या पैठण या नगरात सातवाहनाच्या दरबारात प्रिय झाला होता. राजाला संस्कृत येत नाही म्हणून राणीनं हिणवल्यावर त्या राजानं संस्कृत शिकायचं ठरवलं. हे शिकण्यासाठी सहा वर्षं लागतील असं गुणाढ्यानं सांगताच दरबारातल्याच शर्ववर्मा या पंडितानं त्याला आव्हान देत हे काम सहा महिन्यात होऊ शकतं असं म्हटल्यावर गुणाढ्यानं म्हटलं, की असं झालं तर मी संस्कृत, प्राकृत वा देशी भाषेतून अवाक्षरही बाहेर काढणार नाही. तिकडं शर्ववर्मानं चंडिकेला माझं म्हणणं खरं होवो अन्यथा मी जीव देतो असं म्हटल्यावर त्याच्या मनासारखं झालं, पण गुणाढ्याला पुढे मौन पाळणं भाग होतं. पैठण सोडून विंध्याचलात फिरतांना त्याला लक्षात आलं, तिथं यक्ष, भूत पिशाच्चं त्यांच्या पैशाची भाषेत बोलताहेत तेव्हा त्यानं ती भाषा शिकून बृहत्कथासरित्सागर लिहिला. तो त्यानं रक्तानं लिहिला. त्याच्या शिष्यांनी तो पैठणला नेऊन सातवाहनाला दाखवल्यावर त्यानं तो एकतर पैशाची भाषेत लिहिलेला म्हणून आणि तोही रक्तानं लिहिलेला म्हणून परत भिरकावल्यावर गुणाढ्यानं त्याचं एकेक पानवाचत आगीत जाळायला सुरुवात केली. जंगलातले पशू-पक्षी खाणं-पिणं विसरून ते स्तब्धपणे ऐकत होते. इकडे सातवाहनाला लक्षात आलं, की भोजनात मिळणारं मांस हे सुकलेलं येतंय तेव्हा त्यानं चौकशी केल्यावर त्याला हा प्रकार कळला की रानातले प्राणीमात्र ग्रंथ श्रवण करीत आहेत. त्यानं रानात येऊन गुणाढ्याची क्षमा मागितली. तोवर गुणाढ्यानं साठ लाख श्लोकांपैकी पन्नास लाख श्लोकांची पानं गुणाढ्यानं जाळून टाकली होती. नंतर आपल्याला उपलब्ध झालेला सोमदेवानं रचलेला बृहत्कथासरित्सागर हा ग्रंथ त्या उरलेल्या दहा लाख श्लोकांवरचा ग्रंथ आहे. या संपूर्ण कहाणीशी संबंधित असलेला पूर्वायुष्यातला महादेवाचा लाडका गण माल्यवान उर्फ या मौलिक ग्रंथाचा कर्ता असलेल्या गुणाढ्याची ही कथा आपल्या या मराठवाड्याच्या भागाच्या नेपथ्यात घडलेली आहे, याचा मला आनंद झालेला आहे. त्याहूनही हा बृहत्ग्रंथाचा लेखक संस्कृत, प्राकृत आणि देशी भाषा नाकारून वेगळ्याच पैशाची भाषेत आपली कालजयी कृती निर्माण करतो हे मला त्याच्या बंडखोरीचं उदाहरणच वाटतं. पण त्याचबरोबर प्रस्थापितांच्या भाषाव्यवस्थेला लाथ मारून आपण आपलं कर्तृत्व घडवण्यासाठी लेखकाला मार्गदर्शक असं रूपकही वाटलेलं आहे.ह्याच कथासरित्सागरात आपल्याला गोष्टीवेल्हाळ अशा बहुजनांच्या ज्ञानपरंपरेचं मूळ सापडतं.

विसाव्या शतकात महाराष्ट्रातील इतर बरेचसे प्रांत जसे ब्रिटिश अंमलाखाली होते, आणि त्यामुळे का असेना शिक्षण आणि इतर साधन सुविधा तिकडं उपलब्ध होऊ शकल्या, तशा मराठवाड्यात होऊ शकल्या नाहीत. मराठवाडा हा निजामीतला भाग होता. पण विसाव्या शतकाच्या मध्यापासून औरंगाबादला

डॉ.आंबेडकरांनी उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय सुरु केलं. त्यांनी रुजवलेल्या शिक्षणाच्या विचारानं मराठवाड्यात हजारोंना प्रेरणा मिळाली. दलित कवितेचा आद्यस्वर असलेले नांदेडचे हरिहर सोनुले यांच्या कवितांनी विसाव्या शतकाच्या तिसऱ्या–चौथ्या दशकापासून मराठवाड्याच्या कवितेत खऱ्या अर्थानं आधुनिक कविता आणली असं म्हणता येतं. उर्वरित महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात तेव्हा साहित्य व्यवहार रुळायला लागून अर्धशतक झालेलं होतं.

**आजचा काळ आणि आपण**

भारतात गेली शेकडो वर्षं इथल्या संस्कृतीतल्या या वैविध्यानं आपल्याला संपन्न आणि समृद्ध केलेलं आहे. आपल्याला एकरंगी होऊन गरीब होणं चालणार नाही. त्यासाठी आज बोलणं आणि विचार करणं या मूलभूत मानवी लक्षणांचा आपल्याला विसर पडता कामा नये. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात आजच्या काळाइतका हिंसेचा, द्वेषाचा, क्रौर्याचा, दहशतीचा आणि दमनाचा दुसरा काळ नाही. गेल्या काही वर्षांमध्ये माणसांच्या मरणांच्या इतक्या बातम्या आपण नियमितपणे ऐकतोय की आता बधीर होऊन त्या अक्षरांपलीकडचं क्रौर्य समजायची संवेदनाच नष्ट होऊन जाईल की काय असं वाटतं. ग़ालिब म्हणतो तसं, 'मुश्किलें इतनी पड़ी मुझपर की आसां हो गई' असं म्हणण्याची आपल्यावर वेळ न येवो.

गेली काही वर्षं आपण किती विचारकांच्या हत्या पाहिल्या, पत्रकारांना मारलं गेलेलं पाहिलं, वस्त्या जाळल्या जाण्याच्या बातम्या वाचल्या, आदिवासी कार्यकर्त्यांच्या, माहिती अधिकाराची कामं करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हत्या झालेल्या वाचलं, खून बलात्कार, झुंडीनं एकेकाला गाठून मारल्याच्या बातम्या वाचल्या. निडरपणे प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना–विद्यार्थिनींना, निरपराधांना तुरुंगात डांबलं जाण्याच्या बातम्यांचे ओघ संपत नाहीत. गेल्या सहा–सात वर्षांत पुस्तकांवरची बंदी, विखारी प्रॉपोगंडा असलेली पुस्तकं शाळेत सक्तीची करणं, पेरुमल मुरुगन असेल किंवा बशीर अहमद अशा कितीतरी लेखकांवर दडपणं आणणं, सेन्सॉरशिप, गिरीश कार्नाड, यु आर अनंतमूर्ती, विजय तेंडूलकर अशा आवाज उठवणाऱ्या ज्येष्ठ बुद्धिमान लेखकांची किंवा अमर्त्य सेन यांच्यासारख्या विद्वानांची हेटाळणी आणि गुंड–माफिया–लुटारूंना संरक्षण आणि समर्थन मिळणं, निरपराध्यांच्या हत्येच्या आरोपात तुरुंगात असलेल्यांना शौर्य पुरस्कार जाहीर करणं, हिंदू स्त्रियांनी किमान चार मुलं उत्पन्न करावीत असं म्हणणं, विज्ञानाच्या बाबतीत अतोनात हास्यास्पद विधानं करत राहाणं, जनविरोधी कायद्यांचा धाक दाखवत राहाणं अशा घटना घडत आलेल्या आहेत. एरवी न ऐकलेली झज्जर, दादरी, उधमपूर, मुझफ्फरपूर, उन्नाव, कठुआ, लखीमपूर, बुलंदशहर अशा गावांची नावं तिथल्या हत्याकांडांमुळे आपल्या स्मृतीत जाऊन बसली आहेत. कश्मिरमधल्या भटका धनगर असलेल्या बकरवाल समाजातल्या लहान मुलीवर अनेक जण मंदिरात नृशंसरित्या बलात्कार करून तिला मारून टाकतात. तिला न्याय मिळतो की नाही, कळत नाही पण ती जिवानिशी जातेच. लखीमपूर सारख्या गावातल्या मुलीवरच्या बलात्कारांच्या घटना, शेतकऱ्यांना चिरडून मारणाऱ्याच्या गावातच त्याचा पक्ष विजयी होणं आणि गुन्हेगार मोकळे सुटणं हे पाहून असा प्रश्न पडतो, की– केवळ अराजकाचं टोक गाठलेल्या फाशीवादातच हे खरं तर होऊ शकतं ना. परंतु ते इथलं वास्तव बनलेलं आहे. रोहित वेमुलासारखे संवेदनशील तरुण आत्महत्या करतात. नजीबसारखा तरुण विद्यार्थी अदृश्य होतो, पत्रकारांच्या तर किती हत्या गेल्या काही वर्षांत झाल्या याची आकडेवारी पाहायची असेल तर ती युनेस्कोच्या वेबसाईटवर सहजी उपलब्ध आहे. त्यावरून आपण पत्रकारांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याच्या निर्देशांकांत जगातल्या देशांच्या यादीत कुठे पोहोचलो आहोत हे कळेल. ऑक्सिजन अभावी लहान लहान ७० मुलं मेली, अकराशे गर्भवती स्त्रियांना केवळ दवाखान्याची सुविधा मिळाली नाही, जीव गमवावे लागले. मदत करू पाहात होते, ते डॉक्टर केवळ अन्यधर्मीय आहेत म्हणून त्यांना दीर्घकाळ तुरुंगात डांबले गेले. शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक देऊन थंडी–पावसात–उन्हात वर्षभर रस्त्यावर ठेवलं गेलं. त्यांच्या वाटेत खिळे ठोकले आणि त्यांना देशद्रोही म्हटलं गेलं. जे हत्यारे आहेत, जे अत्याचार करताहेत त्यांचा सन्मान होत आहे, त्यांची तुरुंगातून लगेचच सुटका होते. 'मारेंगे काटेंगे' अशी उघड धमकी देणारे, 'शस्त्रं बाळगा आणि मारा' असं धर्मसंसदेत मग्रुरीनं म्हणणाऱ्यांची महिनाभरात तुरुंगातून सुटका होते तर 'द्वेषाचा मुकाबला आम्ही प्रेमानं करू' असं म्हणणाऱ्या तरूण मुलाला वर्ष–दोन वर्ष कोठडीत अडकवलं जात आहे. लोकशाहीची पायाभूत मूल्यं आणि संविधानातले निर्देश दिवसाढवळ्या पायदळी तुडवले जाताहेत. दडपशाही आणि सेन्सॉरशिपचं भय इतकं वाढवलं गेलं आहे, की सार्वजनिक शैक्षणिक संस्थांमधील अधिकारीवर्ग स्वतःहूनच रांगायला तयार झाला आहे. सगळ्या देशातली संपत्ती केवळ दोन–चार लोकांच्याच हातात असावी, असे प्रयत्न होत आहेत की काय असा संशय घ्यायला भरपूर जागा आहे. भडकावू, भाडोत्री आणि भाटगिरी करणाऱ्या पत्रकारांना पूर्ण स्वातंत्र्य तर आहेच, शिवाय त्यांना सत्ता वर्तुळातल्या आतल्या दालनापर्यंत मुक्त प्रवेश आहे. बँका लुटा, देशाबाहेर पलायन करा आणि अभय मिळवा असा भ्रष्टाचाऱ्यांना संदेश मिळत आहे. भूक, बेरोजगारी, महागाई या प्रश्नांकडे आडदांडपणे दुर्लक्ष केलं जात आहे. शिक्षणाचा पूर्ण विध्वंस करण्याचं व्रत घेतल्यासारखं

वागणं दिसत आहे. जगभरच्या भुकेच्या निर्देशकांच्या तालिकेतल्या ११६ देशांत भारत कधी नव्हे तो १०१वा क्रमांकावर आला आहे. दरवर्षी देशातल्या लोकांच्या सरासरी आनंदाचं मापन करणारी अशीच एक तालिका प्रसिद्ध होत असते. १४६ देशांच्या यादीत आपण १३६व्या क्रमांकावर फेकले गेलेलो आहोत. महामारीनं लक्षावधी माणसं मेली त्याहूनही अधिक मेली ब्रेकिंग न्यूजच्या फवाऱ्यानं, तुगलकी फर्मानांनी, टाळं लावून ठेवलेल्या गोदामांमुळे आणि अडवून ठेवलेल्या उपचारांमुळे.रांगांमध्ये, रस्त्यांवर आपल्याच देशात मूलभूत अधिकारांपासून बेदखल होत. आजचा काळ म्हणजे मुठभर लोकांच्याकडे अपरंपार संपत्ती आणि असीम शक्ती तर दुसरीकडे बहुसंख्य असे आहेत, की विकलता आणि शबलता हेच त्यांचं आयुष्य झालेलं आहे.

**आपण स्मृतिभ्रंशाच्या काळात जगत आहोत.**

'माणसाचा वेळच संपून गेलाय'

अशी दिलीप चित्र्यांच्या कवितेतली एक ओळ आहे. सामूहिक स्मृतीचं मेमरी कार्ड कालबाह्य झालंय. इतक्या वेगानं, भराभर दृश्यं बदलताहेत की आपल्याला विचलित करून गेलेलं आदलं दृश्य कोणतं होतं हेही सामूहिक स्मृतीच्या मेमरी कार्डात उमटतनाही. अगदी अलीकडे आपण पाहिलेले शेतकऱ्यांच्या अनवाणी आणि जखमी पायांनी भरून गेलेले राजधान्यांपर्यंतचे रस्ते निर्मनुष्य झालेले आहेत. वसतिगृहात जिथं विद्यार्थ्यांचं रक्त सांडलं होतं, ती वसतिगृहं, ते परिसर– सगळीकडे शुकशुकाट आहे. ज्या वस्त्यांमधली घरं जाळली गेली, तिथली राख थंड झाली असेल, तिथं कधीतरी राहिलेली, जगण्यासाठी किडूक मिडूक कामं करीत जगणारी माणसं कधीच कबरीत जाऊन निजली, त्यांची माती झाली.मुंग्या–किटकांनी खाऊन टाकलं त्यांना. निवारा नाही आणि अन्नाची शक्यता नाही म्हणून हजारो मैल पायी निघालेल्या कामगारांच्या हजारोंच्या दिंड्या आपल्याच विठोबा नसलेल्या पंढरपूराकडे निघालेल्या दिसल्या.

दोन–दोन हजार किलोमीटरचा प्रवास करून आपल्या गावात परतलेला एक दमून भागलेला माणूस आपल्या घराच्या गंजलेल्या दाराची कडी काढतांनाचं एकही दृश्य दिसलं नाही. अन्नछत्रांसमोर चूपचाप, अंतर राखून उभे राहिलेल्यांकडे पाहातांना असं वाटत होतं की, ते जगाच्या अंतापर्यंत तिथं रांगेत राहावंलागण्याच्या स्थितप्रज्ञतेनं तिथं उभे आहेत. धूसर झालेल्या आशांमध्ये स्थितप्रज्ञता बधिर होऊन थिजून जाते. परवा परवापर्यंत सतत आपल्या डोळ्यांसमोर दिसणारी ही सगळी दृश्यं कुणाच्याही लक्षात न येता हळूहळू अदृश्य होत गेली.

सामान्यांची माहिती–बोटांचे ठसे, डोळ्यांची छबी आणि इतर सगळी माहिती–त्यांनाच विकून गब्बर होणाऱ्या अवाढव्य बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातचलाखीच्या खेळाचा हा काळ आहे. वेगवान तंत्रज्ञानानं मानवी मेंदूचा कब्जा घेतल्यावर करूणा, शील, प्रज्ञा, मैत्त यांचं महत्वच लक्षात येईनासं होतं. कोणालाही खतम करून टाकण्याचे डिजिटल खेळ खेळणं, हेच व्यसन लागलेले सत्ताधारी आणि तोच खेळ आपापल्या सेलफोनवर खेळणारे आबालवृद्ध असा सारीपाट जगभर सज्ज आहे. ह्या विरूप नेपथ्यात आपण सगळे अंताक्षरी खेळू, इ. बाष्कळ उपदेश गंभीरपणे केले जातात. आणि त्या अंताक्षरीच्या एका आवर्तनात काही नद्या, काही पर्वत– त्यातल्या खनिजांसकट आणि लाखो एकर जमीन धरणं, महामार्ग, अधिक वेगवान महामार्ग ह्यासाठी परस्पर विकली जाते. चर्चेशिवाय कामगार कायदे रद्द होतात आणि तरूण मुलं आपल्या सुरक्षित भविष्याच्या चिंतेऐवजी धार्मिक चिन्हांच्या मारामारीत गुंतून जातात. असुरक्षित भविष्य असणारे संपूर्ण जगणंच अनिश्चित असणारे करोडो लोक हेच आजच्या श्रमिकांचं रूप आहे. आता ते रोज त्याच ठिकाणी कामावर जाणारे कामगार नाहीत–तर ते प्रिकॅरियट बनले आहेत–त्यांच्या आर्थिक वास्तवाची भरपूर चर्चा दिसते. परंतु, ही अस्थिरता, असुरक्षितता जगभर एक असुरक्षित, अस्थिर मन निर्माण करते, हे लक्षात घ्या.

माणसांना मारणं आणि सुटून उजळ माथ्यानं अभिमानानं मिरवणं ही रीत झाली आहे. भारतात ट्रिलिअन डॉलर्सचे मालक आहोत, हे सांगितलं जातं आणि त्याचं दुसरं टोक अंधारात हरवलेलं आहे हेकुणाला लक्षात येत नाही.

हंगर नावाची एक शॉर्टफिल्म आहे. त्यात एक ओंगळ ढेरपोट्या दाखवला आहे. तो सतत वस्तू खात सुटलेला आहे. तो पाशवी रीतीनं समोरच्या टेबलावरचे खाद्यपदार्थ खातो, टेबल खातो, अन्न देणाऱ्या मुलीला खातो. तो सतत खात आहे. तसेच आता खा–खा सुटलेले प्राणी जमिनी खाताहेत, सामान्यांच्या बचती खाताहेत, शेतकऱ्यांच्या विम्याचे पैसे खाताहेत, जंगलं खाताहेत, आदिवासींना लुटून खाताहेत, पैसे तरखात आहेतच, माणसं खाताहेत, निसर्ग ओरबाडून अधाशासारखा खाताहेत. जे जे दिसेल ते ओरबाडत खात राहाणं, हीच एक अमानुष क्रिया फक्त करण्यासाठी आपण जन्मलो आहोत, असं समजून हे चाललेलं आहे. अडीचेक हजार शेतकरी वर्षाला आत्महत्या का करतात ही साधी गोष्ट कुणाला जाणवतही नाही यावर कोणाचा विश्वास बसेल? विशेष म्हणजे काहीही केलं तरी आपलं काहीही वाकडं होत नाही, याची उद्दाम मग्रुरी आहे.

**क्रमशः**

(लेखक प्रसिद्ध कवी, चित्रकार, अनुवादक आहेत)

●



# अनिष्ट रूढी परंपराविरुद्ध एल्गार करणारा राजा

डॉ. गिरीश मोरे
९८२२४९३१७१

भारतीय इतिहासाच्या नव्या पर्वाची सुरुवात म्हणजे राजर्षी शाहू महाराजांचा उदय. पारंपरिक व्यवस्थेतून आधुनिक समाजव्यवस्थेकडील प्रवास म्हणजे राजर्षी शाहूंचा कार्यकाळ. समाजहिताच्या आड ज्या ज्या बाबी येतात त्या त्या समूळ नष्ट करण्याचे धाडसी कार्य राजर्षी शाहूंनी केले. एखादे राष्ट्र निर्माण होण्यासाठी आवश्यक असलेली धोरणे त्यांनी पूर्णत्वास नेली.

राजेशाहीचा काळ असताना आपले राजेपद जाईल, याची भीती त्यांनी बाळगली नाही. आपल्या संस्थानासह ब्रिटिशकालीन भारताला आधुनिक बनविण्याचे अवघड काम त्यांनी केले. मूठभर लोकांसाठी नव्हे तर बहुजनासाठी आपली सत्ता त्यांनी पणास लावली. त्यामुळेच महात्मा गांधी म्हणाले होते, ''त्यांनी खरा स्वराज्याचा पाया घातला...'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या पत्रात राजर्षी शाहूंना, 'सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ' असे म्हणतात.



राजर्षी शाहूंनी शेतकरी, कामगार, स्त्रिया, दलित, अस्पृश्य, भटके विमुक्त, कलावंत, साहित्यिक, मल्ल, नोकरदार, अपंग, रोगी, अनाथ, विद्यार्थी अशा किती तरी घटकांसाठी विविध योजना आखून त्या प्रत्यक्षात अमलात आणल्या. त्यासाठी समाजविघातक रूढी, प्रथा, परंपरा, चाली नष्ट केल्या. त्यांना नवे पर्याय निर्माण केले. समाजात घुसलेल्या अंधश्रद्धा संपवून टाकल्याशिवाय नवा समाज निर्माण होणार नाही, याची त्यांना खात्री पटली होती. त्यामुळेच 'राजर्षी शाहू महाराज म्हणजे प्रथा परंपरांविरुद्धचा एल्गार' होय. एल्गार म्हणजे निकराचा हल्ला किंवा समूळ नष्ट करण्यासाठी दिलेला लढा. २६ जून १८७४ रोजी राजर्षी शाहूंचा जन्म झाला. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांना राज्याधिकार मिळाला. तिथपासून ते ६ मे १९२२ म्हणजे शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी आपली एकूण २२ वर्षांची कारकीर्द ही केवळ अनिष्ट रूढींचे निर्दालन करण्यासाठी घालवली.

**रूढींची विघातकता**

रूढी म्हणजे प्रचलित असलेली, सामान्य झालेली किंवा जाहीर झालेली विचार-वर्तनाची वहिवाट. रूढी या लोकमानसातून निर्माण झालेल्या असतात. त्यामागे तत्कालीन अनेक समज-गैरसमज कारणीभूत असतात. बहुधा हितसंबंधांचे राजकारणच त्यात असते. समाजव्यवस्थेत प्रस्थापित झालेले किंवा सत्तेत असलेले लोक धर्माचा आधार घेऊन त्या त्या रूढी नकळत लादतात. रुढींच्यामागे जशी व्यवस्था असते तसे एक राजकारणही असते. धर्माच्या नावाखाली शोषण करण्याचे एक साधन म्हणूनही रूढीचा अवलंब केला जात असतो.

रूढी चांगल्या असतात की वाईट, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. समाजव्यवस्थेत ज्यांना रूढींचा फायदा होतो, त्यांना प्रत्येक रूढी वा परंपरा चांगलीच वाटते. ज्यांना रूढीची झळ बसते, त्यांना ती अनिष्ट वाटते. किंबहुना अनिष्ट वाटू नये यासाठी देव आणि धर्माचा मुलामा चढवला जातो. रूढी ह्या मनुष्यनिर्मित असल्या तरी त्यामागे परमेश्वर, अलौकिक शक्ती किंवा पाप-पुण्य असल्याचे भासवले जाते. त्यातले राजकारण न कळल्यामुळे सर्वसामान्य अज्ञानी माणसे त्यात गुरफटून जातात. रूढींचे पालन करण्याला ते सर्वोच्च स्थान देतात. त्यातल्या बऱ्या-वाईट बाबींकडे दुर्लक्ष केले जाते.

भारतीय समाजव्यवस्थेत अशा किती तरी रूढी निर्माण झाल्या आहेत आणि निर्माण होत आहेत. रूढींना प्रथा-परंपरा असेही म्हटले जाते. उदा. जातीप्रथा, अस्पृश्यता, सतीप्रथा या प्रथा-परंपरांमुळे अनेक समूहांवर वेगवेगळ्या बंदी लादण्यात आल्या. या बंदींना पुढे रूढींचे स्वरूप प्राप्त झाले. उदा. व्यवसायबंदी, शिक्षणबंदी, विवाहबंदी, भोजनबंदी. अशा विविध बंदी वा प्रथा परंपरा या देश आणि समाजाच्या विकासात फार मोठा अडथळा ठरत असतात. राजर्षी शाहूंनी असे अनेक अडथळे नाहीसे केले. रूढींची विघातकता त्यांनी जाणली होती. त्यामुळेच त्याविरुद्ध त्यांनी कठोर कायदे केले. आपल्या रयतेला अनिष्ट रूढीतून अलगद बाहेर काढणारे राजर्षी शाहू समजून घेतले पाहिजेत.

**अनिष्ट रूढी परंपरांचे निर्दालन**

यशवंतराव जयसिंगराव घाटगे म्हणजे राजर्षी शाहू महाराज चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर करवीरच्या भोसले गादीवर दत्तक गेलेले राजर्षी शाहू हे गुरू एस. एम. फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली अनुभवसंपन्न झाले. १८८६ ते १८९२ या काळात त्यांनी गुरुसमवेत विविध स्थळांना भेटी दिल्या.

१८९० मध्ये राजर्षी शाहू उत्तर भारताच्या सहलीवर गेले.

प्रवासात नाशिक या ठिकाणी पंड्यांनी दक्षिणा मागण्यासाठी त्यांच्यापुढे गर्दी केली. यात्रेकरूंच्या वंशावळीच्या वहीत सही करून दक्षिणा देण्याची मागणी केली. 'दान करा. पुण्य करा. पितरांचे आशीर्वाद घ्या', असे म्हणणाऱ्या लोभी, लबाड पंडे- पुरोहितांच्या वृत्तीमुळे ते त्रस्त झाले. सही करण्यास त्यांनी साफ नकार दिला. पुढे बनारस व अलाहाबादला ते गेले. तिथेही पंड्यांनी त्यांच्याभोवती गर्दी केली. गंगा नदीत स्नान केले. पवित्र मानलेल्या मणिकर्णिका कुंडात साठलेली घाण पाहून मात्र त्यांनी स्नान करण्यास नकार दिला. कलकत्त्याला कालिकादेवीच्या मंदिरात बकऱ्यांचा बळी देण्याची प्रथा पाहून ते अस्वस्थ झाले. मथुरेला आल्यानंतर पुन्हा ते पंड्यांच्या तावडीत सापडले. तिथेही त्यांनी स्वतःची सुटका करून घेतली. दानधर्मासारख्या प्रथांना नकार देऊन आधुनिक जीवनाचा आरंभ त्यांनी विद्यार्थिदशेतच केला होता. भविष्यात आपल्या संस्थानात अशा कोणत्याही अनिष्ट रूढी पाळल्या जाणार नाहीत, याची काळजी त्यांनी घेतली. प्लेगसारखे साथीचे रोग लोकांच्या अज्ञानामुळे आणि अंधश्रद्धेमुळे पसरतात. त्यावर वैद्यकीय उपचार न करता नवस, अंगारेधुपारे, देवऋषी यांचा आधार घेतला जातो. १८९८ आणि १८९९ या दोन वर्षात महाराष्ट्रासह करवीर राज्याला प्लेगने त्रस्त केले होते. लोकांच्या मनातील भ्रम, दैववाद संपून प्लेगचे उच्चाटन व्हावे यासाठी राजर्षी शाहूंनी विशेष प्रयत्न केले. लोकांचे प्रबोधन करावे यासाठी ग्रामाधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांना सूचना काढली. प्लेगची माहिती देणारी हजारो पत्रके शाहूंनी खरेदी केली आणि ती गावोगावी वाटली. (सूर्यवंशी: १९८४: पृ.१२७) लोकांच्या मनातून दैववाद काढून टाकणे, प्लेगवर नियंत्रण ठेवणे आणि आपली प्रजा साथीच्या आजारांत सुरक्षित राहील यासाठी प्रयत्न करणारे राजर्षी शाहू खूप दूरदृष्टीचे होते.

पुराणोक्त आणि वेदोक्त हे प्रकरण राजर्षी शाहूंच्या जीवनात घडले. त्यातूनही ते खूप शिकले. १८९९ मध्ये धर्माच्या नावाखाली त्यांना शूद्र लेखले गेले. पंचगंगा नदीवर स्नान करण्यासाठी गेले असताना नारायण भटजीने पुराणोक्त मंत्र व स्तोत्रे म्हटली. त्याचे कारण विचारताच तो म्हणाला, ''शूद्राला पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात.'' (कीर: १९९२: पृ.८३) प्रत्यक्ष राजाला भटाने शूद्र मानले होते. अशा परंपरा पाळणाऱ्या आणि पाळायला लावणाऱ्या घटकांवर त्यांनी कठोर कारवाई केली, त्यांना पदच्युत केले.

अस्पृश्यता आणि जातिभेद या रूढी संपविणे हे राजर्षी शाहूंपुढे फार मोठे आव्हान होते. आपल्या दरबारात आणि संस्थानात अस्पृश्यता आणि जातिभेद पाळला जाणार नाही, याची काळजी त्यांनी घेतली. अस्पृश्य मानलेल्या बांधवांना उद्देशून ते म्हणतात, ''अस्पृश्य हा शब्द कोणत्याही माणसाला लावणे फार निंद्य आहे... मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत, आपले हक्क समसमान तरी खास आहेतच अशी भावना धरून आपणास पुढील कामास लागले पाहिजे.'' (भोसले १९९१: पृ.७६) राजर्षी शाहू केवळ बोलत नव्हते, प्रत्यक्ष कृतीही करीत होते. त्यांनी अस्पृश्यांसाठी शिक्षणाची सोय केली. त्यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृह काढले. २६ जुलै १९०२ रोजी मागासवर्गीयांसाठी नोकरीत ५० टक्के राखीव जागा जाहीर केल्या. स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्याची योजना आखली. महार वतनामुळे स्वाभिमान नष्ट होतो हे लक्षात येताच १८ सप्टेंबर १९१८ रोजी महार वतने रद्द करण्याचा निर्णय घेतला.

वेठबिगारी या प्रथेमुळे महार मांगांमध्ये गुलामगिरी वाढली होती. कोणतेही काम फुकट करून घेतले जात होते. या अनिष्ट चालीमुळे भाकरीच्या शिळ्या तुकड्यावर काम करावे लागत होते. राजर्षी शाहूंनी १९२० मध्ये वेठबिगार बंद केल्याचा हुकूम प्रसिद्ध केला. जर पाटलाने महार वेठीस धरला तर त्यास वतनातून कमी केले जाईल. मांगाकडून कोणतेही काम फुकट करून घ्यावयाचे नाही. (कीर १९९२ पृ.४३८) या हुकमामुळे राजर्षी शाहूंनी वेठबिगार ही अनिष्ट रूढी राज्यातून हद्दपार केली.

गुन्हेगार जमातीसाठी कायदा करून राजर्षी शाहूंनी भटके विमुक्त यांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर केले. त्यांच्यावर लादलेली हजेरी माफ केली. फासेपारधी लोकांना काम दिले. त्यांच्या घराची सोय केली. जातिभेद मोडण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी अनेक योजना तडीस नेल्या. अस्पृश्य जातीतील माणसांबरोबर ते भोजन घेत. रोटीव्यवहाराबरोबर बेटीव्यवहारही व्हावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. धनगर- मराठे यांच्यात विवाह घडवून आणण्यात ते यशस्वी झाले. १४ डिसेंबर १९१८ रोजी नवसारी (गुजरात) येथील भाषणात ते म्हणतात, ''जातीजातीत विवाहसंबंध होऊ लागल्याशिवाय जातिभेदाची तीव्रता कमी होणार नाही'' (भोसले १९९२ पृ. ६६). भारतात काही जातींमधील विधवांना पुनर्विवाह करता येत नव्हता. जुलै १९१७ मध्ये राजर्षी शाहूंनी पुनर्विवाहाचा कायदा संमत करून घेतला. त्यास रिमॅरेज रजिस्ट्रेशन लॉ असे म्हटले गेले. भ्रूणहत्या, व्याभिचार रोखण्यासाठी विधवाविवाह झाला पाहिजे, या मताचा त्यांनी पुरस्कार केला. मात्र धर्म बुडेल अशी ओरड त्याकाळी काही मतलबी लोक करीत होते, याचाही उल्लेख ते करतात. त्यामुळे आंतरजातीय विवाह, नोंदणी विवाह, पुनर्विवाह आणि विधवाविवाह यांबाबत कायदे करून राजर्षी शाहू अनिष्ट रूढी संपवीत होते, हे लक्षात घेतले पाहिजे.

सरकारी खात्यात आणि राजवाड्यावर त्यांनी अनेक अस्पृश्य नोकर नेमले. गंगाराम कांबळे यास चहाचे हॉटेल सुरू करून दिले. अस्पृश्यांना शिवणयंत्रे देऊन दरबारातील कपडे त्यांच्याकडे शिवण्यास दिले. अस्पृश्य तरुणांना वकिलीच्या सनदा दिल्या. अशा प्रकारे जातिभेद, अस्पृश्यता आणि वेठबिगार या रूढींचे निर्दालन करण्यासाठी राजर्षी शाहू सतत प्रयत्न करीत राहिले.

राजर्षी शाहूंनी 'रिलिजस ब्युरॉक्रसी' ओळखली होती. धार्मिक क्षेत्रात ब्राह्मण वर्गाची असलेली मक्तेदारी त्यांना खटकत होती. 'मनुस्मृती', 'मत्स्यपुराण', 'गरुड पुराण' यांसारखी अनेक ग्रंथ निर्माण करून बहुजन समाजाचे शोषण केले जात होते. राजर्षी शाहू अशा पुराणांना गारुडी ग्रंथ म्हणत. ज्योतिषशास्त्रात वेगवेगळ्या ग्रहांची भीती घालून कोणत्या दिवशी कोणते कार्य करावे असे सांगितले जायचे. अशा धार्मिक नियमांना त्यांनी नकार दिला. मानवहितास बाधा येईल अशा पुराणग्रंथांना, रूढी-प्रथा-परंपरा यांना त्यांनी काडीचेही महत्त्व दिले नाही.

ब्राह्मणत्व हे जातीपेक्षा गुणकर्मावर आधारित असले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. त्यामुळे ब्राह्मण वर्ग हा राजर्षी शाहूंप्रति द्वेष आणि तिरस्कार बाळगत होता. विविध पुराणे रचून स्वतःसह आपल्या संततीच्या उदरनिर्वाहाची सोय ब्राह्मणांनी केली आहे. याकडे लक्ष वेधून ते म्हणतात, ''त्यांची (ब्राह्मणांची) माझ्याशी प्रेमाची वागणूक आढळून येईल तरच मी माझ्या घरच्या देवाची पूजा व इतर धर्मकृत्ये ब्राह्मणांकडून करवून घेण्याचे चालू ठेवीन. नाही तर ब्राह्मण पुजाऱ्यांना बंद करून माझ्या घरच्या देवाची पूजा मी मराठे पुजाऱ्याकडून करवून घेईन'' (भोसले: १९९१ पृ. १७). धार्मिक क्षेत्रातील विशिष्ट जातीची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी त्यांनी केलेले कार्य आणि निर्माण केले कायदे पुढील काळासाठी उपयुक्त ठरले आहेत.

स्त्रियांच्या बाबतीत राजर्षी शाहूंनी केलेले कायदे थक्क करून सोडणारे आहेत. घरात स्त्रीचा छळ होतो. नवरा किंवा नात्यातील अनेक लोक तिचा छळ करतात. राजर्षी शाहूंनी २ ऑगस्ट १९१९ रोजी क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा प्रसिद्ध केली, त्यास 'काडीमोड कायदा' असे म्हटले आहे. (जाधव:२०१६ : पृ.१२१५) त्यात वारसा हक्काची तरतूद करून घेतली. जनक बापाच्या संपत्तीत कोणत्याही वर्णातील संततीला वारसा हक्क देऊन त्यांनी जुनाट, अन्यायी, रूढी संपवून टाकली.

स्त्रियांना क्रूरपणे वागविणे थांबवावे किंवा त्यावर प्रतिबंध बसावा यासाठी राजर्षी शाहूंनी नियम केले. त्यात क्रूरपणा म्हणजे काय, याची व्याख्या केली. जिच्या योगाने अयोग्य प्रकारची अनावश्यक शारीरिक दुःख अगर पीडा उत्पन्न होते, अगर जिच्या योगाने प्रकृतीस इजा होणेसारखे मानसिक क्लेश होतात, अगर जिच्या योगाने प्रकृतीस शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होण्यासारखी, योग्य भीती उत्पन्न होते, ती वागणूक... (तत्रैव: पृ. १२२२) यावरून राजर्षी शाहू अनिष्ट रूढींचे निर्दालन किती पद्धतशीरपणे कायद्याचा आधारे करीत होते, हे लक्षात येते.

देवदासी ही प्रथा स्त्रीवर प्रचंड अन्याय करणारी होती. देवाच्या नावाने मुलींना सोडले जात होते. त्यातून जोगतीण, मुरळी, भावीण अशा क्रूर रूढी निर्माण झाल्या. १७ जानेवारी १९२० रोजी राजर्षी शाहूंनी खास कायदा केला. (पवार: २०१२: पृ.९४) देवदासी स्त्रियांच्या संततीचा जनक घराण्याशी कोणताही संबंध राहात नसे. देवाला सोडल्यामुळे तिचे जगणे अधांतरी राहायचे. देवदासी प्रथेमुळे स्त्रीचे समाजातील स्थान ढासळत होते. राजर्षी शाहूंनी अशा स्त्रियांना मुक्त करण्यासाठी खूप प्रयत्न केले. समाजात घुसलेल्या समाजविघातक रूढी संपवून प्रजा संतुष्ट करणे हे राजर्षी शाहूंनी आपले जीवितकार्य ठरवले होते, याची प्रचिती त्यांनी केलेल्या अनेक कायद्यांमधून येते.

**समारोप**

एकंदरित राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात समाजविघातक अशा अनेक रूढी संपुष्टात याव्यात यासाठी प्रयत्न केले. रूढी-प्रथा-परंपरा आणि चाली या लोकांच्या मनात घर करून बसलेल्या असतात. त्या सहजासहजी बाहेर पडत नाहीत. त्यासाठी लोकांचे प्रबोधन केले पाहिजे. त्यांना रूढीचे तोटे समजावून सांगितले पाहिजे. त्यासाठी लोकांना शिक्षित केले पाहिजे, असे राजर्षी शाहूंना प्रकर्षाने वाटत होते. राज्याधिकार मिळताच त्यांनी प्रसारित केलेला जाहीरनामा म्हणजे केवळ आश्वासन नव्हते. रयतेला येनकेन प्रकारे संतुष्ट करणे, तिचे कल्याण करणे आणि राज्याचा सर्व बाजूंनी अभ्युदय करणे अशा उत्कट इच्छा मनाशी बाळगून ते कार्यरत राहिले. आपले राज्य कोणत्याही अनिष्ट रूढीमुळे त्रस्त होऊ नये, याची खबरदारी राजर्षी शाहूंनी घेतली होती. ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी त्यांनी मोडीत काढली. जातिभेद आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी कायदे केले. विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या. महार वतने आणि वेठबिगारी संपवून टाकली. गुन्हेगार मानलेल्या लोकांची हजेरी बंद केली. स्त्रियांची प्रगती व्हावी यासाठी शिक्षणाची सोय केली. स्त्रीच्या प्रगतीआड येणाऱ्या प्रथा नष्ट केल्या. आंतरजातीय विवाह, पुनर्विवाह, नोंदणी विवाह, विधवाविवाह यांचा पुरस्कार केला. देवदासी ही प्रथा नष्ट होण्यासाठी प्रयत्न केले. काडीमोड कायद्यामुळे स्त्रीला समाधानाने जगता आले. त्यासाठी पुराणग्रंथातले ढोंग त्यांनी उघड केले. त्यामुळे अनिष्ट रूढी-परंपराविरुद्धचा एल्गार म्हणून राजर्षी शाहू महाराज यांच्याकडे अभिमानाने पाहाता येते.

**संदर्भ**


१. राजर्षी शाहू राजा व माणूस : कृ. गो. सूर्यवंशी, ठोकळ प्रकाशन, कोल्हापूर, १९८४.
२. राजर्षी शाहू छत्रपती : धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२.
३. क्रांतिसूक्त : राजर्षी शाहू छत्रपती, डॉ. एस. एस. भोसले. म.रा.सा.सं.मंडळ, मुंबई,१९९१.
४. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ : प्रा. डॉ. रमेश जाधव (संपादक), महाराष्ट्र राज्य, मुंबई, २०१६.
५. राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य : डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१२.


(लेखक फुले आंबेडकरी विचारांचे अभ्यासक आहेत.)





# राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री उद्धाराचे कार्य

राजेश पाटील
९९२१७४५८५४

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वाचे योगदान राहिले आहे. छत्रपती असूनही आपल्या राजदंडाचा वापर रयतेच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी करणारा असा हा लोकराजा होता. कला, क्रीडा, शिक्षण, कृषी, उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक इत्यादी सर्व क्षेत्रात त्यांनी कायदे व नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून मूलभूत स्वरूपाचे कार्य केले. काळाची पावले ओळखून महाराजांनी अनेकविध क्षेत्रात केलेले कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे ठरले.अठराव्या शतकात स्त्रियांच्या जगण्यावर सामाजिक नीतिनियमांचा मोठा पगडा होता. पारंपरिक चाकोरीत स्त्री जीवन अडकून पडले होते. स्त्रियांना दुय्यमत्वाची वागणूक दिली जात होती. बालविवाह, सतीप्रथा, केशवपन यासारख्या अनिष्ट प्रथा परंपरांनी स्त्रियांना जखडले होते.अशा काळात शाहू महाराजांनी स्त्री उद्धाराविषयी केलेले कार्य अलौकिक स्वरूपाचे ठरले. रूढी परंपरेच्या बाहेर पडून स्त्रियांना मुक्त अवकाश प्राप्त व्हावा यासाठी त्यांनी केलेले काम वर्तमानाला थक्क करणारे आहे .

**स्त्री शिक्षणास चालना**

अठराव्या शतकात महात्मा फुलेंनी सामाजिक मागासलेपणाचे प्रमुख कारण अज्ञान असल्याचे नमूद करून शिक्षणाला चालना दिली. शाहू महाराजांनीही शिक्षणाचे महत्व जाणून आपल्या संस्थानात सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. शिक्षणाशिवाय महिलांना दास्यातून मुक्तता मिळणार नाही हे महाराजांनी ओळखले. शाहू महाराजांच्या शिक्षणप्रसाराच्या कार्यात त्यांचे कर्तृत्ववान पिता आबासाहेब घाटगे यांची प्रेरणा होती.आबासाहेबांनी कागलसारख्या छोट्या संस्थानात मुलींची शाळा सुरू केली होती. स्त्री-शिक्षिका तयार करण्यासाठी फिमेल ट्रेनिंग स्कूलची स्थापना केली होती.शाहू महाराजांनी याच कार्याला पुढे गती दिली. शाहू महाराजांनी करवीर राज्याची सूत्रे हाती घेतली त्यावेळी बहुजन समाजात शिक्षण घेण्याची जाणीवही नव्हती. मुलींना शाळेत पाठवण्याची पालकांची मानसिकता नव्हती. काही विशिष्ट वर्गातील मुली शिक्षण प्रवाहात होत्या, पण त्यांनाही मर्यादा होत्या. करवीर संस्थानात महाराजांच्या राज्यारोहणापूर्वी मुलींच्या निवडक शाळा होत्या. राज्यकारभार हाती घेताच महाराजांनी मुलींच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष केंद्रीत केले. मुलींसाठी स्वतंत्र शाळांची निर्मिती केली. कोल्हापूरातील भुदरगड, आजरा यासारख्या डोंगरी ग्रामीण भागात मुलींसाठी शाळा सुरू केल्या. मुलींना शाळेत पाठवणे पालकांना सक्तीचे केले.

**मुलींच्या शिक्षणासाठी स्कॉलरशिप**

जास्तीत जास्त मुलींनी शिक्षण प्रवाहात सामील व्हावे, या उद्देशाने महाराजांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. शाळांतील मुलींची संख्या वाढावी म्हणून त्यांनी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले. शाळेतील गुणवंत विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रोत्साहन म्हणून स्कॉलरशिप देण्यास सुरुवात केली. कोल्हापूर शहर व बावडा इन्फंट्री शाळांतील मुलींच्या मराठी इयत्तेच्या वार्षिक परीक्षेत सर्वात अधिक गुण मिळवणाऱ्या दोन मुलींना कन्या अक्कासाहेब महाराज यांच्या विवाहप्रित्यर्थ त्यांच्या आणि भावनगरच्या महाराणी नंदकुंवर यांच्या नावाने त्यांनी शिष्यवृत्त्या जाहीर केल्या. ही स्कॉलरशिप दरवर्षी चाळीस रुपये इतकी होती. कोल्हापूरच्या अहिल्यादेवी गर्ल्स हायस्कूलच्या पाचवीच्या परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीला तीन रुपये महिना शिष्यवृत्ती होती. चित्रकलेत विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थिनीला दरमहा दहा रुपये देण्याचे जाहीर केले. विशेषत: मुलींच्या शिक्षणात शिक्षकांनी अधिक रस घ्यावा म्हणून शिक्षकांना खास इनाम म्हणून बक्षीस सुरू केले. या संदर्भात १९१७ सालचा शाहू महाराजांचा एक आदेश उपलब्ध आहे. मुलांच्या शाळेत मुली पास झाल्याबद्दल मास्तर लोकास इनाम देण्यासाठी रक्कम ५१२ रुपये मंजूर केल्याची नोंद त्यामध्ये आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानाबाहेरही स्त्री शिक्षणाला सक्रीय पाठिंबा दिल्याचे दिसून येते. गुजरातमधील भावनगर संस्थानात त्यांनी २४०० रुपयांची ठेव ठेवली होती आणि त्याच्या व्याजातून भावनगरच्या मुलींना शिष्यवृत्ती म्हणून लक्ष्मीबाई राणीसाहेबांच्या नावे पारितोषिक देण्याची तरतूद केली होती. मुलींचा शिक्षणातील सहभाग वाढावा यासाठी महाराजांनी अनेक अभिनव उपक्रम हाती घेतले.

**स्त्रियांसाठी व्यावसायिक शिक्षण**

पारंपरिक शिक्षणाच्या चौकटीबाहेर जाऊन स्त्रियांनी स्वावलंबी व्हावे यासाठी व्यावसायिक शिक्षणाला शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सुरुवात केली. कोल्हापुरात सरकारी हॉस्पिटलमध्ये एक नर्सिंग कोर्स सुरू केला. या कोर्ससाठी स्त्रियांना प्रवेश दिला जात असे. तेथे प्रवेशासाठी स्वतंत्र परीक्षा घेऊन गुणानुक्रमे प्रथम सहायेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र स्कॉलरशिप महाराजांनी जाहीर केली

होती. तत्कालीन काळात प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा हा महाराजांचा निर्णय शिक्षणाकडे पाहण्याचा त्यांचा व्यापक दृष्टिकोन सूचित करतो.

**कायद्यांची निर्मिती व अंमलबजावणी**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रियांच्या सन्मानासाठी कृतिशील कार्यक्रम हाती घेतले. कोल्हापूर संस्थानात काही महत्त्वाचे कायदे महाराजांनी अंमलात आणले. तत्कालीन काळातशारीरिक व मानसिकदृष्ट्या मुलगी विवाह योग्य होण्याअगोदर त्यांचा विवाह लावून दिला जात असे. काही मुलींचे विवाह तर पाळण्यात होत असत.यातून मुलींचे कुपोषण, अकाली मातृत्व, बाळंतपणातील माता-मृत्यू, अर्भक मृत्यु अशा अनेक समस्या निर्माण होत. यावर उपाय म्हणून महाराजांनी दरबारात विवाह नोंदणी कायदा अंमलात आणला. या कायद्याद्वारे विवाहाचे वेळी मुलाचे वय १८ वर्षे पूर्ण व मुलीचे वय १४ वर्ष पूर्ण असावे असे निश्चित करण्यात आले.

जुलै, १९१९ मध्ये शाहू महाराजांनी आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहास व नोंदणी पद्धतीस मान्यता देणारा कायदा आपल्या संस्थानात लागू केला.जातिभेद नष्ट करण्याचा खरा उपाय म्हणजे भिन्न भिन्न जातीमध्ये घडवून आणलेले आंतरजातीय विवाह होय ही महाराजांची धारणा होती. या कायद्याद्वारा भिन्न जातीतील विवाहांना मान्यता मिळाली. महाराजानी स्वत: आपली चुलतबहीण चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरचे राजे तुकोजी होळकर यांचे पूत्र यशवंत होळकर यांचेशी लावून दिला. तत्कालीन काळात महाराजांनी आंतरजातीय विवाहाचा घेतलेला हा निर्णय मोठा धाडसी व क्रांतिकारी म्हणावा लागेल. पुनर्विवाह नोंदणी कायदा हे महाराजांचे क्रांतिकारी पाऊल म्हणावे लागेल. विधवा म्हणून जगताना स्त्रीला प्रचंड हाल-अपेष्टा सहन कराव्या लागत. कुटुंबात आणि समाजातही त्यांच्याशी मानहानिकारक वर्तन केले जाई. या समस्येचे गांभीर्य महाराजांनी जुलै १९१७मध्ये कोल्हापूर संस्थानात रिमॅरेज रजिस्ट्रेशन कायदा पास केला. या कायद्यान्वये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य मिळाले. १९१९मध्ये स्त्रियांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणारा कायदा संस्थानात मंजूर केला. या कायद्यामध्ये स्त्रियांशी केले जाणारे असभ्य वर्तन, त्या कायद्याखाली येणारे अपराध व त्यासाठी होणारी शिक्षा उदाहरणे देऊन नमूद केली आहेत.



भटक्या विमुक्त जातींमध्ये पंचांच्या मनमानी कारभारामुळे काडीमोड अथवा घटस्फोट ही प्रक्रिया जाचक बनली होती. महाराजांनी तिला कायदेशीर रूप दिले. आपल्या संस्थानात काडीमोड अथवा घटस्फोट कायदा संमत केला. महाराजानी स्त्री ला जशा प्रकारे स्वत:चा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य दिले तशापध्दतीने जोडीदार नाकारण्याचेही स्वातंत्र्य बहाल केले.जोगतिणी, मुरळी, देवदासी स्त्रियांना देव आणि धर्माच्या नावाखाली अत्यंत यातनामय जीवन जगावे लागत होते. कनिष्ठ दर्जाचे व उपेक्षित जीवन त्यांच्या वाट्याला आले होते. या संदर्भात जोगतिणी व मुरळी प्रतिबंध कायदा १९२० करणेत आला. या कायद्यानुसार स्त्रियांना देवाला सोडल्यामुळे जे विशिष्ट हक्क प्राप्त होतात तेच कायद्याने रद्द केले. १९२१ साली एका हुकुमाद्वारे शिमगा सणावेळी स्त्रियांसबंधी अत्यंत अश्लील व बीभत्स स्वरूपाचे वक्तव्य व वर्तन केल्यास त्याला कडक शासन केले जाईल असे महाराजांनी फर्मावले होते. शंभर वर्षापूर्वी शाहू महाराजांनी केलेले हे कायदे पाहता शाहूराजांची उदात्त मानव दृष्टी आपल्या नजरेत भरते. कायदेशीर मार्गाने स्त्रियांना समानतेचा दर्जा देण्यासाठी ते सातत्याने आग्रही राहिले.

**प्रसूतिविज्ञान नावाची पुस्तिका**

अज्ञानातून प्रसूतीकाळात गोरगरीब स्त्रियांना खूप हाल सहन सोसावे लागत. प्रसूती काळातील आहार, विहार, व्यायाम यासंबंधी शास्त्रीय ज्ञान स्त्रियांना अवगत नव्हते. यासाठी महाराजांनी एक माहितीवजा पुस्तिका प्रकाशित करण्याचे ठरवले. दरबारातील सुप्रसिद्ध सर्जन रावसाहेब आपटे यांच्याकडून प्रसूतीविद्या नावाची एक छोटी पुस्तिका महाराजांनी लिहून घेऊन ती प्रकाशित केली. पाच आणे इतक्या स्वस्त दरात पुस्तिकेची विक्री करण्याचे ठरवले. जेणेकरून गोरगरीब स्त्रियांना ती विकत घेऊन त्याचे वाचन करता येईल. प्रगत वैद्यकीय ज्ञान महिलांना प्राप्त व्हावे ही महाराजांची भूमिका त्यांची वैचारिक प्रगल्भता दाखवून देते.

**इंदुमती राणीसाहेब– शिक्षण व संस्कार**

इंदुमती राणीसाहेब या राजर्षी शाहू महाराजांचे द्वितीय पुत्र प्रिन्स शिवाजी यांच्या पत्नी व शाहू महाराजांच्या स्नुषा होय. प्रिन्स शिवाजी शिकारीस गेले असता त्यांचे निधन झाले. लग्नाच्या एक वर्षाच्या आतच इंदुमती राणीसाहेबाना वैधव्य प्राप्त झाले. विधवा म्हणून त्यांनाअनंत अडचणींना सामोरे जावे लागले. त्यांची ही अवस्था पाहून महाराजांनी आपल्या सूनेसाठी शिक्षणाचा धाडसी निर्णय घेतला. त्यांच्या शिक्षणासाठी अत्यंत हुशार शिक्षकांची नेमणूक केली. इंदुमती राणीसाहेबांबरोबर त्यांच्या वयाच्या विविध जातीतील निवडक मुलींना शिक्षणासाठी सोनतळी कँपवर ठेवले. त्यांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता स्वावलंबी जीवन जगता यावे म्हणून

अश्वारोहण, सारथ्य, शिकार, मोटार ड्रायव्हिंग याचे प्रशिक्षण दिले. वैद्यकीय शिक्षण देण्यात आले. महाराज आणि इंदूमतीदेवी यांच्यातील पत्रव्यवहार पाहिल्यास पित्याने आपल्या मुलीची जशी काळजी घ्यावी त्याप्रमाणे शाहू महाराजांनी इंदुमतीदेवींची काळजी घेतल्याचे आपल्याला दिसते. पुढील काळात इंदुमतीदेवींनी आपल्या कार्यातून व विचारातून महाराजांचा वसा आणि वारसा समर्थपणे जोपासला.

**स्त्रियांच्या विद्वत्तेचा सन्मान व संधी**

स्त्रियांच्या शिक्षणासाठी व स्वावलंबनासाठी महाराज सातत्याने धडपडत राहिले. या शिवाय तत्कालीन काळातील अनेक क्षेत्रातील कर्तबगार स्त्रियांना महाराजांनी राजाश्रय दिला. त्यांच्या ज्ञानाचा, विद्वत्तेचा व कलेचा संस्थानातील इतर स्त्रियांना फायदा व्हावा, या हेतूने महाराजांनी त्यांना संस्थानात विविध पदांवर काम करण्याची संधी दिली. कृष्णाजी रखमाबाई केळवकर या विद्वान दाम्पत्याची कन्या कृष्णाबाई या प्रचंड बुद्धिमान होत्या. शाहू महाराजांनी कृष्णाबाईंची विद्वत्ता ध्यानात घेऊन दरबारची खास शिष्यवृत्ती देऊन मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये त्यांना शिकण्यासाठी पाठवले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूर दरबारच्या हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून कृष्णाबाई केळवकर यांची नेमणूक हुकुमान्वये महाराजांनी केली. कोल्हापूर संस्थानात कृष्णाबाईंनी वैद्यकीय क्षेत्रात अविस्मरणीय स्वरूपाचे काम केले. त्यांच्या कामाची दखल घेऊन ब्रिटिश सरकारने त्यांना कैसर-ए-हिंद हा सन्मान बहाल केला होता. १८९५ साली पुण्याला जेव्हा काँग्रेसचे अधिवेशन भरले त्यावेळी कोल्हापूरच्या महिला प्रतिनिधी म्हणून शाहू महाराजांनी कृष्णाबाई व त्यांची बहीण द्वारकाबाई या दोघींना पाठवले होते. राज्यकारभारात आणि प्रशासनात स्त्रियांचा येत्या काळात सहभाग किती महत्वाचा आहे आणि महाराज त्यादृष्टीने कसा विचार करत होते हे यावरून सिद्ध होते.

**सारजाबाई मोरे यांच्या कार्याचा गौरव**

नाशिकमध्ये गणपतदादा मोरे हे सत्यशोधक समाजाचे निष्ठावान कार्यकर्ते बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी धडपडत होते. मुलांना मोफत शिक्षणाबरोबर निवासाची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी नाशिकमध्ये बोर्डिंग स्थापन केले. या कामात त्यांची पत्नी सारजाबाई यांनी खूप मोठा हातभार लावला होता. महाराज १९२०साली एका कार्यक्रमा निमित्ताने नाशिकला गेले असता मोरे दाम्पत्याची भेट घेण्यासाठी त्यांच्या घरी गेले. महाराजांनी दोघांनी हाती घेतलेल्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. स्वतः सारजाबाई यांनी शिकणाऱ्या मुलांची राहणे खाण्याची व्यवस्था आपल्या घरात केली होती. त्या कायम मुलांच्या सेवेत मग्न असत. या निरपेक्ष सेवेबद्दल सारजाबाई यांचे महाराजानी विशेष कौतुक केले. शिवाय त्यांना पाचशे रुपये बक्षीस म्हणून दिले. आपल्या संस्थानात आणि संस्थानांबाहेर ज्या स्त्रिया समाजसुधारणा कार्यात सक्रियपणे सहभागी होत होत्या. त्यांच्यामागे महाराज खंबीरपणे उभे राहिले. त्यांच्या कार्यात येणाऱ्या अडीअडचणी वेळी दरबारातून सर्वतोपरी मदत केल्याचे दाखले मिळतात.

शाहू महाराजांनी पदाचा मुकुट बाजूला सारून लोकसेवेचा कायम ध्यास घेतला. स्त्रियांच्या प्रगती शिवाय सामाजिक प्रगती शक्य नाही, हे ओळखून स्त्री शिक्षणाला त्यांनी प्राधान्य दिले. पारंपरिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षणाचे द्वार स्त्रियांसाठी खुले केले. उच्च शिक्षणासाठी अनेक महिलांना शिष्यवृत्या देऊन परदेशी पाठवले. शिक्षणासोबत स्वावलंबनाचे धडे त्यांना दिले. समाजकार्यात सहभागी असणाऱ्या स्त्रियांच्या कार्याचा सातत्याने त्यांनी गौरव केला. त्यांच्या कार्याला पाठबळ दिले. ज्या काळात चूल आणि मूल या पलीकडे स्त्रीला सामाजिक अवकाश प्राप्त झाला नव्हता, अशा काळात स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करुन देण्यासाठी महाराजांनी केलेले कार्य आजघडीला ऐतिहासिक स्वरूपाचे ठरते.

**संदर्भग्रंथ सूची:**

१.साळुंखे पी.बी (संपा), राजर्षी शाहू गौरव ग्रंथमहाराष्ट्र राज्य शिक्षणविभाग, मुंबई,१९७६, पृ.९

२. करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, ता. ५ एप्रिल १९१३

३.पवार वसुधा, राजर्षी शाहू छत्रपती एक अभ्यास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणेमार्च २०१८ (तृ.आ), पृ.५३

४.करवीर सरकारचे गॅझेट, भाग २, ता. ३० जानेवारी १८९७.

५.सूर्यवंशी कृ.गो., इंदुमती राणीसाहेब, ठोकळ प्रकाशन, पुणे, डिसेंबर १९७६, पृ.३८

६. पवार जयसिंगराव (संपा), राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, मार्च २०१८ (द्वि.आ), पृ.२५

७.पोवार विलास, कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले चरित्र व कार्य, ध्रुवप्रकाशन,कोल्हापूर, २०२०, पृ.५३

(लेखक शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे संशोधक आहेत.)

●

## आवाहन

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची ३ वर्षांनी होणारी विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक यंदा औरंगाबाद येथे ३, ४, ५ जून २०२२ रोजी होत आहे. या बैठकीत सन २०२२ ते २०२५ या कालावधीसाठी राज्य पदाधिकाऱ्यांची निवड केली जाणार आहे. या बैठकीसाठी सर्व राज्य पदाधिकारी, निमंत्रित सदस्य, सर्व जिल्हा कार्याध्यक्ष व सचिव आणि शाखा कार्याध्यक्ष व सचिव यांनी उपस्थित राहावे, असे आपणाला समितीच्यावतीने आवाहन करण्यात येत आहे.



# सानेगुरुजींचा मंदिर प्रवेश सत्याग्रह

ज्ञानेश्वर बंडगर
८४५९२१२०२५

चंद्रभागेच्या वाळवंटात वारकरी संतांनी समतेची उद्घोषणा केली. आपल्या भक्ती संप्रदायात सर्वांना समान संधी आहे, हे पुन्हा पुन्हा सांगितले. संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी सर्वप्रथम म्हटले की,

'नाही यातीकुळ। उच नीच भेद।

भाव एक शुद्ध। पहातसे।।'

तर जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणाले,

सकळांशी येथे आहे अधिकार।

कलियुगी उद्धार हरिच्या नामे।।

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र।। चांडाळाही अधिकार।।

बाळे, नारी, नर। आदिकरूनी वेश्याही ।।'

संतांच्या मते, 'भेदाभेद भ्रम, अमंगळ।'. म्हणजे माणसामाणसांत भेद करणे, हे अमंगल आहे. हे भ्रममूलक आहे. संतांनी शुद्ध आचरण असणाऱ्या सर्वांना भक्तिमार्ग खुला केला. परंतु या सर्व भक्तांना मंदिर खुले करण्याचे औदार्य पुरोहित असणाऱ्या बडवे-उत्पात आदी ब्रह्मवृंदाने केले नाही. म्हणूनच दि.१० मे १९४७ रोजी भारताच्या इतिहासात एक क्रांतिकारक घटना घडली. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून सानेगुरुजींनी १ ते १० मे उपोषण केले. ते सत्याग्रही उपोषण यशस्वी झाले. अस्पृश्यांना मंदिर खुले झाले. या घटनेला आता ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. जातिभेदाच्या विरोधातील लढाईतला हा एक महत्त्वाचा लढा होता.


भारताला स्वातंत्र्य मिळणार हे १९४६ साली जवळपास नक्की झालं होतं. पण जातिभेदाचा विषारी वृक्ष अजून तसाच उभा होता. त्यामुळे भारतातून इंग्रज गेल्यानंतरही इथल्या शूद्रातिशूद्रांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळणार नव्हतं. कथित उच्च जातीयांचा अमानवी अत्याचार तसाच सुरू राहाणार होता. महात्मा फुल्यांनी हे फार पूर्वीच ओळखलं होतं. त्यामुळेच राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याचा लढा महत्त्वाचा मानून त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. मानवी हक्कांच्या व्यापक मूल्यभानाचं अधिष्ठान या चळवळीला होतं. पुढे राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीही जोतिबांचेच सत्यशोधकी विचार रुजवण्याचे प्रयत्न केले. हाच समतेचा विचार रुजविण्याचा प्रयत्न सानेगुरुजींनी केला. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला मानवी हक्कांच्या मूल्यभानाची जोड देणारा एक नवा लढा उभा केला.

१९४६ सालच्या कार्तिकी एकादशीला पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून सानेगुरुजींनी सत्याग्रहाचा निर्धार केला. पण सेनापती बापट यांनी त्यांची समजूत घातली. सहा महिने महाराष्ट्रभर प्रबोधन करून मगच सत्याग्रही उपोषण करावं, असं त्यांनी गुरुजींना सुचवलं. गुरुजींनी ते मान्य केलं. पण या घटनेने सनातनी हादरले. गुरुजींचा सत्याग्रह यशस्वी झाला, तर स्वतंत्र भारतातलं आपलं स्थान धोक्यात येणार याची सनातन्यांना जाणीव झाली. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिर प्रवेशाच्या अगोदर मंदिर प्रवेशाचे अनेक सत्याग्रह झाले होते. सनातन्यांनी अपप्रचार आणि दहशतीच्या बळावर ते मोडीत काढण्याचा प्रयत्न केला होता. पण सानेगुरुजींच्या सत्याग्रहाने अनेक गोष्टींचा फैसला होणार होता. वर्णगुरू म्हणून समाजात शतकानुशतके असणाऱ्या ब्राह्मणांच्या वर्चस्वाला हादरा बसणार होता. नवा कोणताच कायदा धर्माच्या क्षेत्रात ढवळाढवळ करणार नाही, असा सनातन्यांचा अंदाज फोल ठरणार होता. महाराष्ट्राच्या धर्मजीवनाचा मुख्य प्रवाह असलेल्या वारकरी संतांच्या सामाजिक विचारांची नव्याने चर्चा होणार होती. संतविचार सामाजिक सुधारणेला अनुकूल आहे की नाही? या प्रश्नावर मंथन होणार होतं. या सर्व कारणांमुळं कोणत्याही परिस्थितीत सानेगुरुजींचा सत्याग्रह यशस्वी होऊ नये म्हणून सनातन्यांनी जोरदार प्रयत्न चालू केले. त्याचवेळी स्वतंत्र भारताची जडणघडण मानवी हक्कांच्या आणि बंधुतेच्या मूल्यांवर व्हावी या व्यापक भावनेनं सानेगुरुजींसारखी माणसं झपाटलेली होती. या नव्या स्वातंत्र्यलढ्यासाठी बलिदान द्यायची तयारी गुरुजी दाखवत होते. नवा भारत कोणत्या मूल्यांवर घडणार हे या लढ्यातून स्पष्ट होणार असल्यानं प्रागतिक आणि सनातनी या दोन्ही बाजूंनी हा लढा पूर्ण ताकदीने लढला जाणार होता.

सानेगुरुजींनी अस्पृश्यतेविरोधात व्यापक जनप्रबोधनाची मोहीमच उघडली. सेनापती बापट, क्रांतिसिंह नाना पाटील आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज असे अनेकजण यात सहभागी होते. गुरुजींनी महाराष्ट्रभर चारशेहून अधिक सभा घेतल्या. त्यातून अनेक गावातली मंदिरे आणि पाणवठे अस्पृश्यांसाठी खुले झाले. गुरुजींच्या प्रेममय भाषणांनी अवघा महाराष्ट्र बदलत होता. गुरुजींच्या भाषणात केवळ अस्पृश्यतेचाच प्रश्न नव्हता. त्यांच्या भाषणात नव्या स्वतंत्र भारताच्या जडणघडणीचा मुख्य मुद्दा होता. त्यामुळे त्यांच्या भाषणात शेतकरी, कामगार, शेतमजूर आणि स्त्रिया यांच्याही प्रश्नांवर चर्चा होत होती.

धर्मचिकित्सा करत नव्या युगधर्माची मांडणी गुरुजी करत होते. त्यासाठी वेदोपनिषदातले दाखले देत होते. पुराणातल्या कथा सांगत होते. संतांचा खरा विचार मांडत होते. समाजसुधारकांचं धर्मचिंतन मांडत होते. पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांचं तत्त्वचिंतन समजावून सांगत होते. सानेगुरुजींच्याबरोबर क्रांतिसिंह नाना पाटील तर गर्जनाच करत होते. अस्सल ग्रामीण ढंगातली त्यांची भाषणं परिणामकारक ठरत होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजही भजनातून प्रबोधनाची खंजिरी वाजवत होते. सानेगुरुजी, क्रांतिसिंह नाना पाटील, सेनापती बापट आणि तुकडोजी महाराज यांना मानणारा खूप मोठा वर्ग होता. त्यांची निष्ठा, तळमळ आणि त्याग यामुळं त्यांच्या शब्दाला वजन होतं.

इकडे एका व्यापक मूल्यभानातून समग्र मानव मुक्तीच्या लढ्याची दुदुंभी वाजत असताना तिकडे सनातनी स्वस्थ बसले नव्हते. तेही त्यांच्या पूर्ण ताकदीने गुरुजींच्या विरोधात मैदानात उतरले होते. वारकरी संप्रदायाचा महाराष्ट्रभर प्रभाव आहे हे जाणून सनातन्यांनी वारकरी फडकऱ्यांना ढाल म्हणून पुढे केले. पंढरपुरातल्या मुख्य फडकऱ्यांच्या बैठका होऊ लागल्या. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देऊ नये आणि तसा कायदा करू नये, असे ठराव बैठकीत केले जाऊ लागले. शंकराचार्यांनी तर पंढरपुरातच तळ ठोकला. बडवे हे त्यावेळी मंदिराचे मालक गणले जात होते. मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश द्यायचा की नाही हे ठरवण्याचा अधिकार बडव्यांना होता. त्यामुळे बडव्यांच्या पुरोहितशाहीला आपल्या बाजूनं वळवण्यासाठी सनातनी प्रयत्न करू लागले. मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश दिला तर मंदिरावर बहिष्कार टाकण्याच्या वल्गना केल्या जाऊ लागल्या. त्यामुळे बडवे घाबरले. उद्या अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळाल्यानंतर जर मंदिरावर सर्वांनी बहिष्कार टाकला, तर आपलं आर्थिक उत्पन्न बुडेल ही त्यांना भीती होती. काही अपवाद वगळता पारंपरिक ब्राह्मणी विचारांचा पगडा तर बडव्यांवर होताच. त्यातच शंकराचार्य आणि सनातन्यांचा दबाव यामुळे बडव्यांची गोची झाली होती.



सनातनी धर्मपंडितांची टोळी, सनातन्यांच्या अपप्रचाराला बळी पडलेले वारकरी संप्रदायातले मुखंड आणि बडव्यांची पुरोहितशाही यांच्या अभद्र युतीतून गुरुजींच्या सत्याग्रही मोहिमेला विरोध सुरू झाला. 'नही खुलेगा विठ्ठलद्वार। जावो साने भीमापार' अशा घोषणाच दिल्या जाऊ लागल्या. गुरुजींना पंढरपुरातच येऊ देणार नाही, अशा धमक्या दिल्या जात होत्या. पण प्रत्यक्षात तसं काही घडलं नाही. सहा महिन्यांच्या प्रबोधनानंतर गुरुजींनी १ मे, १९४७ ला पंढरपुरात उपोषणाची घोषणा केली. चंद्रभागेच्या वाळवंटात भव्य सभा झाली. पण या उपोषणासाठी पंढरपुरात जागा मिळत नव्हती. गाडगेबाबांच्या आज्ञेनुसार त्यांचे शिष्य निवृत्ती कुशाबा महाराज तनपुरे बाबांनी त्यांच्या मठाची जागा गुरुजींना उपोषणासाठी दिली. त्यानुसार गुरुजी तनपुरे मठात उपोषणाला बसले. त्यांना लोकांचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळू लागला. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या प्रतिसरकारच्या फौजा पंढरपुरात येऊन धडकल्या. शहरात परेड काढली. 'गुरुजींच्या जीवाला काही बरं-वाईट झालं तर आम्ही बडव्यांची घरं पेटवून देऊ', अशी धमकीच नाना पाटलांनी दिली. याच काळात आचार्य अत्रेही पंढरपुरात आले. दणदणीत भाषणानं अत्र्यांनी पंढरपूर हादरवून सोडलं.

अखेर गुरुजींच्या सत्याग्रहाला मिळणारा वाढता जनाधार पाहून पुरोहितशाही झुकली. दादासाहेब मावळणकर यांच्या मध्यस्थीने बडव्यांच्या पंचकमिटीने अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देण्याचा ठराव पास केला. त्यामुळे अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळणार हे नक्की झालं. ती तारीख होती १० मे १९४७. सानेगुरुजींचा सत्याग्रह यशस्वी झाला. मोसंबीचा रस पिऊन गुरुजींनी उपोषण सोडलं. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देण्याच्या बडवे पंचकमिटीच्या ठरावाला कोर्टात आव्हान दिलं गेलं. ८८ बडवे आणि सनातनी महाराजांसह पाच अर्ज दाखल झाले. हे पाचही अर्ज कोर्टाने फेटाळत अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देणं नक्की केलं. तारीख ठरली ३० ऑक्टोबर १९४७.

अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळणार हे निश्चित झाल्यावर सनातनी गोटात खळबळ माजली. त्यांच्यापैकी काहींनी कुठलेतरी मंत्र म्हणून थेट विठोबाचं तेज एका घागरीत काढलं. 'खरा विठोबा आता मंदिरात नसून या घागरीत आहे, त्यामुळे मंदिरात दर्शनाला जाऊ नका', असा फतवा सनातन्यांनी काढला. अस्पृश्यांच्या दर्शनाने विठोबा बाटला आहे त्यामुळे मंदिरावर बहिष्कार टाकण्याचा निर्धार झाला. या सनातनी टोळीचे पुढारी होते पंडितप्राण भगवानशास्त्री धारुरकर. अनेकांनी अनेक वर्षं या मंदिरावर बहिष्कार टाकून पाहिला पण त्याला यश आलं नाही. खरंतर सनातन्यांचा असा अंदाज होता की, मंदिरात कुणीच जाणार नाही. सगळेजण बहिष्कार टाकतील. पण तसं घडलं नाही. कारण महाराष्ट्रावर संतांचा प्रभाव आहे आणि संतांचा खरा विचार या सत्याग्रहानं पुढं नेला होता. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळणं हा संतांचाच विजय होता. संतांचा हा खरा विचार गाडगेबाबांच्या कीर्तनातून आणि सानेगुरुजींच्या भाषणातून आम जनतेत पोहोचला होता. त्यामुळे सनातनी शास्त्रीपंडित आणि तथाकथित वारकरी मुखंड बहिष्कार टाकायला सांगत होते, त्याला फार कोणी गांभीर्याने घेतलं नाही. त्या विठोबात इतकं तेज होतं की, त्याने प्रत्येक भाविकाला आपल्याकडे खेचून घेतलं. ज्या मोजक्या लोकांनी बहिष्कार टाकला तेही

क्रमाक्रमाने मंदिरात जाऊ लागले. अजूनही एका अधिकारी महाराजांचा बहिष्कार असल्याचं सांगितलं जातं, त्यांना विठोबानं सद्‌बुद्धी द्यावी.

सानेगुरुजींनी उभारलेल्या या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाअगोदर तिथेच सातशे वर्षांपूर्वी संतांनीही सत्याग्रह केला होता. त्यात संत चोखोबाराय अग्रभागी होते. त्यांना अस्पृश्य मानलं जात असतानाही त्याला न जुमानता ते मंदिरात गेले. त्यामुळे चिडलेल्या बडव्यांनी त्यांना मारहाण केली. शिवीगाळ केली.

'धाव घाली विठो आता चालू नको मंद।

बडवे मज मारिती ऐसा काय अपराध?'

असा उद्विग्न सवाल चोखोबांनी उभा केला होता. चोखोबांनी मंदिरात जाऊन देव बाटवला म्हणून आरडाओरडा करणाऱ्यांना जनाबाई माउलींनी चांगलंच सुनावलं.

'देव बाटवला याने। हासे जनी गाय गाणे।।'

असं म्हणत चोखोबांनी देव बाटवला असं मानणं हास्यास्पद असल्याचं त्यांनी सांगितलं. हाच संतविचार पुढे नेणारा सानेगुरुजींचा सत्याग्रह होता. आजही आपल्या मनात असलेली जातीची जळमटं फेकून देणं आवश्यक आहे. त्यासाठी सानेगुरुजींच्या या लढ्याचं वारंवार स्मरण करावं लागेल. सानेगुरुजींनी त्यांच्या लिखाणातून मांडलेला संतविचार समजून घ्यावा लागेल. सानेगुरुजींच्या या सत्याग्रहाचे स्मारक नुकतेच तनपुरे मठात उभे राहिले आहे. त्या स्मृतिस्थळाला भेट देऊन हा समतेसाठी केलेल्या संघर्षाचा इतिहास समजून घ्यावा लागेल.

(लेखक प्रसिद्ध किर्तनकार आहेत.)

●

---

**(पृष्ठ क्रं. ५ वरुन )**

कायम परिघावरच राहिल्या. त्या केंद्रस्थानी आणण्याची जबाबदारी इथल्या पुरोगामी विचारप्रवाहाची होती. पण त्यावरही प्रस्थापितांची छाप कायम राहिली.

सत्तरच्या दशकानंतर दलित लेखकांनी लिहिलेले साहित्य मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होऊ लागले. आत्मचरित्र, कथा, कविता असे याचे स्वरूप होते आणि आहे. अलीकडे भटक्या विमुक्त समूहातील स्त्री-पुरुषांची आत्मचरित्रे अधिक येत आहेत. पण उच्चजातीय अभिजनांच्या दृष्टीतून या साहित्याचे कायम एक्झॉटिसायझेशन (Exoticization) केले जाते. आपल्या अनुभवविश्वाच्या पल्याड असे काहीतरी विलक्षण, विचित्र या स्वरूपात या आत्मचरित्रांमधून दर्शित होणाऱ्या जीवनाकडे पाहिले जाते आणि त्या स्वरूपातच ते काही काळाने रिचवले जाते. त्यातील संस्कृती ही कायम उपऱ्यांची, परिघावरची अशीच राहाते. ती आपली होत नाही. वर्णआधारित, जातिआधारित विभाजन साहित्याचेही विभाजन करत असते. संस्कृती आणि साहित्य एकमेकांना सापेक्ष असतात, त्याचे प्रत्यंतर जातिआधारित समाजात वारंवार येते.

आज इथल्या सांस्कृतिक संघर्षाने सांस्कृतिक दहशतवादाचे रूप धारण केले आहे. अशा पार्श्वभूमीवर हे अभिजनांचे साहित्य आणि संस्कृती संमेलन होत आहे. आजच्या या सांस्कृतिक संघर्षाचे अनेक पैलू आहेत. त्यातील गुंतागुंतही तीव्र आहे.

**क्रमशः**

(लेखिका अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या सल्लागार मंडळ सदस्या आहेत.)

●

## विधवा प्रथा बंदच्या निर्णयाचे स्वागत; सरकारही पाठीशी

**कोल्हापूर :** आजही पतीच्या निधनानंतर पत्नीचे कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातली जोडवी काढली जाणे, यासारख्या प्रथांचे पालन केले जायचे. या अनिष्ट प्रथा बंद करण्याचा निर्धार कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी पल्लवी कोळेकर, सरपंच सुरगोंडा पाटील आणि ग्रामसभेने घेतला. या निर्णयाचे कौतुक महाराष्ट्र अंनिससह राज्यातील संस्था संघटना आणि नागरिकांनी केले. महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींनी विधवा प्रथा बंद करण्यासाठी हेरवाड ग्रामपंचायतीचा आदर्श समोर ठेवून कार्य करावे, असे शासन परिपत्रक जारी करण्यात आले आहे. याच कालावधीत छत्रपती शाहू स्मृतीशताब्दी साजरी करण्यात येत होती. त्यामुळे राजश्री शाहू महाराजांनी विधवांसाठी केलेल्या कार्याची जाण म्हणून हा क्रांतिकारी निर्णयाचा ठराव केल्याचे सरपंच यांनी सांगितले. या अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी महिला संघटनाही प्रयत्न करत होत्या. पण एखादी प्रथा बंद करण्यासाठी कायद्याचा धाक आवश्यक होता. शासनाने आता हेरवाड ग्रामपंचायत पॅटर्न सर्व राज्यात राबविण्याचे आवाहन केले आहे. विधवा महिलांना इतर महिलांप्रमाने सन्मानाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे भविष्यात स्त्रियांच्या हनन होऊ नये, यासाठी ग्रामविकास विभाग पुढे सरसावला आहे. ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी ही राज्यातील सर्व ग्रामपंचायतीनी हेरवाडचे अनुकरण करून आदर्श ठेवण्याचे आवाहन केले आहे.



# ...एका रुपयात घटस्फोट

डॉ. टी. आर. गोराणे
९४२०८२७९२४

भारतीय समाजातील जवळपास प्रत्येक जाती-पोटजातीत छुप्या पद्धतीने जातपंचायती कार्यरत आहेत; ही बाब प्रथम महाराष्ट्र अंनिसने अभ्यासांती धाडसाने समाजपटलावर जाहीरपणे उजेडात आणली. त्याला आता नऊ वर्षे होत आली आहेत. अजूनही जातपंचायतींच्या मनमानीला पुरेसा आळा बसलेला नाही, हे पुन्हा पुन्हा काही घटना घडल्यानंतर किंवा पीडितांनी धाडसाने 'अंनिस'कडे तक्रार दिल्यावर अधोरेखित होते. या जातपंचायतींना संविधानिक न्यायव्यवस्था व कायद्याची भीती, धाक अजिबात वाटत नाही; हेही अशा वेळी स्पष्ट होत असते.

जातपंचांकडून जेव्हा एखादी व्यक्ती, कुटुंब व लहानसा समूह वाळीत टाकला जातो, बहिष्कृत केला जातो तेव्हा त्यांच्यावर विविध प्रकारची धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक बंधने लादली जातात. त्यांची विविध प्रकारे अडवणूक केली जाते, शोषण केले जाते, त्यांचा समाजातील वावर आणि त्यांचे एकंदरीत जिणेच मुश्कील केले जाते. त्यामुळे अशा पीडित व्यक्ती, कुटुंबे किंवा तो समूह जिवंतपणीच मरणयातना भोगत जीवन कंठत असतात. स्वातंत्र्य या मूलभूत मानवी मूल्याचीच ही गळचेपी असते; आपल्याच बांधवांना मानवी हक्क नाकारणारा हा घृणास्पद सामाजिक अन्याय असतो.

वेगवेगळ्या जाती-पोटजातींमध्ये आजही कार्यरत असलेल्या जातपंचायतीच्या या अन्यायकारक आणि अमानुष निवाड्यांच्या मोठ्या संख्येने बळी ठरतात त्या म्हणजे त्या समाजातील महिला!

एका भटक्या-विमुक्त समाजाच्या नाशिक आणि धुळे जिल्ह्यातील जातपंचायतींच्या पाठिंब्यातून सासरकडील मंडळींनी अतोनात छळ केलेल्या अशाच एका पीडितेची तक्रार महाराष्ट्र अंनिसकडे प्राप्त झाली. संबंधित जातपंचायतीवर सामाजिक दबाव निर्माण व्हावा म्हणून महाराष्ट्र अंनिसच्या जातपंचायत मूठमाती अभियानाचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी ही तक्रार बातमी स्वरूपात वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीसाठी पाठवली. नाशिक आणि धुळे जिल्ह्यातील काही प्रमुख वृत्तपत्रांच्या पहिल्या पानांवर ही बातमी ठळकपणे प्रसिद्ध झाली.

महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस डॉ. टी. आर. गोराणे हे देखील प्रकरणाचा तपशील जाणून घेण्यासाठी तातडीने पीडित तरुणीच्या घरी निफाडला पोहोचले. अंनिसचे तालुका अध्यक्ष डॉ. श्यामसुंदर झळके आणि शाखा कार्याध्यक्ष राजेंद्र मिठे यांना सोबत घेऊन त्यांनी सदर पीडित तरुणी यशस्विनी भटकर आणि तिच्या भावाची निफाडमध्ये समक्ष भेट घेतली. जातपंचायतीच्या पाठिंब्याने सासरकडच्या मंडळींकडून तिचा आणि तिच्या आई-वडिलांचा अतोनात झालेला छळ तिने निवेदन केला तो असा –

या तरुणीचे लग्न वडगाव ता. साक्री येथील पंकज श्रीखंडे या तरुणाशी दोन वर्षांपूर्वी झाले होते. लग्नाचा सर्व खर्च मुलीकडच्यांनीच केला होता. मुलगा वकिलीचा अभ्यास करतो, पुढे तो वकील होईल व आपल्या मुलीचे कल्याण होईल या भावनेतून माहेरच्यांनी परिस्थिती नसताना कर्ज काढून धुमधडाक्यात निफाड येथे लग्न लावून दिले (वायफळ खर्च करण्याच्या या प्रथेतून समाज अजूनही बाहेर पडत नाही).

परंतु लग्नानंतर पंधरा दिवसातच चारित्र्याच्या संशयावरून पतीसह, घरच्यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ करण्यास सुरुवात केली. प्रसंगी मारहाण करून उपाशीही ठेवले. हे सारे सहनशक्तीच्या पलीकडे गेल्याने तिने माहेर गाठले. माहेरी ती आजारी पडली. मात्र याबाबत तिच्या सासरच्या लोकांना कळवूनही कोणीही तिला भेटायला आले नाही. याउलट वडगाव येथील जातपंचायतीने ठराव करून तिला मोबाईलवरून लग्नाचा खर्च म्हणून एक रुपया पाठवला. तसेच जातपंचायतीच्या ठरावानुसार तिचा घटस्फोट झाल्याचे यशस्विनीच्या सासरच्यांनी तिच्या आई-वडिलांना सांगितले. आपली संमती न घेताच बेकायदेशीररित्या घटस्फोट दिल्याने, तसेच कोणतीही नुकसानभरपाई न देता, केवळ जातपंचायतीच्या सांगण्यावरून थेट घटस्फोटाची एकतर्फी कारवाई केल्याने यशस्विनीने याविरोधात कायदेशीररित्या लढायचे ठरवले आहे. तिची सर्व कैफियत ऐकल्यावर तिला संघटनेकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन कार्यकर्त्यांनी दिले.

यशस्विनीच्या सासरकडील बाजू ऐकून घेणे आणि परिस्थिती जाणून घेणे हे सुद्धा महत्त्वाचे होते. म्हणून डॉ. गोराणे यांनी त्याच दिवशी दुपारी तिचे सासर वडगाव, तालुका साक्री, जिल्हा धुळे हे गाव गाठले. महाराष्ट्र अंनिसचे स्थानिक कार्यकर्ते श्री. संतोष ब्राह्मणे आणि श्री. उगलमुगले यांना सोबत घेऊन

तिच्या पतीच्या घरी ते पोहोचले.

कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या आणि कोर्टात प्रॅक्टिस करत असलेल्या यशस्विनीच्या पंकज या 'पराक्रमी' पतीने तिला कायदेशीर फारकत न देताच, आठ दिवसांपूर्वीच दुसऱ्या युवतीशी लग्न केल्याचे मान्य केले. दुसऱ्या पत्नीची ओळखही कायद्याच्या त्या जाणकार माणसाने कार्यकर्त्यांना करून दिली. ही बाब मात्र अत्यंत उद्वेगजनक होती.

पंकजच्या लहान भावाचेही लग्न दोन दिवसांपूर्वीच झाले असल्यामुळे तेथे जातपंचायतीचे काही सदस्य उपस्थित होते असे कार्यकर्त्यांच्या लक्षात आले. शिवाय इतरही काही नातेवाईक घरात उपस्थित होते. तरीही कार्यकर्त्यांनी प्रसंगावधान राखून संयमपूर्ण संवादात पंकज यास स्पष्टपणे जाणीव करून दिली की, त्याने पहिल्या पत्नीला रीतसर कायदेशीर फारकत न देताच केलेले दुसरे लग्न बेकायदेशीर असून तो गुन्हा आहे. याबाबत काय तो निर्णय कोर्टात होईलच. परंतु तुमच्या आणि यशस्विनीच्या विवाहाचा मोबाईलवरून एकच रुपयात थेट काडीमोड करणारे जातपंचायत सदस्य कोण कोण होते, असे कार्यकर्त्यांनी पंकज श्रीखंडेला विचारले, तेव्हा मात्र तो चपापला. तो जातपंचायत सदस्यांची नावे सांगण्यास तयार होईना. जातपंचांचा याच्यात काही सहभाग नाही, असे तो पुन्हा पुन्हा सांगत होता. परंतु तेथे उपस्थित असलेले काही जातपंचायत सदस्य रागाने अस्वस्थ झाले होते हेही कार्यकर्त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी तेथून काढता पाय घेतला.

सायंकाळी पुन्हा कृष्णा चांदगुडे आणि अॅडव्होकेट रंजना गवांदे यांनी पीडित युवतीचे आई-वडील आणि पंकज श्रीखंडे यांच्याशी संपर्क करून, त्यांना जातपंचायत सदस्यांसह समोरासमोर संगमनेरला येण्यास सुचवले. त्यांनी येण्याचे मान्य केले. म्हणून दुसऱ्या दिवशी नाशिकहून कृष्णा चांदगुडे, नाशिक जिल्हा कार्याध्यक्ष अॅड. समीर शिंदे आणि निफाडहून यशस्विनी भटकर तिच्या भावाला घेऊन संगमनेरला पोहोचले. जातपंचायतीचे सदस्य समोर आले की त्यांना कायद्याची माहिती देऊन गुन्ह्याची जाणीव करून द्यावी, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांना होती. मात्र ठरल्याप्रमाणे पुन्हा पुन्हा फोन करूनही सायंकाळपर्यंतसुद्धा पंकज श्रीखंडे किंवा जातपंचायतीचे सदस्य, कोणीही संगमनेरकडे फिरकले नाहीत. त्यामुळे पहिल्या पत्नीला फारकत न देता दुसरा विवाह केला म्हणून पंकज श्रीखंडेच्या विरोधात यशस्विनी भटकरने गुन्हा नोंदवावा, असे कार्यकर्त्यांनी तिला सुचविले.

नंतरच्या काही दिवसात यशस्विनी भटकर व तिच्या कुटुंबीयांनी पंकज सोबत बैठक घेतली व न्यायालयातून घटस्फोट घेण्याचे मान्य केले. पंकजने लग्नाचा काही खर्च देण्याचे कबूल केल्याची माहिती मिळाली.

या प्रकरणात दिसून आले की, कायद्याच्या जाणकारालासुद्धा कायदे माहिती नाहीत अथवा तो मग्रुरीने कायद्याची पायमल्ली करतो. जातपंचायत आणि सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा जरी २०१७ चा असला तरी द्विभार्या प्रतिबंधक कायदा बराच जुना आहे. त्याचे ज्ञान वकिलाला नसावे आणि तो पूर्णपणे जातपंचायतीच्या दबावाखाली आपल्या वैवाहिक जीवनाचे निर्णय घेतो ही चिंतेची बाब आहे. म्हणून सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी होण्यासोबतच त्या त्या जाती - पोटजातींमध्ये छुप्या पद्धतीने कार्यरत असलेल्या जातपंचायतींचा शोध घेऊन त्या बेकायदेशीर असल्याचे समाजात प्रबोधन होणे गरजेचे आहे. काही समाजाच्या जातपंचायतींशी सुसंवाद करून त्या बरखास्त करण्यात महाराष्ट्र अंनिसला यश आले आहे. परंतु जातपंचायतींची समांतर व बेकायदेशीर मनमानी न्यायव्यवस्था मोडून काढल्याशिवाय लोकांचा छळ आणि शोषण थांबणार नाही. त्याचवेळी विविध जातपंचायतींनी पिडलेल्या पीडितांना शोधणे, त्यांना धीर देणे, शक्य तेवढी कायदेशीर व अन्य मदत मिळवून देण्याचे सामाजिक कार्य कार्यकर्त्यांना सातत्याने करीत राहावे लागणार आहे.

टीप : सदर घटनेतील व्यक्तींची आणि स्थळांची नावे बदलली आहेत.

(लेखक महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस आहेत.)

## कार्यकर्ता समर कॅम्प

**कोल्हापूर :** ७ व ८ मे २०२२ रोजी मौनी महाराज मठ पाटगाव (ता. भुदरगड) येथे अंनिस कार्यकर्ता समर कॅम्प झाला. यावेळी महाराष्ट्र अंनिस कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष राजाभाऊ शिरगुप्पे उपस्थित होते. गटचर्चा, चळवळीतील गाणी आणि रात्री बराच वेळ सुरू असलेल्या सांस्कृतिक अभिव्यक्ती कार्यक्रमाने अनेकांच्या सुप्त गुणांना वाट मोकळी करून दिली. पाटगाव धरण परिसरातील ट्रेकने कॅम्पचे वेगळेपण वाढवले. संघटनेत नव्याने जोडून घेऊ इच्छिणाऱ्या साथींना हा कॅम्प महत्वाचा वाटला. कॅम्पमध्ये महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. अरुण शिंदे, प्रधानसचिव आकाराम कांबळे, हर्षल जाधव तसेच कोल्हापूर शहर, करवीर, पन्हाळा, शाहूवाडी, शिरोळ, कागल, भुदरगड, राधानगरी, मुरगुड, आजरा, गडहिंग्लज अश्या सर्व शाखांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अनिष्ट प्रथा : कुर्माघर

सूरज उर्मिला सुनिल
८२७५२३५०९७

२८ मे हा दिवस 'जागतिक मासिक पाळी आरोग्य दिन' म्हणून पाळला जातो. 'मासिक पाळी' हा taboo म्हणजेच चारचौघांत बोलण्यास असभ्य समजला जाणारा विषय आहे. या विषयावर कधीच उघड न बोलल्यामुळे स्त्रीच्या शरीरातून दर महिन्याला उत्सर्जित केल्या जाणाऱ्या स्त्रावामागील शरीरविज्ञान समजून घेतले गेले नाही आणि मासिक पाळीसंबंधी समाजात खूपच गैरसमज व अंधश्रद्धा निर्माण झाल्या आहेत. पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे बऱ्याचशा अंधश्रद्धा समाजात आजही सुरूच आहेत. उदा. पाळीच्या दिवसात स्त्रीला स्वयंपाक करू न देणे, स्त्रीला इतरांपासून वेगळे बसवणे, पाळीत दही किंवा लोणचे लावल्यावर ते खराब होते, इत्यादी. तसं पाहाता मासिक पाळी सुरु असताना स्त्रीला व्यवस्थित शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभायला हवे. पण या अनिष्ट रूढी आणि अंधश्रद्धांच्यामुळे तिचे पाळीतील दिवस आणखीनच बिकट बनतात. अशाच अंधश्रद्धांपैकी महाराष्ट्रातील एक सर्वात त्रासदायक कुप्रथा म्हणजे 'कुर्माप्रथा'. महाराष्ट्रात गडचिरोली आणि मध्यभारतातील गोंड आणि माडिया या आदिवासी समाजामध्ये आजही ही प्रथा पाळली जाते आणि त्यामुळे महिलांना अतोनात हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. आम्ही 'समाजबंध' सामाजिक संस्थेमार्फत या प्रथेविरोधात जनजागृती करण्यासाठी दि.२५ मार्च ते २४ एप्रिल २०२२ या एक महिन्याच्या कालावधीत गडचिरोलीमधील भामरागड तालुक्यात वास्तव्य केले आणि या प्रथेविषयी माहिती घेतली.

**कुर्माप्रथा काय आहे?**

कुर्माप्रथेनुसार मासिक पाळी सुरू असलेल्या महिलेला




तिच्या कुटुंबाच्या राहत्या घरापासून दूर गावाबाहेर असलेल्या 'कुर्माघर' इथे राहायला जावे लागते. दिसायला झोपडी किंवा गोठ्यासारखे असलेले कुर्माघर हे महिलांनीच गावाच्या बाहेर बांधलेले असते. पुरुषांनी कुर्माघराला अजिबात हात लावलेला नसतो. पाळी सुरू असताना महिलांना केवळ घरातच नव्हे, तर काही गावांमध्ये तर मुख्य रस्त्यावरसुद्धा यायला परवानगी नसते. घरातील कुणी दुसरी व्यक्ती तिला जेवण बनवून देते. तिची जेवायची भांडीसुद्धा वेगळी असतात. अंघोळीसाठीसुद्धा घरी न जाता तिला नदीवर जावे लागते. तिला जर लहान मूल असेल, तर घराच्या कुंपणापर्यंत येऊन तिथेच बाळाला पाजायचे आणि पुन्हा कुर्माघरात परत जायचे. गावातील धार्मिक नेतृत्वाला 'पेरमा' असं म्हणतात. मासिक पाळीच्या दिवसात महिलेने पेरमाच्या नजरेसही पडायचे नसते. गावात कोणताही सणसमारंभ असेल, तरी त्या महिलेला कुर्माघरातच राहावे लागते. वरीलपैकी कोणताही नियम मोडला, तर दैवी कोपाने त्या गावातील पाळीव प्राणी मरतात, गावात मलेरियाची साथ येते अशा अंधश्रद्धा आहेत. तसेच नियम मोडणाऱ्या स्त्रीच्या कुटुंबाने दंड म्हणून पूर्ण गावाला जेवणासाठी डुक्कर किंवा बकरे द्यावे लागते.

**कुर्माप्रथा का सुरू झाली असावी?**

लोकांना कुर्माप्रथेमागील कारण विचारले तर 'यामुळे महिलांना आराम मिळतो, त्यांना घरातील कामे करावी लागत नाहीत'; असे उत्तर येते. हा आराम घरी बसून घेता येणार नाही का?, असं विचारल्यावर मात्र ते अनुत्तरित होतात. 'ही आमची संस्कृती आहे, आम्हाला ती पाळावीच लागेल', असं म्हणतात. 'पाळीमध्ये रक्त सांडून घरातील जमीन घाण होऊ नये म्हणून स्त्रीला बाहेर राहायला सांगितलं असावं', असा काहींचा अंदाज आहे. पण आता सॅनिटरी पॅड किंवा कापड हे पर्याय उपलब्ध असतानाही कुर्माघरात बसणे, पेरमाच्या नजरेस न पडणे यामुळे कोणतीही तार्किक बाजू नसलेली फक्त स्त्रियांसाठी अन्यायकारक अशी ही एक अंधश्रद्धा आहे, यावर शिक्कामोर्तब होते.

**कुर्माघरांची सद्यस्थिती**

कुर्माप्रथा पाळायची पद्धत गावानुसार वेगवेगळी दिसून येते. काही गावात स्वतःच्या घराला लागूनच एक वेगळी खोली बनवलेली असते, तर काही गावात मुख्य रस्त्यापासून दूर

कुर्माघरे आहेत. पाळी सुरू असलेल्या सर्व महिलांना तिथे एकत्र कोंडून बसावे लागते. कुर्माघरांमधे खूप अस्वच्छता आढळते. पाली, गांडूळ यांचा इथे सतत वावर असतो. पावसाळ्यात तर ही स्थिती अजूनच वाईट होते. गावातील स्त्रियांच्या संख्येच्या मानाने इतक्या छोट्याशा कुर्माघरात त्यांना आराम तर बिलकुल मिळत नाही. काही ठिकाणी थोडी चांगली स्थिती आढळून येते; पण अस्पृश्यतेची जाणीव तर तिथेही असतेच.

**कुर्माघराबाबत स्थानिकांची काही मते**

भामरागड आणि जवळपासच्या ज्या गावांमध्ये कुर्माघर प्रथा आहे अशा गावातील अनेक लोकांना आम्ही भेटलो आणि त्यांची कुर्माप्रथेसंबंधीची मते जाणून घेतली. त्यातील काही प्रातिनिधिक मते येथे देत आहोत.

भामरागड जवळच्याच एका गावातील आशा वर्करना, ''इथे कुर्माघरे आहेत का?'' असं विचारल्यावर त्या म्हणाल्या,



मासिक पाळीत वापरले जाणारे कपडे

''आहेत ना, इथल्या सगळ्या महिलांना कुर्म्यातच राहावं लागतं. दुसरा पर्यायच नाही ना. गावाच्या बाहेर लांब आहे कुर्माघर. बायकांना नाही आवडत तिथं जायला, पण लोक ऐकतच नाहीत. मी आशा सेविका असूनही मला सुद्धा पाळीच्या दिवसात कोणी त्यांच्या घरी येऊ देत नाहीत. दोन वेळा दंड भरलाय मी. मागं एक बाई गेली की साप चावून इथं. साप चावला, पण ती चपळ होती. तिने सापाला पकडून मारून टाकलं. पुरुष लोक तिला हात लावायला तयार नव्हते. तिला दवाखान्यात नेईपर्यंतच तिचा जीव गेला. डॉक्टर इथं येऊन सांगून गेले की प्रथा बंद करा म्हणून, पण कोणीच ऐकत नाही इथलं. कोणत्याच स्त्रीला नाही आवडत ही कुर्म्याची पद्धत पण बंद करता येत नाही.''

दरबा या गावात भेटलेल्या एका तरुणीला याबद्दल विचारल्यावर ती बोलू लागली, कुर्माघर असायलाच पाहिजे. महिलांना किती आराम मिळतो. नाहीतर एरवी घरातली खूप कामे असतात. पण पाच दिवस तिथं नुसतं बसून राहातात ना, त्यापेक्षा काहीतरी निर्मितीची कामे करायला पाहिजेत. वाचायला पाहिजे. काहीतरी शिकलं पाहिजे. पण आता तसं काही नसल्यामुळे मुली काय करतात माहितीय का? त्या कुर्मघरात कंटाळतात. म्हणून कपडे धुवायचं कारण काढून नदीवर जातात. तिथं जास्त वेळ थांबता यावं म्हणून त्या घरातल्या इतर लोकांचे पण सगळे कपडे घेऊन धुवायला जातात. दोन मिनिटांच्या संभाषणातच 'आरामाची प्रथा' पासून 'अधिक काम पाहिजे' पर्यंत विषय गेला.

कुक्कामेटा गावात आम्हाला तिथला पुजारी भेटला. तो म्हणाला, कुर्माघरात असंच कोणालाही साप चावत नाही, तर ज्या महिलेने वाईट काम केलंय तिलाच चावतो. हा एक अदृश्य साप असतो. तो फक्त मलाच दिसतो. आत्ताही तो माझ्याभोवतीच आहे. असा हा अंधश्रद्धा वाढवणारा पुजाऱ्याचा वर्चस्ववादी दृष्टिकोन.

मल्लमपोडूरच्या विद्या पुंगाटी ताईंनी त्यांचा अनुभव सांगितला, लहानपणी माझ्या चुलत बहिणीचं लग्न ठरलं होतं. लग्नाच्या काही दिवस आधीच तिचा कुर्मा घरात साप चावून मृत्यू झाला. तेव्हापासून माझ्या बाबांनी आमच्या घरात ही कुर्माप्रथा कायमची बंद केली. माझं पुण्यात शिक्षण, सामाजिक कार्य यासाठी बाबांचा खूप मोठा पाठिंबा असतो. 'सत्याचे प्रयोग' शिबिराची कार्यप्रणाली जाणून घेतल्यावर विद्या ताईसुद्धा 'समाजबंध'मध्ये सक्रिय कार्यकर्ता म्हणून रुजू झाल्या.

**कुर्माप्रथेचा महिलांना होणारा त्रास**

थोडंफार शिकलेली चाळीशीच्या आतली कोणतीही महिला 'मला कुर्माप्रथा आवडते' असं म्हणणार नाही. या सर्वांनाच ही प्रथा जाचक वाटते. ही अंधश्रद्धा आहे याचीही जाणीव होते आहे; पण फक्त समाजाच्या दबावामुळे त्या स्पष्टपणे बोलायला घाबरतात. पावसाळ्यात दरवर्षी कुर्माघरात साप किंवा विंचू चावून महिलांचा मृत्यू होतो. अशाच घटना सगळीकडे पाहायला मिळतात. आता गावातील बऱ्याच महिला शिक्षण किंवा नोकरीसाठी गावाबाहेर पडत आहेत. कुर्माप्रथा ही निव्वळ अंधश्रद्धा आहे हे त्यांनाही कळून चुकलंय. पण या प्रथेविरुद्ध तोंड उघडणे अवघड असल्यामुळे त्या पाळी सुरू असताना गावात न येणे पसंत करतात. थोडक्यात, 'संस्कृती जपणे' या नावाखाली पाळल्या जाणाऱ्या या प्रथेमुळे शिक्षित स्त्रिया त्यांच्या संस्कृतीपासून व स्वकीयांपासून लांब जात आहेत. त्यामुळे या प्रथेविरोधात बोलणारे स्थानिकांत कोणीच नसतात.

**वादग्रस्त उपाययोजना**

कुर्माघर प्रथेविरोधात स्थानिकांचे प्रबोधन करून ही प्रथा बंद करण्याच्या प्रयत्नांऐवजी या प्रथेमुळे स्त्रियांना होणारा त्रास कमी करण्यासाठी सरकार आणि सामाजिक संस्थांकडून काही उपाय केले जात आहेत. कुर्माप्रथेत होणाऱ्या त्रासावर उपाय

म्हणून गडचिरोली जिल्ह्यात काही सामाजिक संस्था नागरी मानसिकतेतून काही गावांमध्ये सिमेंटची कुर्माघरे बांधून देत आहेत. कुर्माघरांमध्ये टीव्ही, फॅन, शिलाई मशीन देत आहेत. परंतु अशाप्रकारचे उपाय खूपच अयोग्य आहेत. कारण शिक्षण व जनजागृती करून पुढच्या काही वर्षात ती मातीची कुर्माघरे पाडणे सहज शक्य होते. पण सिमेंटची कुर्माघरे ही कुप्रथा अधिकच बळकट करीत आहेत. महिलांना कितीही आराम मिळत असला, तरी त्या अस्पृश्यच राहणार आहेत. कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी आणि या प्रथेतील सौम्यता दर्शवण्यासाठी कुर्माघरांना 'विसावा केंद्र', 'कौशल्य घर' असे नाव दिलेले दिसते. या संकल्पनेचा प्रसार वाढला तर दीर्घकाळासाठी वाईट परिणाम दिसून येतील.

**'समाजबंध'चे 'सत्याचे प्रयोग'**

'समाजबंध' ही २०१६ पासून 'महिला आरोग्य व मासिक पाळी व्यवस्थापन' या विषयांवर काम करणारी सामाजिक संस्था असून महाराष्ट्रातील ग्रामीण व आदिवासी भागात मासिक पाळीविषयी प्रबोधन आणि कापडी सॅनिटरी पॅड निर्मितीचे काम करते. कुर्माप्रथेविरोधात या संस्थेने प्रबोधनाचा मार्ग निवडला. यासाठी एप्रिल २०२२ मध्ये त्यांनी भामरागड, जि. गडचिरोली येथे 'सत्याचे प्रयोग' या आठ दिवसीय शिबिराचे आयोजन केले. या शिबिरामधून भामरागड तालुक्यातील अठरा गावांमध्ये प्रत्येक गावात एक महिला आणि एक पुरुष कार्यकर्ते राहायला गेले. सात दिवस त्याच गावात राहून लोकांसोबत सहभोजन, सहनिवास करत त्यांनी मासिक पाळी विषयावर प्रबोधनाचे काम केले. पाळीविषयी माहितीसाठी 'प-पाळीचा' सत्र, कापडी पॅड प्रशिक्षण, कुर्माघरांची स्वच्छता, महिला सभा, पथनाट्य अशा माध्यमातून त्यांनी प्रबोधन केले. सात दिवसात कुर्माप्रथा मोडणे तसे अशक्यच. पण अठरापैकी बऱ्याच गावांत बदलासाठी प्रयत्न करण्याची इच्छा दिसून आली. यापुढे मासिक पाळी विषयात काम करण्यासाठी प्रत्येक गावातून काही महिलांची 'आरोग्यसखी' म्हणून निवड करण्यात आली. या सात दिवसांत केलेले सर्वेक्षण, निरीक्षणे आणि आलेले अनुभव यांच्या आधारे कुर्माप्रथा बंद करण्यासाठी 'समाजबंध'ने नियोजन केले आहे.

समाजबंधचे विश्वस्त सचिन आशा सुभाष यांनी याबद्दलचा दृष्टिकोन मांडताना सांगितले की, ही प्रथा इतर कोणत्याही दबावाने मोडण्यापेक्षा तिथल्या लोकांनीच उत्स्फूर्तपणे त्यावर विचारमंथन करून ती प्रथा बदलण्यासाठी पाऊल उचलणे गरजेचे आहे. त्यांना त्यासाठी दिशा देण्याचे काम समाजबंध करीत आहे. त्यासाठीच हा प्रबोधनाचा मार्ग अवलंबला जातो आहे. यापुढे देखील लोकांचे याविषयी सतत प्रबोधन केले जाईल. ही प्रथा मोडण्याचे धारिष्ट्य त्यांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी समाजबंध प्रयत्नशील राहील. गरज पडलीच, तर त्यांना शासकीय पातळीवरूनही मदत करण्याची समाजबंधची तयारी आहे. पण यासाठी कोणत्याही कायद्यापेक्षा किंवा इतर कोणत्याही दबावापेक्षा स्थानिक लोकांना पुढाकार घ्यायला प्रवृत्त केले जाईल.

(लेखक 'समाजबंध' संस्थेचे आणि 'महा.अंनिस'चे कार्यकर्ते आहेत.)

●

## अभिनंदन

कृष्णा चांदगुडे लिखित 'जात पंचायतींना मूठमाती' या पुस्तकात पिडीत महिलांच्या व्यथा मांडल्या आहे. ते वाचून अंगावर काटे उभे राहतात. असाच प्रसंग पुणे येथे घडला. वाचक असलेल्या शोभा अशोक धुमाळ यांच्या वाचनात सदर पुस्तक आले. हे काम किती अवघड आहे, याची त्यांना जाणीव झाली. त्यांच्या मनात महाराष्ट्र अंनिसच्या कामाबद्दल आदर निर्माण झाला. त्यांनी लेखक कृष्णा चांदगुडे यांच्याकडे आपली इच्छा व्यक्त केली व समितीला दरवर्षी पाच हजार रुपये देणगी जाहीर केली. या वर्षीची पाच हजार रुपये देणगी पाठवली सुद्धा ! त्यांचे समितीच्यावतीने हार्दिक अभिनंदन व आभार !



## राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

**इस्लामपूर :** येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती इस्लामपूर शाखेच्या पुढाकाराने लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर अभिवादन करण्यात आले.

तहसीलदार प्रदीप उबाळे, अंनिसचे राज्य उपाध्यक्ष प्रा. शामराव पाटील, राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे, उपनगराध्यक्ष दादासाहेब पाटील, चिमण डांगे, खंडेराव जाधव, शहाजी पाटील, रोजा किणीकर, तक्षशीला ज्ञान केंद्राचे अध्यक्ष प्रकाश कांबळे, प्राचार्य डॉ. सुदाम माने, वनरक्षक अधिकारी अरविंद कांबळे, प्रा. एल. डी. पाटील उपस्थित होते. प्रा. बी. आर. जाधव यांनी स्वागत केले, अजय भालकर, निलेश कुडाळकर, सूरज पाटील, अशोक बाबर, राजेंद्र मोटे यांनी संयोजन केले.

मनापासून



# आनंदाचा शोध

डॉ. प्रदीप पाटकर
९८६९४७२२१५

आजवर आपल्याला कुणी दुखावले, कुणी झिडकारले, कुणी अपमानित केले याचेच मनात सतत हिशेब करत बसणारी मंडळी ओपीडीत तळमळताना दिसतात. कोण आपल्याला कसा, कधी धोका देईल या भीतीपोटी पॅरानोईड मंडळी अस्वस्थ होऊन सतत इतरांच्या कृतीचा, विभ्रमाचा, शब्दस्वरांचा कानोसा घेत राहातात, मनात गणिते चालतात ती छळाची. अनिश्चित जीवनाला न स्वीकारून 'काय होईल, कसे होईल' या प्रश्नाखाली स्वत:ला चिरडून घेत माणसे चिंताग्रस्त होतात. आपल्या आजूबाजूला घडलेल्या घटनांना आपणच जबाबदार आहोत, असे आत्मपीडन करीत राहून निराशेने ग्रस्त माणसे अधिक खचत जातात. मनातील भूतकाळाच्या गदारोळात वर्तमानाची जाणीव हरवते. विवेकाचा (आधीच क्षीण असलेला) आवाज ऐकू येत नाही.

व्यसन जडावे तसे माणसे एकमेकांना छळत राहातात. आजची आपली कृती आपले भविष्य घडवित असते. भूतकाळची सावली दिवसेंदिवस अधिकाधिक विक्राळ स्वरूप धारण करून आपली कल्पनासृष्टी कुरतडत राहाते. एखादा शांत क्षण लाभला तर नव्याकडे कुतुहलाने पाहाण्याऐवजी माणसे भयाने मागेपुढे पाहू लागतात. माझ्यासमोर बसलेली कित्येक माणसे माझे बोलणे ऐकण्याऐवजी स्वत:च्याच कानात फिक्स केलेले, आजवरच्या जीवनाची रेकॉर्ड पुन्हा पुन्हा ऐकविणारे वॉकमॅन ऐकत राहातात. आपल्या चुकीची किंमत वसूल केल्याशिवाय काळ स्वस्थ बसणार नाही हे काहींना जाणवते व ते भयभीत होतात. काही जणांना त्यांच्या चुका समजत नाहीत, त्या स्वीकारता येत नाहीत. ते बदलायला तयार नसतात. आपण न बदलता जगानेच बदलायला हवे असा हट्ट काही माणसे धरून बसतात. ती डॉक्टर बदलतात, उपचार सोडून देतात, पण आपले विचारभ्रम आयुष्यभर कवटाळून बसतात. पडेल ती किंमत मोजून आनंदाचा शोध घेणारा आध्यात्मिक विरळाच! मनोभंगातून सावरून पुन्हा उभे राहाणे काहींनाच जमते. पण पुन्हा पुन्हा धाडस तेही त्याच अविवेकी कल्पना-प्रतिमांवर विश्वास ठेवून असे मात्र सतत चालू असते.

भंगलेली मने एकत्र जोडण्याचा आटोकाट प्रयत्न आपण करायचा आणि रुग्णांनी ते सारे प्रयत्न उधळून पुन्हा आत्मपीडनाच्या सापळ्यात आपणहून शिरायचे हे ओपीडीत सतत अनुभवायला येत असते. जणू काही मनःस्तापाने समृद्ध! जगायचे असा निश्चय करूनच ही मंडळी उपचारात खंड पाडतात. सतत अनुभव आला तरी परत अशा काटेरी वनात मुसंडी मारून ते का घुसतात, हा प्रश्न मला छळत राहातो. सामोरी येणारी कारणे एवढी समर्पक वाटत नाहीत. उत्तरे नसलेल्या प्रश्नचिन्हांनी बरबटलेल्या दलदलीत माणसे पुन्हा पुन्हा उतरतात. ही कुठली सक्ती त्यांच्या मनावर अधिराज्य गाजवित असते ते कळत नाही. डेरिंग असतानाही बेसावध मन चरफडत राहाते.

अशा वेळी रुग्णांच्या उद्वेगाची काळी सावली माझ्याही मनावर अचानक काजळी धरते. आपल्या जवळची सारी मानसोपचाराची क्षेत्रे बोथट पडू लागतात, ती जाणीव अस्वस्थ करते. स्वत:ला अपराधी वाटण्याचे काही कारण नसताना अपराधित्व मनाला पोखरू पाहाते. मनःस्तापाला छळाकडे वळवते. माणसे दुःखाचा सखोल अनुभव घेत राहातात. बरे, हे जीवन नाकारून देहत्यागाचा प्रयत्न करणारे, विकृत होऊ पाहाणारे, वर पारलौकिकाची वाट शोधणारे आनंदी होताना दिसताहेत असेही नाही. तो उपाय नव्हेच असे मग वाटत राहाते. दुःखनिर्मितीची अपरिमित ओढ नात्यासंबंधात, व्यवहारात, जगण्यात दाखवणारी माणसे, सुखाच्या, आनंदाच्या, नवनिर्मितीच्या, समृद्ध जगण्याच्या मार्गाचा शोध मात्र पोटतिडिकेने घेताना दिसत नाहीत. 'सुख आहे', हा बुद्धाचा आश्वासक विचार जणू हे सारे नाकारतात. स्वत:ची स्वतंत्र इच्छाशक्ती हवीतशी वापरून माणसे आयुष्य दुःखमय करतात, तेव्हा मन हतबल होते.

मानवाने आपल्या स्वतंत्र, सार्वभौम अस्तित्वाला ओळखून तेथेच स्वर्गसुखाचा आनंद घ्यायला हवा. त्यासाठी विवेकी, वस्तुनिष्ठ, संयमीत, लवचिक, विचारी, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर आचार-विचारात करायला हवा असे सतत वाटत राहाते. थकूनभागून मी ओपीडीतून रात्री घरी येतो, आपल्या रुग्णांचे दुःखमय जग बदलून ते सुखमय करायचे हा निश्चय मात्र थकलेल्या मनात घोळत असतो. बाहेरचे गेट उघडून आत येतो, तेव्हाच शेजारचा पारिजातक पुन्हा फुललेला दिसतो. पारिजातकाचा, रातराणीचा सुगंधही वातावरणात दरवळत असतो.

(लेखक प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ आहेत.)

●



# एकमेव वसुंधरा

शंकर शेलार
९६५७८८७५३२

मानवाने पृथ्वीतलावर हवा, पाणी, जमीन या तीनही ठिकाणी अमर्याद प्रदूषण केले आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस जास्तच बिघडत चालला आहे. जर पर्यावरणाचा ऱ्हास असाच बेसुमार होत राहिला, तर एक दिवस जीवसृष्टीचा विनाश निश्चितच होईल. जागतिक तापमान वाढीचा सध्याचा वेग पाहाता सृष्टीचा अंत अगदी समीप येऊन ठेपला आहे. मानवी संस्कृतीसह अखिल सृष्टीवरील विनाशकारी संकटाची खात्री पटल्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघाने (UNO) १९७४ सालापासून ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन (World Environment Day) म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.




जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यामागील उद्देश असा आहे की, माणसांकडून होत असलेले प्रदूषण, निसर्गसंपदेचा बेछूट वापर, त्यातून घडणारा पर्यावरणाचा ऱ्हास आणि परिणामी अंतिमतः जीवसृष्टीच्या अस्तित्वास निर्माण झालेला धोका, याबद्दल समाजामध्ये जाणीव-जागृती करणे, तसेच पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांना प्रेरित करणे यासाठीच प्रतिवर्षी एक नवीन विषय (Theme) घेऊन लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी ५ जूनचे प्रयोजन. या वैश्विक व्यासपीठाचे यजमानपद प्रतिवर्षी वेगवेगळ्या देशाकडे दिले जाते.

यावर्षी स्वीडन हा देश यजमान असून, 'एकमेव वसुंधरा' (Only One Earth) ही या वर्षासाठीची थीम आहे. शाश्वत जीवन जगण्यासाठी मानवाला निसर्गस्नेही, पर्यावरणपूरक (Ecofriendly) जीवनशैली अवलंबावी लागेल. सध्याच्या चंगळवादी जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडवावे लागतील. पर्यावरणास हानीकारक ठरणाऱ्या आपल्या सवयी, इच्छा आकांक्षा, क्षुल्लक स्वार्थ, हव्यास, वखवख इत्यादींचा त्याग करावा लागेल. पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारली तरच आपण आपल्या एकुलत्या एक वसुंधरेला वाचवू शकू. हा या वर्षीच्या थीमचा संदेश आहे.

पृथ्वी हा मानवास ज्ञात असलेला विश्वातील एकमेव असा ग्रह आहे, ज्यावर सजीवसृष्टी नांदते आहे. तिला लाभलेले महत्त्वाचे घटक म्हणजे ३०% मृदावरण (Lithosphere), ७०% जलावरण (Hydrosphere) आणि तिच्याभोवती सुमारे ५०० कि.मी. पसरलेले वातावरण (Atmosphere). या तीन गोष्टींची नैसर्गिक देणगी लाभल्यामुळे पृथ्वीवर जीवन विकसित होऊन, जैव विविधता बहरली आहे. चतुर, बुद्धिमान, महत्त्वाकांक्षी मानव हा या सृष्टीचाच एक घटक पण तो आपल्या दैनंदिन उपद्‌व्यापांमुळे जीवसृष्टीला धोका निर्माण करीत आहे.

जीवसृष्टीवर यापूर्वी अनेक वेळा नैसर्गिक आपत्तींमुळे विनाश ओढवला आहे. त्यामध्ये ५०-६० टक्क्यांपर्यंत सजीवांच्या प्रजाती नष्ट झाल्या होत्या. आता होऊ घातलेल्या विनाशास मात्र माणूस कारणीभूत ठरला आहे. जंगलतोड, जमिनीची उलथापालथ, प्रदूषण इत्यादी गोष्टींमुळे गेल्या ५०० वर्षांत माणसाने सजीवांच्या एकूण ८४४ प्रजाती नष्ट केल्या आहेत.

हवामान बदलामुळे सातत्याने होत असलेली तापमान वाढ हे जागतिक संकट बनले आहे. औद्योगिकीकरण आणि माणूस करीत असलेल्या प्रत्येक कृतीमुळे हरितग्रह वायूंचे उत्सर्जन वाढत आहे. कर्बवायू, मिथेन, ओझोन, नायट्रस ऑक्साईड, क्लोरोफ्लुरो, हायड्रोफ्लुरो कार्बन, पाण्याची वाफ इत्यादी घटक उष्णता शोषून घेतात व वातावरण तापवतात म्हणून त्यांना ग्रीनहाऊस गॅसेस म्हणतात. यांचे सर्वांचे मिळून हवेतील प्रमाण फक्त १% असते, पण त्यामध्ये थोडी जरी वाढ झाली तर पृथ्वीच्या सरासरी तापमानात वाढ होते. ही वाढ १.५ ते २ टक्के झाली तरी जीवसृष्टीस धोका संभवतो.

**तापमान वाढीचे दुष्परिणाम :**

पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवांवरील बर्फ वितळल्याने समुद्राच्या पातळीत वाढ होऊन मुंबई बंदरासारख्या शहरांना जलसमाधी मिळेल, समुद्राच्या पाण्याचे तापमान व आम्लता वाढल्याने तेथील जैवविविधतेला मोठी हानी पोहोचेल. अतिवृष्टी, अवर्षण, महापूर, ढगफुटी, त्सुनामी, दरडी कोसळणे,

चक्रीवादळं, थंडीची लाट, उष्माघात अशा अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींचा सध्या सामना करावा लागत आहे. याची वारंवारता आणि तीव्रता वाढतच राहाणार. हे थांबवायचे असेल तर हरितगृह वायूंचे वाढते उत्सर्जन थांबवायलाच हवे.

आपण दररोज वापरत असलेल्या पेट्रोल, नैसर्गिक वायू, दगडी कोळसा या इंधनांमुळे कर्बवायू उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होत आहे. कारखाने, शेती उद्योग, खते, कीटकनाशके, सेंद्रिय पदार्थांचे कुजणे, जनावरांचे शेण इत्यादींमुळे मिथेन, नायट्रस ऑक्साईड सारखे कार्बन डायऑक्साईडपेक्षा अनेक पटींनी उष्णता शोषणारे वायू आपण वातावरणात सोडत असतो. त्यामुळे तापमान वाढ सातत्याने होत आहे.

जंगलं, वनं ही सृष्टीची फुफ्फुसे आहेत. वातावरणातील कर्बवायू कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात म्हणून त्यांना ऑक्सिजन फॅक्टरीज म्हणतात. पण दररोज शेकडो हेक्टर वृक्षतोड केली जात आहे. तापमान वाढीमुळे अनेक वनांना आगी लागत आहेत, बऱ्याच वेळा मुद्दाम वणवे लावले जातात. त्यामुळे वनांचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा खूप घटत चालले आहे. परिणामी, वातावरणात दररोज सोडल्या जाणाऱ्या कार्बन डायऑक्साईडचे शोषण होऊ शकत नाही आणि तापमान वाढत राहाते.

आयपीसीसी (Inter Governmental Panel for Climate Change) च्या २०२१ च्या अहवालानुसार १७५० पर्यंत सरासरी तापमान १४ डिग्री सेल्सियस होते. २०२० पर्यंत त्यामध्ये ०.७० डिग्री वाढ झाली आहे. २०३० सालापर्यंत ही वाढ १.५ डिग्री सेल्सिअसवर रोखायला हवी. त्यासाठी प्रत्येक देशाने कार्बन क्रेडिट लिमिटप्रमाणे कर्ब उत्सर्जन मर्यादा पाळायला हवी. पवन ऊर्जा, सौर ऊर्जा इत्यादी अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढवून २०५० सालापर्यंत खनिज इंधनांचा वापर पूर्णपणे बंद करण्यात यावा. असे झाले तरच तापमान वाढ थांबवता येईल.

कार्बन उत्सर्जन कमी करून हवामान बदलाचे संकट टाळायचे असेल, तर तातडीने पुढील उपाय योजावे लागतील. खाजगी वाहने टाळून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करा, विजेसाठी एल ई डी वापरा, शेतीपंपांना कपॅसिटर वापरा, कीटकनाशकांचा वापर टाळा, पाण्याचा अपव्यय टाळा आणि वनांना वणवे, आगी लावणे थांबवा, वृक्षतोड तात्काळ थांबवा. प्रगत, सुखी जीवन जगण्यासाठी जादा ऊर्जा वापर आवश्यक आहे. त्यासाठी आपण सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, बायो फ्युयेलचा वापर वाढवायला हवा. कार्बन डायऑक्साईड वायूचे शोषण करून सजीवांस आवश्यक असलेला प्राणवायू देणाऱ्या वृक्षांचे रोपण करून त्यांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. चंगळवाद सोडा, पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारा तरच जीवसृष्टीवरील संकट टळू शकेल, ही जाणीवजागृती करण्यासाठी पर्यावरण दिनाचे आयोजन केले जाते.

(लेखक खगोल अभ्यासक आहेत.)

## आंतरजातीय विवाह केल्याने नाकारला योजनांचा लाभ

**नाशिक :** आंतरजातीय विवाह केलेल्या आदिवासी युवतीला शासकीय-निमशासकीय योजनांचा लाभ ग्रामपंचायत सदस्य आणि जात-पंचायतीचे सदस्य यांनी नाकारल्याची बाब उघड झाली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र अंनिसच्या नाशिक येथील कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. सोनाली एकनाथ कातवारे (रा. रायांबे, ता. इगतपुरी) हिने मच्छिंद्र साहेबराव दोंदे या अनुसूचित जातीच्या युवकाशी आंतरजातीय विवाह केला आहे. मात्र, हा विवाह करताना तिने तिच्या आई-वडिलांना विचारले नव्हते. आदिवासी समाजाच्या रूढी परंपरांचे पालन केले नव्हते. त्यामुळे भविष्यात मिळणाऱ्या आदिवासी जमातीच्या शासकीय निमशासकीय योजनांचा लाभ घेणार नाही, असे सोशल मिडियावर फिरत असलेल्या सोनालीच्या अर्जात नमूद आहे. आदिवासी समाजात छुप्या पद्धतीने कार्यरत असलेल्या जात-पंचायतीने असा अर्ज सोनालीकडून बळजबरीने लिहून घेतला नसावा का?, हा अर्ज लिहून घेणाऱ्यांमध्ये ग्राम-पंचायतीच्या सरपंचासह, इतर काही ग्रामपंचायत सदस्यांच्या आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या प्रकरणातील दोषींवर सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा तसेच इतर आवश्यक कायदा कलमांद्वारे कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी अंनिसचे ठकसेन गोराणे, कृष्णा चांदगुडे, ॲड. समीर शिंदे, महेंद्र दातरंगे उपस्थित होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे
**विवेक जागर प्रकाशन**
**सवलतीच्या दरात घरपोच मिळतील**
**संपर्क**
७२७६५५९३१८/९९६९४ ७३७०२
**कार्यालय**
अविनाश पाटील, कार्याध्यक्ष, महा. अंनिस,
भास्कर, ६८, कालीकादेवी नगर,
संगमा चौक, धुळे-०१.



# देहदानामुळे जीवन आणि मृत्यूही अर्थपूर्ण होतो!

डॉ. तीर्थराज कापगते
८६५७०४९५०७

माझा आणि देहदानाचा संबंध फार वर्षांपूर्वी आला. देहदानाच्या चळवळीत देह झिजवणारे डॉ. चंद्रकांत मेहेर हे माझे चांगले मित्र आहेत. सुमारे बावीस वर्षांपूर्वी 'सामना' या दैनिकात उपसंपादक असताना मी त्यांची एक मुलाखत घेतलेली आठवते. श्री. मेहेर यांनी देहदान या विषयाचा सर्वांगीण अभ्यास करून डॉक्टरेट पदवी प्राप्त केली आहे. या क्षेत्रातील त्यांचे योगदान फार मोलाचे आहे. श्री. मेहेर हे आगरकरी बाण्याचे, विवेकी बुद्धिमत्तेचे एक सुधारकी व्यक्तिमत्त्व आहे! अंधश्रद्धा निर्मूलन समितीचेही ते कार्यकर्ते आहेत. त्यावेळी देहदानाविषयी त्यांची मते, त्यांनी केलेले चिंतन आणि त्यांनी सांगितलेले देहदानाचे फायदे ऐकून तर मी थक्क होऊन जात असे.

परिणामतः तेव्हाच मी आणि माझी पत्नी संगीता, आम्ही उभयतांनी देहदानाचा संकल्प करून टाकला. त्यामुळेच माझे प्राध्यापक मित्र डॉ. सुशील मेश्राम यांनी देहदान चळवळीत स्वतःला झोकून दिले आहे, हे कळल्यावर मला फार आनंद झाला. डॉ. मेश्राम यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रामाणिकपणा आणि त्यांची जागरूक विचारसरणी याविषयी आधीही त्यांच्याविषयी मला आदर होताच; पण आता त्यांच्या या देहदानाच्या कार्यामुळे तो आदर आणखी दुणावला. या चळवळीतील कार्यकर्ता हा खरोखर कर्ता सुधारक असतो. 'आधी केले मग सांगितले' ही अशा समाजकार्याची एक आवश्यक अट असते. मेश्राम सरांच्या कुटुंबातील २८ जणांनी देहदानाचा संकल्प केल्याचे ऐकल्यावर मला त्यांचा फार अभिमान वाटला.

माणसाला सर्वात जास्त भीती मृत्यूची वाटते; त्यामुळे मृत्यू आणि त्यानंतरच्या देहदानाचा विचार करायला तो घाबरतो. एक दिवस आपण मरणार आहोत हे कटू सत्य त्याला माहीतच असते; पण तरीही त्या घटनेला अजून खूप काळ जायचा आहे असे तो गृहीत धरून चालतो. म्हणूनच प्रत्येक माणूस स्वतःच्या देहाचे प्राणपणाने रक्षण करण्यासाठी क्षणोक्षणी सावध असतो. जगण्याची ही तीव्र जिगीषा आणि आकांक्षा यामुळेच हे जग जिवंत आहे; ती एक नैसर्गिक आणि मूलभूत प्रेरणा आहे. म्हणून मृत्यू ही अपरिहार्य आणि अकस्मात घडणारी घटना असली, तरी मला एवढ्यात मरायचे नाही, असे जख्ख म्हाताऱ्यालाही वाटत असते. हे जीवन अमूल्य आहे हे प्रत्येकालाच कळत असते. देहाच्या अस्तित्वाच्या जाणिवेमुळेच प्रत्येक जण सदान्कदा ऐहिकात प्रवृत्त झालेला असतो आणि जीवनाची अशी आसक्ती असणे ही तर अतिशय सुंदर जैविक भावना आहे.

'या जन्मावर, या जगण्यावर
शतदा प्रेम करावे ...'
किंवा
'अनंत मरणे झेलून घ्यावी
इथल्या जगण्यासाठी ...'

असे कवी मंगेश पाडगावकर म्हणतात. या जन्मावर आणि जगण्यावर माणसाचे प्रेम असते ते स्वतःच्या देहाच्या माध्यमातूनच. म्हणूनच कदाचित तो मृत्यूपरांत देहदानालाही धजावत नसावा. मृत शरीराच्या अंतिम संस्काराविषयी असलेल्या धार्मिक पगड्यामुळेही देहदानाच्या संकल्पाविषयी माणूस उदासीन असावा. मात्र आजचा काळ नव्या बदलाचा आहे. माणसाला जीवनशैली आणि विधिनिषेध शिकवणाऱ्या प्रत्येक धर्माने अंत्यसंस्काराच्याही विविध पद्धती सांगितल्या आहेत. त्यात समाजहिताचाच विचार जरी होता तरीही अंत्यसंस्काराविषयी समाजाच्या धारणा काळानुरूप बदलायला पाहिजेत. सहज आणि सोपे विधी, खर्चात बचत, जागेचे प्रश्न आणि प्रदूषण अशा अनेक कारणांचा विचार करता अंत्यसंस्कारांच्या विधींमध्ये देखील बदल करायला हवेत.

माणूस आयुष्यभर मरणाच्या भीतीत वावरत असला, तरी मृत्यू आहे म्हणून तर मानवी जीवन मूल्यवान ठरते आणि जीवन आहे तोवरच या मानवी देहाचे मोल आहे. आपण आस्तिक असू किंवा नास्तिक; मृत्यूनंतर सर्वांच्याच देहाच्या जैविक क्रिया थांबतात. त्यानंतर देहाचे मोठ्या वेगाने विघटन सुरू होते. आस्तिकांच्या दृष्टीने आत्म्याचे निवासस्थान म्हणजे हे शरीर. ज्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे ते मानतात की, गतप्राण शरीर हे एखाद्या व्यक्तीने आपल्या अंगावरून काढून टाकलेल्या सदऱ्याप्रमाणे असते आणि ते आत्म्याने सोडल्यावर त्यात आसक्ती असू नये. आस्तिक आणि पुनर्जन्मावर विश्वास असणाऱ्या धार्मिक लोकांनी देहदानाकडे त्याच धार्मिक दृष्टीने पाहिले तर देहदान करणे हे त्यांच्या धार्मिकतेला पूरक आहे, असे त्यांच्या लक्षात येईल. पुनर्जन्मावर विश्वास असणाऱ्यांची ही सुद्धा श्रद्धा असते की, आत्मा अनेक प्रकारच्या योनींमधून, जन्मांमधून प्रवास करीतच त्याची शेवटी मोक्षाकडे वाटचाल होत असते. प्रत्येक जन्मात त्याला आसक्तींवर विजय

मिळवायचा असतो. त्या त्या जन्मातील या सर्व आसक्तींचे माध्यम त्याचे त्या त्या जन्मातील शरीर हेच असते. म्हणून त्याने मानव देहाबद्दलची सुद्धा आसक्ती सोडून निष्प्राण देहासाठी जे ऐहिक संस्कार काळानुरूप उचित ठरतील ते विना आसक्ती जिवंतपणीच स्वीकारले पाहिजेत.

नास्तिक किंवा निरीश्वरवादी असे मानतो की, जन्म आणि मृत्यू या दोन नैसर्गिक घटना आहेत. त्यांच्या दरम्यानचा काळ म्हणजेच जीवन आणि हे जीवन सुंदर आहे. ते एकदाच आपल्या वाट्याला येते. या सुंदर जीवनाचा उपभोग घेण्याचे एकमेव साधन म्हणजे आपला देह. नास्तिकाच्या दृष्टीने मृत्यूनंतर देहातील आसक्तीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे मृत्यूनंतर त्या देहाचा उपयोग समाजासाठी व्हावा यात त्याची काहीच हरकत नसते. मृतदेहाचे अवयवदानापासून तर पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने अंत्यविधी अथवा वैद्यकीय अभ्यास आणि संशोधनासाठी आपल्या मृतदेहाचा उपयोग व्हावा यासाठी नास्तिकांनी अग्रेसर असणे गरजेचे आहे.

मानवाच्या शरीरात वयानुसार निर्माण होणाऱ्या काही विकृती, विविध रोगजंतू, बॅक्टेरिया, विषाणू यांच्यामुळे होणारे आजार, अपघात हे माणसाच्या जीवनाचे अटळ भाग झाले आहेत. वैद्यकशास्त्रामुळेच या विकृती, आजार, अपघात, इत्यादीत होणाऱ्या दुखापतींपासून, वेदनांपासून मानवास मुक्ती मिळते. इतर प्राण्यांमध्ये काही जन्मजात विकृती, दुर्बलता असल्या तर ते आपले अन्न मिळविण्यासाठी, जगण्यासाठीचा संघर्ष करण्यास असमर्थ ठरतात आणि त्यांचे जीवन नैसर्गिक आयुर्मानापेक्षा लवकर संपुष्टात येते. मात्र मानवात अशा काही जन्मजात विकृती, दुर्बलता असल्या तरी वैद्यकशास्त्रामुळे त्यास साधारण माणसाप्रमाणे सन्मानाने आयुष्य जगता येते. आधुनिक वैद्यकशास्त्रामुळे मनुष्याचे आयुर्मान वाढले आहे. हॉस्पिटलमध्ये आजारी माणसाच्या दुखण्यावर, मरणप्राय वेदनांवर उपाय केले जातात. दुर्धर आजारांवर इलाज केला जातो. पेशंटला वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जातात. वैद्यकशास्त्र माणसाचे जगणे अधिक आनंदी कसे होईल याचा सातत्याने प्रयत्न करणारे शास्त्र आहे. ज्या वैद्यकशास्त्रामुळे हे सर्व शक्य झाले ते कोणत्या तरी अज्ञात व्यक्तींच्या मृतदेहांवरील संशोधनानेच एवढे विकसित झाले आहे. या विकसित वैद्यकशास्त्राचा सर्वच व्यक्तींना कमीअधिक प्रमाणात आपल्या जीवनात लाभ झालेला असतोच. आपला देह निष्प्राण झाल्यानंतर त्या मृतदेहाच्या माध्यमातून वैद्यकशास्त्राच्या विकासास मदत झाली तर त्याप्रति कृतज्ञता प्रकट करण्याची एक संधी आपल्याला मिळणार आहे.

मृत्यू केव्हा नि कसा व्हावा यावर कोणाचेही नियंत्रण नाही. तरीही आपला मृत्यू वेदनारहित व्हावा अशी इच्छा प्रत्येकाचीच असते. परंतु आपल्या आसपास काही वेळा संशयास्पद किंवा घातपाताने, अपघाताने मृत्यू होत असतात. त्यावेळी झालेल्या अन्यायात, गुन्ह्यात न्याय स्थापित व्हावा असे सर्वांनाच वाटत असते. अशा प्रकारे मृत्यू झालेल्या व्यक्तीने आपल्या मृत्यूनंतर आपल्या मृतदेहावर कसे संस्कार केले जावेत याबाबत कोणतीही इच्छा त्यापूर्वी व्यक्त केलेली असली, तरी अशावेळी न्यायवैद्यकशास्त्रानुसार केल्या जाणाऱ्या शवपरीक्षणाला आणि शवविच्छेदनाला फार महत्त्व असते. हे आपल्या कोणाच्याही बाबतीत घडू शकते. त्यामुळे आपल्या मृतदेहावर कसे अंत्यसंस्कार व्हावेत याबाबत आपण आपली इच्छा व्यक्त करण्यात काहीही गैर नसले तरी परिस्थितीवरच ते सोपवून त्याबाबत उदासीन राहावे, हे निश्चितच शहाणपणाचे ठरावे.

स्वतः तर दीर्घकाळ जगावे; परंतु आपल्या या जगातून जाण्याने मानवी जीवनाची साखळी अखंड राहणार आहे, याचेही भान ठेवावे. जिवंत असताना आपलेही अस्तित्व इथे झळाळून गेले होते. आपण हे सुंदर जग उपभोगले आहे. त्याचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी जिवंतपणी आपलेही काही योगदान राहिले आहे आणि म्हणूनच मृत्यूनंतरही हे जग सुंदर राहावे यासाठी आपले योगदान असले पाहिजे. अर्थपूर्ण जगण्याच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या असू शकतात. अनेकजण मरेपर्यंत या अर्थाच्या शोधात भटकत असतात; पण आयुष्याचा अर्थ बऱ्याच जणांच्या हाती लागत नाही. देहदानामुळे मात्र संपूर्ण देह आपल्यामागे राहिलेल्या जगाच्या सत्कारणी लागतो म्हणजे एकप्रकारे आपले सारे भौतिक अस्तित्वच संपन्न होते. मृत्यूपर्यंतच्या जगण्याला नवाच अर्थ प्राप्त होतो आणि हे देहदानाचे सत्कृत्य केवळ आपल्या मृत्यूमुळे घडून येते; साहजिकच आपला मृत्यूही अर्थपूर्ण होऊन जातो.

'हा देह तुझा पण देहाविण तू कोण ?
हा देह तुझा पण देहातील तू कोण ?'

असे रॉय किणीकर म्हणायचे. आपण खरेच कोण आहोत या तात्त्विक प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळणे कठीण आहे; पण आपण जे कोणी आहोत ते केवळ या देहामुळे आहोत. या देहामुळेच या वस्तुरूप व नामरूप जगाचा आपण एक भाग बनू शकलो. म्हणूनच स्वतःचा देह मरणोपरांत संशोधकांना अभ्यासासाठी दान करून मानवी जीवनासाठी महत्त्वाचे योगदान देण्याची संधी प्रत्येकाला देहदानामुळे लाभू शकते. रक्तदान, नेत्रदान, मूत्रपिंडदान किंवा अवयवदान यापेक्षाही देहदान हे सर्वोपरी दान आहे. सर्वांनी या दानाचे महत्त्व आणि त्याची उपयुक्तता समजून घ्यायला हवी. देहदान म्हणजे देह केवळ राष्ट्रार्पण करणे नसून देह मानवार्पण करणे होय, असे मला वाटते.

(लेखक प्रसिद्ध कवी व विचारवंत आहेत.)

●



# महाराष्ट्र अंनिसची खबरबात

विशाल विमल
७२७६५५९३१८

## उत्सव नाचून नव्हे; तर वाचून करावा

**शिंदखेडा :** सर्वच महापुरुषांच्या जयंती आणि स्मृतीदिनांच्या कार्यक्रमांना बटबटीत उत्सवी स्वरूप आले आहे. या सर्व महापुरुषांच्या जयंती ऊत्सव हे वैचारिक कार्यक्रमांनी साजरे झाले पाहिजे. बाबासाहेब आंबेडकरांनी तर दिवसरात्र अभ्यास करून, वाचन करून समाजासाठी आपले जिवन समर्पित केले. त्यांनी लिहीलेल्या घटनेवरच देशाची वाटचाल सुरू आहे. म्हणूनच त्यांचा उत्सव नाचून नव्हे तर वाचून साजरा केला पाहिजे, असे मत महाराष्ट्र अनिसच्या निधी व्यवस्थापन विभागाचे कार्यवाह प्रा. परेश शाह यांनी येथे व्यक्त केले.येथील फुले, शाहू, आंबेडकर विचारमंच तर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याजयंती निमित्तवक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकूण २६ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रा. भीमराव कढरे, प्रा. रावसाहेब बोरसे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. जी. के. परमार व प्रा. अनिल माळी यांनी स्पर्धेचे परिक्षक म्हणून काम पाहिले.

## छत्रपती शाहूंना विविध ठिकाणी अभिवादन



**गडचिरोली :** गडचिरोली, उराडी, लखमापूर बोरी, घोट, चामोर्शी, नवेगाव (मुरखडा) या सात शाखांमध्ये छत्रपती शाहू महाराजांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा, शाखांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समविचारी संस्था संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. नेहरू युवा केंद्र प्रेरित शिवछत्रपती युवक मंडळ यांचा सहभाग राहिला.

महाराष्ट्रदिनी गडचिरोली शहर शाखा व जिल्हा शाखेच्या कार्यकर्त्यांचा पारिवारिक मेळावा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ. शिवनाथ कुंभारे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून जेष्ठ पत्रकार रोहिदास राऊत, माजी जिल्हा उपाध्यक्ष देवाजी सोनटक्के, प्रमुख पाहुणे म्हणून संस्कृती लॉनचे संचालक सुनीलभाऊ पोरड्डीवार, जिल्हा उपाध्यक्ष विवेक मून, जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे, जिल्हा प्रधान सचिव विलास पारखी, शहर अध्यक्ष शब्बिर शेख, सर्वोदय मंडळांचे अध्यक्ष देवानंद कामडी आदी उपस्थित होते.

## मुलांना हसत–खेळत दृष्टी देणारे साहस शिबीर



**पनवेल :** महाराष्ट्र अंनिस पनवेल शाखेने ५ ते १२ वयोगटाच्या ७६ मुलांसाठी ३ दिवसीय साहस शिबिर (२२ एप्रिल ते २४ एप्रिल) आयोजित केले होते. वस्तूंच्या रचनेतून फुलं साकारत उद्घाटन केले. चमत्कारामागील विज्ञान, फायर फायटिंग, आकाश दर्शन, रॅपलिंग, व्हॅली क्रॉसिंग, मातीकाम, कलाविष्कार, ‘सापडलं रे सापडलं’ रिंगणं नाटक, झुंबा सेशन, लाठीकाठी, वयात येताना, लेखन कार्यशाळा आदी उपक्रम शिबिरात झाले. वैष्णवी पडवळहिला बेस्ट कॅम्परचा अवॉर्ड देण्यात आला. सर्व मुलांना सहभाग सर्टिफिकेट देण्यात आले. महेंद्र पाटेकर, उल्हास ठाकूर व टीम, पारखे, श्रीराम कोळी व टीम, नैना. सुरज व टीम, आरती नाईक यांनी शिबिरात मार्गदर्शन केले.

महात्मा ज्योतिबा फुले जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नेर पनवेल येथे प्रबोधनपर गाणी व सांविधानिक मूल्यांवर आधारित रिंगण नाट्य ‘सापडलं रे सापडलं’ ह्या नाटकांचे सादरीकरण केले.

## डाकीण प्रकरणी चार जणांना अटक

**शहादा :** मध्यप्रदेश मधील बायगोर या गावातील एका महिलेला डाकीण ठरवून तिच्यावर अमानुषपणे अत्याचार करण्यात आले होते. त्या महिलेची केस खेतिया येथे नोंदवून घेतली गेली नाही.

त्या महिलेचे वडील यांनी नंदुरबार जिल्ह्यातील शहादा शाखेशी संपर्क केला. त्यानंतर शाखेच्या पुढाकाराने जळगाव येथिल पोलीस ठाण्यात ४ अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

पुढे हा गुन्हा मध्यप्रदेश पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. पोलिसांनी चार व्यक्तींना या प्रकरणी अटक केली आहे.

## चमत्कारातून विज्ञान दर्शन

**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने त्रिमूर्ती सेवा मंडळ टेंबीपाडा भांडुप पश्चिम येथे चमत्कार सादरिकरण व अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजित केले होते. यावेळी महाराष्ट्र अंनिसचे प्रधान सचिव नंदकिशोर तळाशिलकर,विजय परब,चिन्मय चोरघे यांनी चमत्कार सादरीकरण केले.

## जोगदंड यांचे व्याख्यान

**ठाणे :** डॉ बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती मंडळ अंबरनाथ यांच्यावतीने अंबरनाथ येथे जयंती महोत्सवात ‘धर्मांध शक्तीचा संविधानाला असलेला धोका’ या विषयावर अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका मासिकाचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांचे व्याख्यान झाले.

## विद्यार्थ्यांनी हसत खेळत घेतले संविधानाचे धडे

**वर्धा :** महाराष्ट्र अंनिसने सन २००७ पासून संविधान प्रबोधन महोत्सवाची सुरुवात केली. अतिशय सुंदर व सोप्या भाषेत संपुर्ण संविधानाचे सार असलेली प्रस्ताविका समितीचे कार्यकर्ते संपुर्ण राज्यात हसत खेळत अतिशय सुंदर व सोप्या भाषेत समजावून सांगतात.

श्रीकृष्ण हायस्कूल सावंगी येथील विद्यार्थ्यांच्या संस्कार शिबीरात महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा युवा विभागाचे सहकार्यवाह निखिल जवादे यांनी विद्यार्थ्यांना संविधानाच्या प्रस्ताविकेतील मुल्य, समता, बधुता, स्वातंत्र्य, अधिकार, कर्तव्य आदींची ओळख अतिशय सुंदर व सोप्या भाषेत हसत खेळत समजावून सांगितले.

यावेळी चमत्काराचे सादरीकरण केले. सापांची माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गुरूदेव सेवा समितीचे बा. द. हांडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन शिबीर प्रमुख खोबे गुरुजी यांनी केले.

## कामगार कायदे जनजागृती

**खोपोली–खालापूर :** १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महाराष्ट्र अंनिसखोपोलीखालापूर शाखेने कामगार कायदे या बद्दल जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. स्टेट बँक एटीएम, दीपक हॉटेल व इंदिरा चौक फाटा येथील असंघटित कामगार यांच्याशी संवाद साधण्यात आला.आम्हाला संघटना स्थापन करण्याचा अधिकार आहे का? आम्ही आमची फिर्याद कोणाकडे नोंदवू शकतो?, जर आम्हाला आमचे प्रश्न मांडायचे असतील तर ते कोणाकडे मांडावे? असे अनेक प्रश्न व त्यांची उत्तरे अशी चर्चा यावेळी झाली. या कार्यक्रमासाठी महा. अंनिसचे रायगड जिल्हा अध्यक्ष यशवंत गायकवाड, खोपोली खालापूर शाखा अध्यक्ष डॉ. सुभाष कटकदौंड, रायगड जिल्हा प्रधान सचिव संदीप गायकवाड, खोपोली शाखा प्रधानसचिव महेंद्र ओव्हाळ, महिला विभाग प्रमुख वैशाली कळसाईत, युवा विभाग प्रमुख रोहन दळवी, हितचिंतक सभासद दिनेश गायकवाड, रवी ओव्हाळ, गणेश गायकवाड हे उपस्थित होते.

## भंडारा जिल्ह्यात जनजागरण, सत्कार आदी उपक्रम



**अंधश्रद्धा निर्मूलन जनजागर**

**भंडारा :** पिंपळगाव सडक येथे अंधश्रद्धा निर्मूलन जनजागरण कार्यक्रम झाला. पोलीस अधीक्षक वसंत जाधव यांच्या आदेशानुसार लाखनी पोलीस स्टेशनच्या पुढाकाराने महाराष्ट्र अंनिसच्या भंडारा जिल्हा शाखेतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लाखनी पोलीस स्टेशनचे ठाणेदार तायडे होते. या प्रसंगी कार्याध्यक्ष विष्णुदास लोणारे, अश्विनी भिवगडे, दशरथ शहारे गावातील सरपंच संगीता उईकेउपस्थित होते. विष्णुदास लोणारे यांनी विविध प्रयोगांचे सादरीकरण केले. अश्विनी भिवगडे यांनी मूलभूत कर्तव्य याविषयी मार्गदर्शनकेले.

**असंघटित कामगारांचा सत्कार**

**भंडारा :** महाराष्ट्र अंनिस भंडारा जिल्हा कार्यालयात कामगार दिनानिमित्त असंघटित कामगारांच्या सत्काराचा कार्यक्रम झाला. नगरसेविका चंद्रकला भोपे, महाराष्ट्र अंनिसचे जिल्हाध्यक्ष हर्षल मेश्राम, आयुष पॅरा–मेडिकलच्या सचिव मायाताई बारापात्रे, महाराष्ट्र अंनिसचे राज्य पदाधिकारी प्रा. नरेश आंबिलकर उपस्थित होते.

याप्रसंगी असंघटित क्षेत्रातील हमाल कामगार भाऊराव खोब्रागडे, अपंग कामगार संदेश रहाटे, मोलकरणीचे काम करणाऱ्या असंघटित कामगार भीमाबाई लोणारे यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हर्षल मेश्राम, प्राध्यापक नरेश आंबिलकर, मायाताई बारापात्रे, चंद्रकला भोपे, विष्णुदास लोणारे, लीलाधर बनसोड यांनी मनोगत व्यक्त केले.

**जादूटोणा असण्याची शक्यता**

**भंडारा :** कोका जंगलात जवळील नवेगाव येथे धुणे धुऊन घराकडे येणाऱ्या बबीता रत्नघोष तिरपुडे (वय ४५) हिचा काठीने तसेच गळा दाबून खून करण्यात आल्याची तसेच या प्रकरणातील आरोपींनी सदर महिलेचा खून जादूटोण्याच्या संशयावरून केल्याची कबुली पोलिसांना दिली. तेव्हा या प्रकरणाच्या माहितीसाठी महाराष्ट्र अंनिसचे भंडारा जिल्हा कार्याध्यक्ष विष्णुदास लोणारे, प्रा. नरेश आंबिलकर, प्रा. युवराज खोब्रागडे, विश्वजीत थुलकर, विलास सुदामे यांनी नुकतीच नवेगाव (कोका) या गावाला भेट दिली. गावकरी व नातेवाईक यांच्या सांगण्यानुसार या प्रकरणात पोलिसांनी पुन्हा कसून चौकशी करावी तर वेगळेच सत्य समोर येण्याची शक्यता आहे असे सांगितले. कार्यकर्त्यानी पोलीस स्टेशन कारधा येथे भेट दिली. ही हत्या जादूटोण्याच्या संशयावरून झाली असल्यास या प्रकरणी पोलिसांनी जादूटोणा विराधी कायद्याअंतर्गत आरोपीवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली. या प्रकरणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व सामायिक न्याय मंत्री यांना निवेदन पाठवण्यात आले.

## शिबिरात चमत्कार सादरीकरण

**वर्धा :** अनिकेत समाजकार्य महाविद्यालयाने ग्रामिण समाज–कार्य शिबिराचे आयोजन धामणगाव वाढोडा येथे केले होते. यावेळी गावकरी व विद्यार्थ्यांसाठी अंधश्रद्धा निर्मूलन व चमत्काराचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी मंचावर शिबीर प्रमुख डॉ. रविन्द्र संसारे, डॉ. विद्या भैसारे, महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा प्रधान सचिव सचिन मेश्राम उपस्थित होते. याप्रसंगी विविध चमत्काराचे सादरीकरण करुन ढोंगी बुवा, बाबा, देवी, माता, बापू हे देव, धर्माचा उपयोग करून कसे फसवितात हे उपस्थितांना सचिन मेश्राम व गजेंद्र सुरकार यांनी सविस्तर समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधुरी खुडसूंगे हिने तर आभार वैभव म्हैसकर यांनी मानले.

## नवीन शाखा सुरु

**मोलगी :** येथे शाखा कार्यका–रिणीची स्थापना करून प्रत्यक्ष कामाची सुरुवात झाली. यासाठी सुमित्रा वसावे व शितल वसावे यांनी प्रयत्न केल्यामुळे एक चांगली व हक्काची टीम मिळाली. राज्य सरचिटणीस विनायक सावळे, जिल्हा प्रधानसचिव किर्तीवर्धन तायडे यांनी मार्गदर्शन केले.

## प्रेमाचा संदेश देण्यासाठी एकवटले कार्यकर्ते

**महाराष्ट्र :** विविधतेत एकतेचा वारसा सांगणाऱ्या आपल्या देशातील धर्मांमध्ये दुही माजवून समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न हल्ली हेतुपुरस्सर वरचेवर होत आहेत. या वाढत्या घटनांमुळे अनेक जण अतिशय अस्वस्थ आणि व्यथित आहेत. त्यामुळे १ मे रोजी राज्यासह देशातील सर्व सर्वसामान्यांसह मान्यवरांनी आपापल्या घरी, गावात, शहरात प्रेमाचा संदेश देण्यासाठी सफेद गणवेश परिधान केला होता. हातात पांढरे कापड, पांढरा कागद घेऊन जवळच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापाशी कार्यकर्ते जमले होते. यावेळी कोणतीही भाषणे झाली नाहीत. या उपक्रमामध्ये महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते, शाखा सहभागी झाल्या होत्या. वर्धा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापक वर्ग, शिवाजी चौकात गजेंद्र सुरकार, बजाज चौकातील सावित्रीबाई फुले फातीमा शेख



फुटपाथ वाचनालय येथे कार्यकर्ते परविन शेख, निखिल जवादे,राजु पाटील,कमलाकर डूकरे, गजेंद्र सुरकार, नाशिक विजया गोराणे, ठकसेन गोराणे यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

## प्रश्न उपस्थित करणारा देशच प्रगती करू शकतो

**कन्नड :** सतत शंका घेऊन, प्रश्न उपस्थित करूनच आजपर्यंत मानवाने प्रगती साध्य केली आहे. शंका, प्रश्न, उपस्थित करणारा, चिकित्सा करणारा देशच प्रगती साध्य करू शकतो, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस शहाजी भोसले यांनी केले आहे. सार्वजनिक फुले–आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या वतीने चमत्कारामागील विज्ञान या विषयावर शहाजी भोसले यांचे व्याख्यान झाले.

यावेळी त्यांनी मंत्राने नारळ पेटविणे, पाण्याचा दिवा पेटविणे, हथकडी तोडणे, जिभेत त्रिशूळ गरज आहे. खुपसणे हातातून सोन्याची चैन काढणे आदी प्रयोग करून त्यांनी उपस्थितांना अचंबित केले. या कार्यक्रमाचे उदघाटन डॉ. संजय गव्हाणे यांच्या हस्ते पाण्याने दिवा पेटवून झाले. प्रास्ताविक डॉ. प्रतिभा अहिरे यांनी केले.

यावेळी डॉ. सीताराम जाधव, डॉ. रविराज जाधव, डॉ. विलास सदाफळे, डॉ. सदाशिव पाटील, दीपक खंडागळे, प्रदिप मनवर, चंद्रमुनी मनवर, चंद्रकांत लाडे यांची, किशोर मोरीया, लकी पैठणे, शैलेजा कांबळे, किरण राठोड, शंकरकांबळे उपस्थित होते.

## सभासद परिचय मेळावा

**शहादा :** शाखेच्यावतीने नवीन सभासदांचा परिचय, नवीन कार्यकारिणीची घोषणा, पदाधिकाऱ्यांचे स्वागत, कुटूंब मेळावा आणि स्नेहभोजन असा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी उपस्थित नवीन सभासद, नवीन शाखा कार्यकारिणीचे पदाधिकारी व जिल्ह्याचे आणि राज्याचे पदाधिकारी उपस्थित होते. नव्याने झालेल्या सभासद नोंदणीतून जवळजवळ तीस कार्यकर्ते या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांना कार्यक्रमफारच आवडला व संघटनेच्या कामात सक्रिय होण्याचे आश्वासन दिले.

## व्यसनमुक्तीच्या संदेशातून ज्योतिरावांना अभिवादन

**नागपूर :** क्रांतीसूर्य जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कोराडी शाखेच्या कार्यकर्त्यांनी मजूरांना व्यसनमुक्तीचा संदेश दिला. येथील जयभीमनगर मजूर वसाहतीमध्ये जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे, कार्यक्रमाला शाखा कार्याध्यक्ष बबन गायकवाड, स्थानिक नागरिक दयानंद कांबळे, राजकुमार मेश्राम, मंगरूळ गजभिये, मिथुन बोरकर, सोमेश्वर चौधरी, रोशन हिवराळे, मंगरूळ गजभिये, करण देवकर, सुरेश देवकर, राजकुमार रंगारी, मिथुन देवकर, शारदा देवकर, शकुंतला सय्याम, गौरी झकनीकर, ममता रंगारी उपस्थित होते.

## जादूटोणाविरोधी व सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा प्रशिक्षण

**लातुर :** महाराष्ट्र अंनिस लातूर शाखा व पोलीस अधिक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जादूटोणा विरोधी कायदा व सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा प्रबोधन मोहीम दहा दिवस राबविण्यात आली. किनगाव व अहमदपूर येथे कार्यक्रम झाला. उद्धाटक आर. एस. जाधव (एपीआय, पोलिस ठाणे, किनगाव), विठ्ठल दुरपडे (सहाय्यक पोलिस निरीक्षक, अहमदपूर), अमोलकुमार आंदेलवाड (गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहमदपूर), विठ्ठल दुरपडे (सहाय्यक पोलिस निरीक्षक, अहमदपूर), प्रभाकर आंधोरीकर



(पोलिस उप निरीक्षक, अहमदपूर) माधव बावगे, बाबा हलकुडे, सुधीर भोसले, प्रा. हनुमंत मुंडे, मुरलीधर डोणे आदी उपस्थित होते. पाण्याचा दिवा पेटवून उदघाटन केले. कायद्याबाबतचे प्रास्ताविक व सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा याची माहिती बाबा हलकुडे यांनी दिली.

जादूटोणा विरोधी कायद्याची माहिती, संदर्भीय चमत्कार माधव बावगे यांनी केले. अध्यक्षीय समारोप आर. एस. जाधव यांनी केले. या कार्यक्रमास पोलिस अधिकारी पाटलोबा सिरसाट, व्यंकट महाके, चंदू गोखरे, मलिकार्जून पळमटे, शिवाजी टोपरपे, पोलिस पाटील, तंटामुक्ती समिती अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच उपस्थित होते.

# विवेक-विज्ञान शब्दकोडे क्र. २

– उत्तम जोगदंड

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | ■ | ६ | ७ |
| ८ | | | ■ | | ■ | ९ | | | |
| १० | | | | | | | ■ | ■ | ■ |
| | ■ | | ■ | ■ | ११ | | | | |
| ■ | १२ | ■ | ■ | १३ | ■ | | ■ | ■ | ■ |
| १४ | | ■ | १५ | | १६ | | १७ | | १८ |
| | ■ | १९ | | ■ | | ■ | | ■ | |
| ■ | २० | ■ | २१ | | | २२ | ■ | २३ | |
| २४ | | | | ■ | ■ | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | २५ | | | | | | ■ |

**आडवे शब्द:**

१) भारत आणि श्रीलंकेत काम करून गेलेले प्रखर बुद्धिवादी
६) विविध देशांचे उत्तर अटलांटिक संघटन
८) मोगल साम्राज्यातील एक पद, बुद्धिबळाच्या खेळातील सोंगटी
९) एक पर्यावरणस्नेही वाहन
१०) बौद्धांत मृत व्यक्तीच्या नावामागे हे लिहितात.
११) मानवी मनाचा अभ्यास करणारे शास्त्र
१४) एक द्रवरूप धातू
१५) मनुष्यप्राण्याचा मूलभूत गरजा
१९) रशियन साहित्यिक आणि कार्यकर्ता– मॅक्झिम XX
२१) आधुनिक युद्धात दूरवरून मारा करण्याचे एक शस्त्र
२३) काश्मीरमधील एक सरोवर
२४) पाण्याच्या पृष्ठभागाखालून जाणारे समुद्री वाहन
२५) भारताच्या पहिल्या पंतप्रधानांचे पहिले नाव

**उभे शब्द**

१) ग्रह, तारे या पोकळीत आहेत
२) दक्षिण अमेरिका खंडातील एक देश
३) आक्षेप
४) दग्ध अंगारा
५) एक विज्ञान शाखा
६) एक अवयव
७) वाहनावर रस्ते वापरल्याबद्दल घेतलेला आकार
१२) अवकाशातील ज्योती
१३) वेगळे, अलग
१४) एक जीवनावश्यक द्रव
१५) पाण्याच्या टबात ज्याला शोधाची कल्पना सुचली तो भौतिकशास्त्रज्ञ
१६) एक तृण-धान्य
१७) दिवसभराच्या श्रमानंतर रात्री याची आवश्यकता असते.
१८) बुद्धाच्या मुलाचे नाव
२०) वरून काटेरी असलेले, आतून मधुर असलेले फळ
२२) लाट
२३) एक पक्षी

## विवेक-विज्ञान शब्दकोडे १ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तु | का | रा | म | ■ | ■ | यु | रे | न | स |
| ■ | र्य | ■ | ■ | को | मा | ■ | ■ | ■ | ती |
| ■ | का | ■ | ■ | रो | प | वा | ट | का | ■ |
| क | र | णी | ■ | ना | ■ | च | ■ | प | क्षी |
| ■ | ण | ■ | ■ | ■ | न्यू | न | गं | ड | ■ |
| आ | भा | स | ■ | ■ | ट | ■ | ज | ■ | दा |
| ■ | व | ■ | वि | ज्ञा | न | ■ | णे | ■ | भो |
| मा | ■ | बी | ■ | ने | ■ | भ | ■ | गो | ल |
| न | ट | ■ | अ | श्व | श | क्ती | ■ | ■ | क |
| व | न | ■ | ■ | र | ■ | ■ | सं | क | र |

# महाराष्ट्र अंनिसच्या उपक्रमांतून जनप्रबोधन



इस्लामपूर एमआयडीसी परिसरात आठ वर्षीय मुलाचे जट निर्मूलन महाराष्ट्र अंनिसच्या इस्लामपूर शाखेने केले. या मोहिमेत राज्य पदाधिकारी, शाखा कार्यकर्ते सहभागी होते.



त्र्यंबकेश्वर येथील स्वामी समर्थ केंद्रातील (दिंडोरी प्रणित) आर्थिक शोषणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नाशिक जिल्हा कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.






आकुर्डी पुणे शाखेने कार्यकर्ता कार्यशाळा आयोजित केली होती. प्रधानसचिव संजय बनसोडे यांनी मार्गदर्शन केले आणि जळगाव जिल्हा कार्याध्यक्ष दिगंबर कट्यारे यांनी चमत्कार सादरीकरण केले. यावेळी संपादक डॉ. नितीन शिंदे, राज्य कार्यवाह ॲड. मनीषा महाजन, शाखेच्या कार्याध्यक्ष क्रांती दांडेकर यांनी मार्गदर्शन केले.




तासगाव येथे झालेल्या कार्यक्रमात चमत्कारातून प्रबोधन करताना महाराष्ट्र अंनिस विज्ञान बोध वाहिनीचे राज्य कार्यवाह भास्कर सदाकळे



पुसद येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखेने आयोजित केलेल्या शिबिरात महाराष्ट्र अंनिस युवा विभागाचे राज्य सहकार्यवाह रुपेश वानखेडे यांनी प्रयोगातून प्रबोधन केले.

## ‘विद्रोही’चा माधव बावगे यांना जीवनगौरव



२३ एप्रिल रोजी उदगीर येथे झालेल्या १६ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात सामाजिक कार्यकर्ते रंगा रचूरे, प्राचार्य नागोराव कुंभार, पत्रकार रामराव गवळी यांच्यासह महाराष्ट्र अंनिसचे प्रधानसचिव माधव बावगे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी मंगल बावगे, संमेलनाध्यक्ष गणेश विसपुते, संयोजक प्रा.प्रतिमा परदेशी, कोरणेश्वर मठाधीपती कोरणेश्वर स्वामी, महा. अंनिसचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील, सरवर चिश्ती, अंजुम कादरी, निवृत्ती सांगवे, किशोर ढमाले उपस्थित होते.



## अतुल सवाखंडे यांना फेलोशिप मिळाल्याबद्दल अभिनंदन!

‘सर्प विज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोन’ या विषयावर काम करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शरद पवार प्रेरणा फेलोशिपसाठी अतुल सवाखंडे यांची निवड झाली आहे. सवाखंडे हे महाराष्ट्र अंनिसच्या विविध उपक्रम विभागाचे सहकार्यवाह आहेत. १ लाख रुपये रक्कमेची ही फेलोशिप आहे.

## दु:खातही निवडली वेगळी पाऊलवाट

महाराष्ट्र अंनिस नंदुरबार जिल्हा प्रधानसचिव किर्तीवर्धन तायडे यांच्या आईच्या निधनानंतर कर्मकांड नाकारुन शेतीमध्ये अस्थिविसर्जन करुन तेथे फळझाडे लावण्यात आली. दु:खाच्या क्षणी देखील भावनेच्या आहारी न जाता विवेकाने निर्णय घेवून कुटुंबिय, नातेवाईक यांनी वेगळी पाऊलवाट दाखवली आहे. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार!



**Printed Book Post**

**प्रति,** ______________________________

______________________________

______________________________

**प्रेषक,**

**संपादक**
**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
प्रा. डॉ. नितीन शिंदे, कल्पतरू,
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली - ४१५४०९.

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.